दैनिक
राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ८ वे । पाने ८ । मुल्य रू. ५.०० । अंक ४० । गुरुवार १९ नोव्हेंबर २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

अहिल्यानगर • जळगाव • धुळे • नंदुरबार • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • धाराशिव • लातूर • नांदेड • परभणी • हिंगोली • अमरावती • अकोला • यवतमाळ • बुलढाणा • वाशिम • नागपूर • वर्धा • भंडारा • गोंदिया • चंद्रपूर • गडचिरोली • मुंबई • ठाणे • पालघर • रायगड • रत्नागिरी • सिंधुदुर्ग • पुणे • सातारा • सांगली • कोल्हापूर • सोलापूर • नाशिक

विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन दोन आठवड्यांचेच

मुंबई : आगामी विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सध्या दोन आठवड्यांचेच ठेवण्याचा निर्णय कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे. मात्र, कामाकाजाची व्याप्ती आणि गरज भासल्यास अधिवेशनाची मुदत वाढवण्याबाबत मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, विधानसभा अध्यक्ष, सभापती आणि विरोधी पक्षनेते एकत्र बसून योग्य वेळी निर्णय घेतील, अशी माहिती विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांनी दिली. उपसभापती सचिन अहिर म्हणाले की, सल्लागार समितीची बैठक पार पडली आहे. दोन आठवड्यांचे अधिवेशन पुरेसे नाही, अशी भूमिका विरोधकांनी मांडली असून तीन आठवड्यांचे अधिवेशन घेण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. मात्र, सद्यस्थितीत सभागृहासमोर १० ते १२ विधेयके, अंतिम आठवडा प्रस्ताव आणि शासनाचे काही प्रस्ताव आहेत. या सर्व कामकाजावर चर्चा करण्यासाठी तूर्तास दोन आठवड्यांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. १८ तारखेपूर्वी १७ तारखेला पुन्हा एकदा कामकाज सल्लागार समितीची बैठक आयोजित करण्यात आली आहे.

ओबीसीसाठी ६,८४० कोटींच्या निधीची शिफारस

हिवाळी अधिवेशनाची तयारी; ओबीसी समिती अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



मुंबई : राज्यातील १८ पगड जाती आणि ओबीसी घटकांना न्याय देण्यासाठी विधिमंडकाच्या हिवाळी अधिवेशनात पुरवणी म ागण्यांमध्ये विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती व वसतिगृह बांधकामासाठी तब्बल ६,८४० कोटी रुपयांच्या निधीची शिफारस करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महसूलमंत्री तथा ओबीसी मंत्रिमंडळ उपसमिती अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत घेण्यात आला.

ओबीसी समाजाच्या प्रलंबित प्रश्नांना गती देण्यासाठी आणि कल्याणकारी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महसूलमंत्री तथा ओबीसी मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली आज (दि. १८) रोजी मंत्रालयात बैठक पार पडली. अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे आणि ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे दुरदृश्यप्रमालीद्वारे उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार ओबीसी समाजाचे हक्क मिळवून देण्यासाठी उपसमिती सातत्याने काम करत असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. केंद्र शासनाच्या एनएसपी पोर्टलवर विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती प्रक्रियेसाठी १,८०० कोटी रुपये अपेक्षित असताना सध्या केवळ ८३ कोटींची तरतूद असल्याने हा निधी तात्काळ वाढवून देण्याची आवश्यकता बैठकीत अधोरेखित करण्यात आली. तसेच 'महाज्योती'साठी ७०० कोटी रुपयांच्या निधीसह पुणे येथील प्रस्तावित संकुलासाठी जागा देणे आणि अनुशेष भरून काढण्याबाबतही सविस्तर चर्चा झाली.

विमुक्त जाती, भटक्या जमातीआणि भटक्या सम ाजातील ४३ जातींना हक्काची ओळख आणि निवारा मिळवून देण्यासाठी शासनाने मोठे पाऊल उचलले आहे. येत्या ६, ७ आणि ८ जानेवारी २०२७ रोजी राज्यभरात सुमारे ५०० विशेष शिबिरे आयोजित करून या घटकांना १०० टक्के जन्माचे दाखले आणि आधार कार्ड मिळवून दिले जाणार आहेत. या मोहिमेसाठी प्रत्येक सर्कलला १० हजार रुपये दिले जातील, तसेच ओबीसींच्या विविध योजनांमार्फत बांधण्यात आलेल्या घरकुलांवर दोन म हिन्यांच्या आत लाभार्थ्यांच्या नावाचे फलक लावण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

रोहित पवारांनी माफी मागावी

मुख्यमंत्र्यांवर केलेल्या टीकेबाबत सुप्रिया सुळे यांनी ते रोहित पवारांचे व्यक्तिगत मत असल्याचे स्पष्ट केले असले, तरी शरद पवार यांनी दिलेले संस्कार रोहित पवारांनी पाळावेत. विकासाच्या राजकारणात मिठाचा खडा टाकण्याचे काम करू नये आणि त्यांनी देवेंद्र फडणवीस यांची माफी मागावी, असे बावनकुळे म्हणाले. शायना एनसी यांच्याकडून अनावधानाने घडलेल्या घटनेचे राजकारण करत संजय राऊत यांनी वापरलेल्या भाषेचा बावनकुळे यांनी तीव्र शब्दांत निषेध केला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात महिलांबद्दल अशी भाषा वापरून राज्याची संस्कृती कलंकित केली जात असल्याचे ते म्हणाले.

वसतिगृह उभारणीच्या कामात सुसूत्रता आणताना प्रत्येक जिल्ह्यात १०० आणि विभागीय जिल्ह्यांत २५० मुला-मुलींची वसतिगृहे बांधण्याचा निर्णय घेण्यात आला असून, याबाबत एमएसआयडीसीने तयार केलेल्या आराखड्यानुसार मार्चपासून प्रत्यक्ष बांधकाम सुरू होणार आहे. सर्व वसतिगृहे पर्यावरणपूरक आणि सौरऊर्जेचा वापर करून बांधावीत तसेच ३० डिसेंबरपर्यंत सर्व प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करून मार्चच्या अर्थसंकल्पात १० नवीन वसतिगृहांसाठी तरतूद करावी, अशा सूचना मंत्री पंकजा मुंडे यांनी दिल्या.

गोरेगाव येथील दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या न्यूझीलंड वसतिगृहात इतर मागास बहुजन कल्याण विभागाला ८० खोल्या देण्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे. याशिवाय, पुण्यातील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर 'ए-कॅप'ची नस्ती अंतिम मान्यतेसाठी मुख्यमंत्र्यांकडे पाठवण्यात आली असून लक्ष्मण हाके यांच्या मागण्याही पूर्ण केल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. महात्मा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त विविध उपक्रम राबवण्यासोबतच ९ टक्के आरक्षणाचा नव्याने अभ्यास करून सांख्यिकी विभागाकडे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मंत्री छगन भुजबळ यांनी दिले.

महायुतीच्या समन्वय समितीच्या बैठकीत तिन्ही घटक पक्षांनी एकमताने निर्णय घेतला असून यापुढे आमदार, खासदार किंवा पदाधिकाऱ्यांनी मित्रपक्षांच्या नेत्यांवर जाहीर टीका करू नये. असे सांगण्यात आले आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे किंवा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यावर विरोधकांकडून किंवा सोशल मीडियावर खालच्या पातळीवर टीका झाल्यास तिन्ही पक्ष एकत्रितपणे मैदानात उतरून सडेतोड प्रत्युत्तर देतील असा ईशारा बावनकुळे यांनी दिला.

'मविआ'ची स्थापनाच हिंदुत्वविरोधी..!

शिवसेना पक्ष आणि चिन्ह वाद: एकनाथ शिंदे गटाकडून सुप्रीम कोर्टात जोरदार युक्तिवाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



मुंबई : शिवसेना पक्ष, निवडणूक चिन्ह आणि आमदार अपात्रता प्रकरणावर बुधवारी सर्वोच्च न्यायालयात महत्त्वाची सुनावणी पार पडली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ज्येष्ठ वकील ध्रुव मेहता यांनी जोरदार युक्तिवाद करत ठाकरे गटाचे सर्व आरोप फेटाळून लावले. सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी मेहता यांना आजच आपला युक्तिवाद पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या, ज्यास मेहता यांनी सहमती दर्शवली.

युक्तिवादादरम्यान ध्रुव मेहता यांनी २०१९ मधील कर्नाटक सरकारच्या सत्तासंघर्षाचा दाखला दिला. कर्नाटकमध्ये काँग्रेस आणि जेडीएसच्या १७ आमदारांनी राजीनामा दिल्याने सरकार अल्पमतात आले होते. मात्र, महाराष्ट्राची परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे. येथे शिंदे गटातील कोणत्याही आम दाराने राजीनामा दिलेला नाही; त्यामुळे या प्रकरणात घटनेच्या दहाव्या अनुसूचीनुसार अपात्रतेची कारवाई करता येणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, विधानसभेचा कार्यकाळ संपेपर्यंत अपात्रतेचा निर्णय घेण्याचे पूर्ण अधिकार विधानसभा अध्यक्षांकडेच असतात, असा ठाम युक्तिवाद त्यांनी केला. विरोधकांकडून 'बाळासाहेब पाटील' निकालाचा चुकीचा अर्थ लावून न्यायालयाची दिशाभूल केली जात असल्याचा आरोपही **(पान ४ वर)**

उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडून शायना एनसी यांचे समर्थन



शिवसेनेच्या नेत्या शायना एनसी यांनी काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांच्या पुस्तकावर टीका करताना शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो फाडल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात होता. या व्हायरल झालेल्या व्हिडिओवरून राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती. मात्र, यावर आता खुद्द उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट भूमिका घेत विरोधकांचे आरोप फेटाळून लावले आहेत. बाळासाहेब ठाकरे आमचे दैवत आहेत आणि त्यांचा अपमान कोणताही शिवसैनिक करू शकत नाही, असे स्पष्ट करत एकनाथ शिंदे यांनी शायना एनसींच्या बचावात महत्त्वाची माहिती दिली. शायना एनसी यांनी यावर तातडीने स्पष्टीकरण दिले असून, त्यांनी तो मूळ फोटोही दाखवला आहे. तो फोटो मणिशंकर अय्यर यांना जोडे मारतानाचा असून त्यात अय्यर यांचे तोंड फाटलेले आहे, बाळासाहेबांचा फोटो फाडलेला नाही, असे शिंदे यांनी स्पष्ट केले. बाळासाहेबांचे विचार पुढे घेऊनच आम्ही वाटचाल करत असल्याचे सांगत, त्यांच्या अवमानाचा प्रश्नच उद्भवत नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

महत्त्वाचे..

अनुसूचित मुलांसाठी मोफत पोलिस व सैन्यदल भरतीपुर्व प्रशिक्षण

अहिल्यानगर :एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजूर अंतर्गत कार्यरत असलेल्या मवेशी (ता. अकोले) येथील प्रशिक्षण केंद्रात फक्त अहिल्यानगर जिल्ह्यातील अनुसूचित जम ातीच्या मुलांसाठी मोफत पोलिस व सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.

१ डिसेंबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या चार म हिन्यांच्या कालावधीत हे प्रशिक्षण निवासी व भोजन व्यवस्थेसह पूर्णतः मोफत दिले जाणार आहे. या प्रशिक्षणासाठी उमेदवार १२ वी उत्तीर्ण असावा. त्याचे वय १८ ते २६ वर्षे, उंची किमान १६५ सें.मी. आणि वजन किमान ५० कि. ग्रॅ. असणे आवश्यक आहे. उमेदवारांची निवड १६०० मीटर धावणे (५० गुण) आणि लेखी परीक्षा (५० गुण) अशा एकूण १०० गुणांच्या चाचणीतून गुणवत्ता यादीनुसार केली जाईल.

दुष्काळातही फुलणार संसाराची स्वप्ने

जिल्हा प्रशासनाचा लोकसहभागातून 'सामूहिक विवाहांचा' अभिनव व संवेदनशील निर्णय!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

जालना : आभाळ कोरडं ठाक पडलंय... शेतातील पिकांना जिवंत ठेवताना बळीराजाचा घाम निघतोय आणि डोळ्यात अश्रू दाटले आहेत. अशा या भीषण दुष्काळी संकटात हतबल झालेल्या आणि आर्थिक विवंचनेत सापडलेल्या गरीब कुटुंबांसाठी जिल्हा प्रशासनाने एक अत्यंत मानवीय आणि दिलासादायक पाऊल उचलले आहे. केवळ शासकीय कागदी घोडे न नाचवता, थेट सामान्य माणसाच्या संसाराचा गाडा हाकण्यासाठी महसूल प्रशासनाने आता लोकसहभागातून 'सामूहिक विवाह सोहळे' आयोजित करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

दुष्काळ म्हणजे केवळ पाण्याचा प्रश्न नसतो, तो अनेक कुटुंबांच्या अर्थकारणाचा आणि जगण्याचा संघर्ष असतो. लेकीचे लग्न करायचे कसे, हा प्रश्न जेव्हा एकाबाजूला दुष्काळग्रस्त बापाच्या उरला चिरत असतो, नेमक्या याच वेदनेला प्रशासनाने संवेदनशीलतेची फुंकर घातली आहे. जिल्हाधिकारी असिमा मित्तल यांनी नुकत्याच घेतलेल्या आढावा बैठकीत या महत्त्वपूर्ण उपक्रमाची रूपरेषा स्पष्ट केली आहे. ग्रामीण आणि शहरी भागात अशा पात्र वधू-वरांची नोंदणी करून त्यांचे नियोजन करण्याचे सक्त आदेश प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, हा केवळ सरकारी उपक्रम न राहता यात सामाजिक संस्था, लोकप्रतिनिधी आणि दानशूर नागरिकांनी सढळ हाताने पुढे आकरून सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

- या सामूहिक विवाह सोहळ्यांमध्ये केवळ कुणाचेही विवाह पार पाडणे हा उद्देश नसून, खऱ्या अर्थाने ज्यांना मदतीची गरज आहे, अशा घटकांना प्राथमि कता देण्यात आली आहे.
- आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबे: ज्या कुटुंबांनी आपला कर्ता पुरुष गमावला आहे, अशा कुटुंबांमधील मुलींचे विवाह.
- एकल पालक असलेली कुटुंबे: आई किंवा वडिलांपैकी एकाचाच आधार असलेल्या कुटुंबांमधील वधू-वर.
- आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक: पोटाची खळगी भरताना लग्नाचा खर्च पेलू न शकणाऱ्या सर्वसामान्य घरातील मुले-मुली.



दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या ग्रामीण भागातील मजुरांवर रोजगारासाठी इतरत्र स्थलांतर करण्याची वेळ येऊ नये, यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. 'विकसित भारत – रोजगार आणि आजीविका मिशन' अंतर्गत गावातच चारा लागवड, जलसंधारणासाठी धरणांमधील व तलावांमधील गाळ काढणे आणि प्रत्येक गावात किमान दोनशे 'जलतारा' प्रकल्प उभारण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. **(पान ४ वर)**



पंचगंगा शुगर ऊसाला ३५०० दर देणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देणारी घोषणा पंचगंगा शुगर अँड पॉवर, महालगाव कारखान्याने केली आहे. कारखान्याने पहिली उचल प्रतिटन ३ हजार ३०० रुपये जाहीर केली असून, त्यानंतर दोन टप्प्यांत प्रत्येकी १०० रुपये याप्रमाणे आणखी २०० रुपये देण्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एकूण प्रतिटन ३ हजार ५०० रुपये भाव मिळणार आहे.

पहिली उचल ३३००, दोन टप्प्यांत आणखी २०० रुपये

सध्याच्या ऊसदराच्या पार्श्वभूमीवर पंचगंगा शुगर अँड पॉवरने घेतलेला हा निर्णय ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी दिलासादायक मानला जात आहे. शेतीचा वाढता उत्पादन खर्च, मजुरी, खते, औषधे आणि वाहतूक खर्च लक्षात घेता शेतकऱ्यांना समाधानकारक दर मिळणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत कारखान्याने जाहीर केलेल्या दराचे ऊस उत्पादकांकडून स्वागत होत आहे.

कारखान्याचे चेअरमन व सर्व संचालक मंडळाने शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून हा निर्णय घेतल्याबद्दल त्यांचे ऊस उत्पादक शेतकरी व सभासदांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. शेतकरी आणि कारखाना यांच्यातील विश्वासाचे नाते अधिक दृढ करणारा हा निर्णय ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

नियमात न बसणारे ३०० प्रकल्प मुख्यमंत्र्यांच्या मर्जीतील बिल्डरांना

खा संजय राऊत यांचा आरोप : दूसरा बॉम्ब टाकल्यावर मुख्यमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागेल

मुंबई : राज्यातील दुष्काळ निवारणासाठी राज्य सरकारने केंद्राला मागणी केलेल्या ४० हजार कोटी रुपयांना अद्याप मान्यता मिळाली नाही याउलट मुंबईत एस आर एच्या नियमात न बसणारे ३०० प्रकल्प मुख्यमंत्र्यांच्या मर्जीमधल्या बिल्डरांना देवून शासनाचे ४० हजार कोटी रुपयांचे नुकसान करण्यात आल्याचा आरोप शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी केला . या . एसआरए घोटाळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मर्जीतील बिल्डरांना वाचवत असल्याने या प्रकरणाचा तपास होत नाही. पण हे प्रकरण संपलेलं नाही. मी शांत बसणार नाही. मी जेव्हा पुढचा बॉम्ब टाकेल, तेव्हा मुख्यमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागेल, असा खळबळजनक दावा राऊत यांनी केला आहे

तर भाजप सरकारवरती टीका करताना संजय राऊत म्हणाले की, भारताची अर्थव्यवस्था ही सध्या जगातली सगळ्यात डळमळीत अर्थव्यवस्था आहे. जगातली आर्थिक महाशक्ती वगैरे भारत बनत असल्याच्या ज्या काही वल्गना नरेंद्र मोदी आणि त्यांचे लोक करतायत हा खोटारडेपणा आहे. देशाची अर्थव्यवस्था अत्यंत डळमळीत आहे. याच एक स्पष्ट उदाहरण तुम्हाला देतो. महाराष्ट्रामध्ये गंभीर दुष्काळ आहे आणि दुष्काळ निवारणासाठी ४० हजार कोटींची गरज आहे आणि हे ४० हजार कोटी रुपये महाराष्ट्र सरकारकडे नाही, मग करतायत काय हे लोक? ४० हजार कोटी रुपये हवेत दुष्काळ निवारणासाठी आणि या ४० हजार कोटींची मागणी म हाराष्ट्राने **(पान ४ वर)**

विमा संपलाय..? आता टोल नाका ओलांडताच मोबाईलवर येणार मेसेज

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नवी दिल्ली: रस्ते मार्गाने प्रवास करताना आता टोल नाक्यावर थांबण्याची किंवा विम्याची कागदपत्रे तपासण्याची अडचण भासणार नाही, मात्र टोल ओलांडताच मोबाईलवर एक महत्त्वाचा संदेश येऊ शकतो. राष्ट्रीय महामार्गांवर विम्याशिवाय धावणाऱ्या वाहनांना आळा घालण्यासाठी आणि वाहन चालकांमध्ये जनजागृती करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने एक अत्यंत म हत्त्वाची आणि अभिनव यंत्रणा सुरू केली आहे. सध्या या नवीन यंत्रणेची प्रायोगिक तत्त्वावर चाचणी दिल्लीतील टोल नाक्यावर सुरू असून, लवकरच ही यंत्रणा देशभरातील राष्ट्रीय महामार्गांवर लागू केली जाणार आहे.

वृत्तानुसार, या प्राधिकरणाने दिल्लीतील एका विशिष्ट मार्गावरील टोल नाक्यावर या डिजिटल यंत्रणेची चाचणी सुरू केली आहे.

या प्रक्रियेअंतर्गत टोल नाका आणि शासकीय वाहन प्रणाली यांच्यात थेट माहितीची देवाणघेवाण होते. जेव्हा एखादे वाहन टोल नाका ओलांडून पुढे जाते, तेव्हा त्या गाडीची माहिती संबंधित अधिकृत डेटाबेस वर पाठवली जाते. तिथे त्या वाहनाची विमा वैधता आपोआप तपासली जाते.

जर तपासणीमध्ये संबंधित वाहनाचा थर्ड पार्टी विमा संपला असल्याचे किंवा वाहन विम्याशिवाय धावत असल्याचे समोर आले, तर तात्काळ वाहन मालकाच्या मोबाईलवर एक लघु संदेश पाठवला जातो. या संदेशाम ध्ये गाडीचा नोंदणी क्रमांक, टोल नाका ओलांडण्याची अचूक वेळ आणि विम्याच्या मुदतपूर्तीची माहिती दिली जाते. तसेच वाहन मालकाला लवकरात लवकर विमा नूतनीकरण करण्याचा मोलाचा सल्लाही या माध्यम ातून दिला जातो.नियमांनुसार, विमा नसलेले वाहन पहिल्यांदा पकडले गेल्यास बेस इन्शुरन्स प्रीमियमच्या तिप्पट किंवा ५,००० रुपये (यापैकी जी रक्कम जास्त असेल) दंड आकारला जातो. तर दुसऱ्यांदा नियमांचे उल्लंघन केल्यास पाचपट किंवा १०,००० रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. या नवीन यंत्रणेमुळे वाहनचालकांम ध्ये शिस्त निर्माण होऊन रस्ते प्रवास अधिक सुरक्षित होण्यास मदत मिळणार आहे.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचा अभिनव उपक्रम

जनजागृती आणि दंडात्मक कारवाईपासून संरक्षण

नियमांनुसार थर्ड पार्टी विमा असणे सक्तीचे आहे. मात्र, अनेक वाहनचालक या नियकडे दुर्लक्ष करून विम्याशिवाय आपली वाहने रस्त्यावर चालवतात. रस्ते अपघात झाल्यानंतर अशा वाहनामधील पीडितांना किंवा प्रवाशांना भरपाई मिळणे कठीण होते. हाच प्रश्न लक्षात घेऊन ही यंत्रणा आणली आहे. हा संदेश वाहन मालकांसाठी एक प्रकारे आठवण म्हणून काम करेल, ज्यामुळे ते वेळेत विमा काढून कायद्यांतर्गत आकारल्या जाणाऱ्या मोठ्या दंडात्मक कारवाईपासून वाचू शकतील.

असमर्थ कृषिमूल्य आयोग हवाच कशाला?

शेतमालाला शाश्वत हमीभाव मिळावा या उद्देशाने कृषीमूल्य आयोग अस्तित्वात आला. मात्र 'शेतमालाचा भाव ठरविण्याची सध्याची पद्धती सदोष असल्याचा कबुलीजबाब दस्तुरखुद्द कृषिमूल्य आयोगाने काही वर्षांपूर्वी दिला होता . कारखानदारी, उद्योगातून उत्पादित होणाऱ्या उत्पादनांचे, वस्तूंचे भाव ठरविण्याचे अधिकार उत्पादकास असतात. याच धर्तीवर शेतीतून उत्पादित होणाऱ्या भाव मग शेतकऱ्याने उत्पादित केलेल्या शेतमालाचा भाव ठरविणारे सरकार अथवा कृषिमूल्य आयोग कोण, असा प्रश्न स्वाभाविक ठरते. शेतमालाचा भाव ठरविणे, शेतमालाची आयात-निर्यातीचे धोरण शेतमालावर आधारित उद्योगांवर नियंत्रण ठेवले जात असेल, तर असेच नियंत्रण आणि निर्बंध सगळ्याच उद्योगधंद्यावर आणि उत्पादनांवर कां लादले जात नाही, याचेही उत्तर मिळाले पाहिजे. कारण हिच नियंत्रण व्यवस्था शेतमालाच्या शाश्वत भावाआड सातत्याने येत असते.

देशाच्या घटनाकारांनी समानतेचे उदार व उदात्त राखून घटनाडरे सामाजिक व आर्थिक विषमता घालविण्याचे आणि राहणीमान उंचविण्याचे उत्तरदायित्व सरकारवर सोपविले आहे. सरकार संविधानाच्या ह्या मूलभूत तत्त्वापासून दूर जात आहे. मुठभर भांडवलदारांची भलामण, तर संख्येने सत्तर टक्के असलेल्या शेतकऱ्यांना मात्र विषमतेच्या खाईत ढकलित आहे. सरकार जर संविधानातल्या तत्त्वाविरोधात जात असेल, तर अशा सरकारला सत्तेवर आणि कृषिमूल्य आयोगाला पदावर राहण्याचा काहीच नैतिक अधिकार नाही.

शेतमालाला रास्त भाव मिळावेत, शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण होऊ नये, त्याने पिकविलेल्या मालाला रास्त भावाच्या हमीचे संरक्षण देणे हे कृषिमूल्य आयोगाचे कर्तव्य आहे. शेतमालाचा भाव ठरविताना देशांतर्गत उत्पादनाच्या सरासरीचा निकष लावण्यात येतो. अर्थशास्त्रीय नियमानुसार मागणीपेक्षा पुरवठा



वाढला तर भाव खाली येतात, हे खरे आहे. तरीदेखील जर सरासरी उत्पादन वाढले आणि देशांतर्गत गरजेपेक्षा अधिक उत्पादन झाले; तर देशाची अन्नधान्याची गरज भागवून देशाला अन्नधान्याबाबत स्वावलंबी बनविणाऱ्या शेतकऱ्यांची पाठ थोपटायची की त्याला धोपटायचे, याचे उत्तर मिळणे आवश्यक आहे.देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी झाल्याने अन्नधान्याची आयात करावी लागत नाही. यामुळे परकीय चलनात मोठी बचत होते. ही शेतकऱ्यांची कर्तबगारी नव्हे काय? दुसरे म्हणजे देशांतर्गत गरजेपेक्षा अधिकचे उत्पादन झाले, हा शेतकऱ्यांचा गुन्हा आहे काय,अधिकच्या उत्पादनासाठी आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून देणे ही सरकारची जबाबदारी नाही काय, या प्रश्नांचे उत्तर शासनाकडून अपेक्षित आहे.

दुसरा मुद्दा असा की, शेतमालावर आधारित उद्योगांच्या गरजेवर भाव अवलंबून असणे, हा निकष तर भलताच म्हणायचा. कवडीमोल भावाने शेतमाल खरेदी करून त्यावर थातूर-मातूर प्रक्रिया करून आकर्षक वेष्टणे लावून अव्वाच्या सव्वा कमाई करायची. साखर कारखान्यांनी उत्पादित केलेली साखर कवडीमोल भावाने विकत घ्यायचची . त्यावर शीतपये, मिठाई, आइसक्रीम, चॉकलेट्स, गोळ्या भरमसाठ दराने विकून नफा कमवायचा.कमी किमतीत खरेदी केलेल्या अल्कोहोलवर प्रतिलिटर शंभर रुपये प्रक्रिया खर्च करून बनणारी दारू सुमारे हजार ते पंधराशे रुपये लिटरने विकायची. अशात-हेने शेतमालावर प्रक्रिया करून उद्योगपती, भांडवलदार, स्वत:चे उखळ पांढरे करून घेतात. ज्या शेतमालावर प्रक्रिया करून नफा कमाविला जातो, त्यातून शेतमाल उत्पादन करणाऱ्याला रॉयल्टीच्या धर्तीवर वाटा मिळाला पाहिजे. शासन व कृषी आयोग शेतकऱ्यांचे हितरक्षक आहे, की भांडवलदारांचे याचाही खुलासा केला पाहिजे.

शेतमालाचे आंतरराष्ट्रीय दर लक्षात घेऊन शेतिमालाचे दर निश्चित केले जातात. हा निकष तर अजबच आहे. साखर, कांदा, कपाशी, द्राक्ष आणि आंबा अशा मोजक्याच 'नगदी' शेतमालाची निर्यात होते. देशाच्या एकूण शेती उत्पादनात नगदी पिकांचा वाटा केवळ तेरा ते पंधरा टक्के आहे. नगदी पिकांच्या भावावर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचे परिणाम होतही असतील. पण ज्यावेळी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत संधी असते, त्यावेळी निर्यातबंदी होते. हे झाले नगदी पिकाचे. पण संख्येने ८५ टक्के इतक्या मोठ्या संख्येने असणाऱ्या कोरडवाहू शेतकऱ्यांचे काय? त्यांचा तर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी काडीचाही संबंध येत नाही. या शेतकऱ्यांबाबत सरकार आणि कृषीमूल्य आयोग विचार करतानाच दिसत नाही.

कृषिमूल्य आयोगाकडून वास्तविक शेतमालाला रास्त भाव मिळवून देणे अपेक्षित आहे. त्यासाठी उपाययोजना सुचविणे आणि प्रसंगी सरकारला मार्गदर्शन करण्याची भूमिका आयोगाची असली पाहिजे.शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळावेत यासाठी डॉ. स्वामींनाथन आयोगाने शिफारशी केल्या आहेत.

त्या लागू करणे आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणे, हे कृषिमूल्य आयोगाचे कर्तव्य आहे. कृषिमूल्य आयोग आपले कर्तव्य पार पाडायला असमर्थ ठरत असेल,तर मग अशा असमर्थ कृषिमूल्य आयोगाची गरज तरी काय, हा प्रश्न पडतो. यापेक्षा कृषिमूल्य आयोग रद्द करावा आणि स्वत:च्या उत्पादनाचे भाव काय ठरवायचे ते शेतकऱ्यांवर सोडून द्यावे, हे केव्हाही चांगले आणि शेतकऱ्यांच्या हिताचे ठरेल.

दु:खाला फाटा देत नवा आदर्श

कुरकुटवाडीत दशक्रिया विधीनिमित्त शाळांना शिक्षण निधी अन् वृक्षारोपण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

धारगाव : संगमनेर तालुक्यातील कुरकुटवाडी येथे स्वर्गीय रंगनाथ भिकाजी कुरकुटे आणि नाथबाबा बाजाबा कुरकुटे यांच्या दशक्रिया विधीनिमित्त एक अत्यंत प्रेरणादायी आणि समाजोपयोगी उपक्रम राबवण्यात आला. धार्मिक विधींपुरती मजल न ठेवता, दु:खाच्या प्रसंगाला शिक्षणाची आणि पर्यावरणाची जोड देत दिवंगत व्यक्तींना अनोखी श्रद्धांजली वाहण्यात आली. गावचे तंटामुक्ती अध्यक्ष युवराज जयराम कुरकुटे यांनी मांडलेल्या संकल्पनेला कुटुंबीयांनी तत्काळ संमती दिली. या उपक्रमांतर्गत परिसरातील नाथबाबा विद्यालय (बोटा), जि.प. प्राथमिक शाळा (कुरकुटवाडी) आणि जि.प. प्राथमिक शाळा (पानोबानगर कुरकुटवाडी) या तीन शाळांना प्रत्येकी ५,००१ रुपयांचा शिक्षण निधी अत्यंत आदराने सुपूर्द करण्यात आला.पर्यावरण संवर्धनाचा नवा पायंडा सण-उत्सव व धार्मिक विधींमध्ये नदी किंवा जलस्रोतांचे होणारे प्रदूषण टाळण्यासाठी याप्रसंगी एक महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला. पारंपरिक पद्धतीने नदीपात्रात अस्थी विसर्जन न करता, दिवंगत व्यक्तीच्या स्मरणार्थ एक झाड लावून त्या झाडाच्या मुळाशी अस्थी विसर्जन करावी आणि रोपाचे संगोपन करावे, असे आवाहन करण्यात आले. यामुळे जलप्रदूषण टळून वसुंधरेची हिरवाई वाढण्यास मदत होईल. एखाद्याच्या स्मरणदिनी होणाऱ्या खर्चातील काही भाग शाळा, ग्रंथालय किंवा वृक्षारोपणासाठी खर्च केल्यास समाजात मोठा सकारात्मक बदल घडू शकतो, असा आदर्श या उपक्रमाने संपूर्ण संगमनेर तालुक्याच्या पठार भागासमोर ठेवला आहे.



उपनगराध्यक्ष अभय शेळके यांच्या हस्ते

भीमशक्ती टॅक्सी संघटनेच्या सभासदांना आनंदाचा शिधा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

शिर्डी : राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. सुजय दादा विखे पाटील प्रणित भीमशक्ती टॅक्सी संघटनेच्या सभासदांना आनंदाचा शिधा वाटप करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन भीमशक्ती टॅक्सी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष चांगदेव जगताप यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपनगराध्यक्ष अभय शेळके हे होते. त्यांच्या शुभहस्ते संघटनेच्या सभासदांना आनंदाचा शिधा वाटप करण्यात आला.

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर गोरगरीब, कष्टकरी तसेच टॅक्सी चालक-मालकांच्या घरात आनंदाची दिवाळी साजरी व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील गरजू कुटुंबांना आनंदाचा शिधा देण्याची संकल्पना मांडली होती. त्याच संकल्पनेतून खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिर्डी परिसरात हा



उपक्रम सातत्याने राबविला जात आहे. डॉ. सुजय दादा विखे पाटील यांच्या प्रेरणेतून स्थापन झालेल्या भीमशक्ती टॅक्सी संघटनेने नेहमीच आपल्या सभासदांच्या हितासाठी विविध उपक्रम राबविले आहेत.

यावेळी बोलताना उपनगराध्यक्ष अभय शेळके यांनी सांगितले की, टॅक्सी चालक हा दिवस-रात्र प्रवाशांची सेवा करणारा घटक आहे. शिर्डीसारख्या तीर्थक्षेत्रात येणाऱ्या लाखो भाविकांच्या सेवेत अहोरात्र झटणाऱ्या या चालकांच्या पाठीशी शासन व लोकप्रतिनिधी खंबीरपणे उभे आहेत. आनंदाचा शिधा हा केवळ शिधा नसून, त्यामागे आपुलकीची आणि माणुसकीची भावना आहे. संस्थापक अध्यक्ष चांगदेव जगताप यांच्या नेतृत्वाखाली संघटना सभासदांच्या कल्याणासाठी चांगले काम करीत असल्याचे गौरवोद्गारही त्यांनी यावेळी काढले. यापुढेही संघटनेच्या सभासदांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन त्यांनी दिले.या कार्यक्रमास नगराध्यक्षा जयश्री ताई थोरात, नगरसेवक नितीन कोते, नगरसेवक निलेश दादा कोते, नंदू गोंदकर सामाजिक कार्यकर्ते नानासाहेब शिंदे यांच्यासह भीमशक्ती टॅक्सी संघटनेचे पदाधिकारी व मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या न्याय्य दरासाठी प्रहार सामाजिक संघटना मैदानात उतरणार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नेवासा : अहिल्यानगर जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या घामाचा योग्य मोबदला मिळावा आणि उसाला रास्त दर मिळावा, या मागणीसाठी सुरू असलेल्या संघर्षाला प्रहार सामाजिक संघटनेने सक्रिय पाठिंबा जाहीर केला आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली सोमवार दि.२३ नोव्हेंबर रोजी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून या मोर्चात प्रहार सामाजिक संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची माहिती युवक जिल्हाध्यक्ष व युवा विधी तज्ञ अँड.पांडुरंग औताडे यांनी दिली.



या आंदोलनाबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना अँड. पांडुरंग औताडे म्हणाले की, ''शेतकऱ्यांच्या घामाला योग्य दाम मिळणे हा त्यांचा हक्क आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या रास्त मागण्यांसाठी प्रहार सामाजिक संघटना खांद्याला खांदा लावून उभी राहणार आहे. केवळ निवेदने देऊन आणि आश्वासने देऊन शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. प्रशासन आणि साखर कारखानदारांनी शेतकऱ्यांच्या मागण्यांवर ठोस निर्णय घ्यावा. २३ नोव्हेंबरच्या मोर्चात प्रहारचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होतील.''

शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताचे संरक्षण व्हावे आणि ऊसदराचा प्रश्न मार्गी लागावा, यासाठी जिल्ह्यातील सर्व ऊस उत्पादक शेतकरी, सामाजिक संघटना तसेच शेतकरी हितचिंतकांनी या मोर्चात सहभागी व्हावे असे आवाहन प्रहार सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर सांगळे, जिल्हा संपर्कप्रमुख बाळासाहेब खर्जुले, जिल्हा उपाध्यक्ष आप्पासाहेब ढूस, तालुकाध्यक्ष जालिंदर आरगडे, तालुका कार्याध्यक्ष अनिल विधाटे, तालुका उपाध्यक्ष पांडुरंग नवले, युवक तालुकाध्यक्ष विकास कोतकर, धरणग्रस्त प्रमुख नागनाथ आगळे आणि युवक जिल्हाध्यक्ष अँड.पांडुरंग औताडे यांनी केले आहे.

दख्खनी मेंढीने दिला तीन कोकरांना जन्म

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील सर्व समावेशक मेंढी सुधार प्रकल्पांतर्गत आंबी (ता. राहुरी) येथील प्रगतशील मेंढपाळ तुकाराम सदू रोडे यांच्या कळपातील एका दख्खनी मेंढीने एकाच वेळी तीन सुदृढ कोकरांना जन्म दिला आहे. यामध्ये दोन नर व एका मादी कोकराचा समावेश आहे. सामान्यतः एका वेळी एकच कोकरू देणाऱ्या दख्खनी मेंढीमध्ये तीन कोकरांचा जन्म होणे ही अत्यंत दुर्मिळ घटना आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील सर्वसमावेशक मेंढी सुधार प्रकल्पातून उपलब्ध झालेल्या सुधारित नरमेंढ्यांचा सातत्यपूर्ण वापर आणि शास्त्रीय संगोपन पद्धतींचा अवलंब करणाऱ्या या मेंढपाळाच्या कळपात घडलेली ही घटना प्रकल्पाच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित करणारी ठरली असल्याचे मेंढी सुधार प्रकल्पाचे प्रमुख डॉ. रविंद्र निमसे यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील स्थानिक दख्खनी मेंढी ही काटकपणा, कमी चाऱ्यावर तग धरण्याची क्षमता आणि स्थानिक हवामानाशी जुळवून घेण्यासाठी ओळखली जाते. या जातीमध्ये बहुतांश वेळा एकच कोकरू जन्माला येते. जुळी कोकरे होण्याचे प्रमाण दोन टक्के पेक्षा कमी असून तिळ्यांचा जन्म हजारात एखाद्या मेंढीमध्ये आढळतो. त्यामुळे स्थानिक दख्खनी मेंढीने तीन कोकरांना जन्म देणे ही मेंढीपालनाच्या दृष्टीने विशेष उल्लेखनीय घटना आहे. महाराष्ट्रातील मेंढीपालन व्यवसाय अधिक फायदेशीर व्हावा, मेंढ्यांचे वजन वाढावे आणि चांगल्या गुणवत्तेची कोकरे मिळावीत या उद्देशाने महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे सन- १९७७ पासून सर्वसमावेशक मेंढी सुधार प्रकल्प कार्यरत आहे. भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शनाखाली आणि केंद्रीय मेंढी व लोकर संशोधन संस्था, अविकानगर, राजस्थान यांच्या तांत्रिक सहकार्याने या प्रकल्पात दख्खनी मेंढ्यांच्या अनुवंशिक सुधारण्याचे काम सुरू आहे. आंबी येथील तुकाराम रोडे हे सन -२०१३ पासून विद्यापीठाच्या मेंढी सुधार प्रकल्पाशी जोडलेले आहेत. रोडे यांच्या अनुभवानुसार सुधारित नरमेंढ्यांचा सातत्याने वापर केल्यानंतर त्यांच्या कळपात जुळी कोकरे जन्माला येण्याच्या घटना वाढल्या आहेत. आता एका दख्खनी मेंढीने तीन कोकरांना जन्म दिल्याने त्यांच्या आनंदात आणखी भर पडली आहे.



लोखंडाच्या साच्यातून घडलेला जलक्रांतीचा प्रवास!..

आयुष्याच्या प्रवासात काही घटना अशा घडतात की, त्या घडताना त्यांच्या ऐतिहासिक महत्त्वाची जाणीव नसते. आपण फक्त आपले काम प्रामाणिकपणे करत असतो. हातात एखादे साधन, समोर लोखंडाचा तुकडा आणि मनात एखादी कल्पना प्रत्यक्षात उतरवण्याची जिद्द असते. अनेक वर्षांनंतर मागे वळून पाहताना जाणवते की, आपल्या हातून घडलेली छोटीशी निर्मिती हजारो लोकांच्या जीवनात बदल घडवणाऱ्या मोठ्या तंत्रज्ञानाचा महत्त्वाचा भाग बनलेली असते.

माझ्या आयुष्यातील असाच एक अविस्मरणीय आणि अभिमानास्पद अनुभव म्हणजे भारतातील जैन इरिगेशन कंपनीसाठी सुरुवातीच्या काळात प्लॅस्टिक ड्रिप इरिगेशन एमिटरच्या टूलचे डिझाइन आणि प्रत्यक्ष बांधणी करण्याची मिळालेली संधी. या टूलचे डिझाइन मी स्वतः केले आणि त्याची प्रत्यक्ष बांधणीही माझ्या हातून झाली. ज्यावेळी मी ह्या कामाला सुरुवात केली तेव्हा माझा वय फक्त साधारणतः १९ ते २० वर्षे असेल. अशाप्रकारे नंतर मी सतत दोन दशक पेक्षा जास्त काळ देश व विदेशात ड्रीप सोबत असे अनेक विविध शेती उपयुक्त पाणी बचत करणारे भाग बनविण्यात माझा प्रत्यक्ष सहभाग नोंदवला व परत गेल्या दोन दशकापासून पाणी संचय, सिंचन व बचत मध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभाग नोंदवत आहे.

आजही त्या सुरवातीच्या दिवसांची आठवण झाली की मनात समाधान निर्माण होते. माझ्या हातांनी घडवलेले ते टूल केवळ प्लॅस्टिकचा छोटासा घटक तयार करण्यासाठी नव्हते; ते भारतीय शेतीला पाण्याचा प्रत्येक थेंब अधिक परिणामकारकपणे वापरण्यास मदत करणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडलेले होते.

भारत हा कृषिप्रधान देश आहे. शेतकरी अनेक पिढ्यांपासून पाऊस, नद्या, विहिरी आणि उपलब्ध पाण्याच्या स्रोतांवर अवलंबून राहिला आहे. शेतीसाठी पाण्याची उपलब्धता आणि त्याचा योग्य वापर हे नेहमीच मोठे आव्हान राहिले आहे. पारंपरिक सिंचनात अनेकदा पाण्याचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असे; काही ठिकाणी पिकांना गरजेपेक्षा अधिक पाणी मिळे, तर काही भागांत पाणीटंचाईमुळे नुकसान होत असे.

अशा परिस्थितीत ठिबक सिंचन तंत्रज्ञानाने शेतीला नवी दिशा दिली. पिकांच्या मुळांजवळ आवश्यक तेवढे पाणी नियंत्रित पद्धतीने पोहोचवण्याच्या या संकल्पनेमागे संशोधन, अभियांत्रिकी, उत्पादन तंत्रज्ञान आणि सातत्यपूर्ण प्रयोगांची मोठी प्रक्रिया होती.

आधुनिक ठिबक सिंचनाच्या विकासात इस्रायलमधील अभियंता सिम्खा ब्लास यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. त्यांच्या संकल्पनेला पुढे व्यावसायिक स्वरूप मिळाले आणि १९६५ मध्ये नेटाफिमच्या माध्यमातून आधुनिक ठिबक सिंचन प्रणालीचा औद्योगिक प्रवास सुरू झाला. भारतातही या तंत्रज्ञानाची गरज ओळखून त्याचा स्थानिक परिस्थितीनुसार विकास आणि प्रसार करण्याचे प्रयत्न सुरू झाले.

याच काळात महाराष्ट्रातील जळगाव येथून भवरलाल जैन अर्थात मोठे भाऊ यांनी भारतीय शेतीच्या परिस्थितीला अनुरूप आधुनिक सिंचन तंत्रज्ञान विकसित करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रयत्न सुरू केला.

जैन समूहाच्या प्रवासाची सुरुवात १९६३ मध्ये कृषीविषयक साहित्य आणि उपकरणांच्या व्यापारातून झाली. पुढे १९८६ मध्ये जैन इरिगेशन सिस्टिम्स लिमिटेडची स्थापना झाली. १९८८ मध्ये जैन ड्रिप प्रणालीचा वापर सुरू झाला आणि १९८९ पासून सूक्ष्म सिंचन तंत्रज्ञानाच्या विकासाला व प्रसाराला अधिक संघटित स्वरूप मिळाले. मोठ्या भावांचे स्वप्न आधुनिक सिंचन तंत्रज्ञान भारतीय शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे आणि पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा चांगला उपयोग घडवणे हे होते. या कल्पनेला प्रत्यक्ष उत्पादनाचे स्वरूप देण्यासाठी मशीन, मोल्ड, टूलिंग, तांत्रिक ज्ञान आणि कुशल हातांची आवश्यकता होती. याच ठिकाणी माझा प्रवास भारतीय शेतीच्या आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडला गेला.

ठिबक सिंचन प्रणालीमध्ये एमिटर किंवा ड्रिपर हा आकाराने अतिशय छोटा, परंतु कार्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा घटक असतो.

पाण्याचा प्रवाह नियंत्रित करणे, ठरावीक प्रमाणात पाणी सोडणे आणि प्रत्येक रोपापर्यंत आवश्यक पाणी पोहोचवणे हे एमिटरचे मुख्य कार्य असते. आज अनेक प्रकारचे ड्रिपर, एमिटर आणि आधुनिक सिंचन प्रणाली उपलब्ध आहेत. मात्र त्या सुरुवातीच्या काळात अशा सूक्ष्म व अचूक प्लॅस्टिक घटकांच्या उत्पादनासाठी टूलिंग विकसित करणे मोठे आव्हान होते.

एमिटरमधील पाण्याच्या प्रवाहासाठी असणाऱ्या सूक्ष्म मार्गांची रचना, त्यांची अचूकता, प्लॅस्टिक मोल्डिंग आणि सातत्यपूर्ण उत्पादनक्षमता या बाबी अत्यंत महत्त्वाच्या होत्या. छोट्या प्लॅस्टिक घटकाच्या मागे किती अभियांत्रिकी ज्ञान असते, याची जाणीव मला या कामातून झाली. जैन इरिगेशनसाठी एमिटरचे टूल विकसित करण्याचे काम माझ्यासमोर आले. तो माझ्या तांत्रिक ज्ञानाची, कौशल्याची, संयमाची आणि आत्मविश्वासाची परीक्षा घेणारा अनुभव होता.

मोल्ड मेकिंग हा केवळ मशीनवर चालणारा उद्योग नाही; तो कल्पनाशक्ती, तांत्रिक विचार, अनुभव आणि कौशल्य यांचा संगम आहे. प्लॅस्टिक घटकाचे उत्पादन करण्यापूर्वी त्याच्या प्रत्येक सूक्ष्म आकाराचा विचार करावा लागतो. टूलचे डिझाइन, स्टीलची निवड, मशीनिंगची अचूकता, कोअर-कॅव्हिटीची जुळवणी, प्लॅस्टिकचा प्रवाह आणि घटकाची कार्यक्षमता यांचा एकत्रित अभ्यास आवश्यक असतो.

या कामात एमिटर टूलचे डिझाइन आणि प्रत्यक्ष बांधणी करण्याची जबाबदारी मी स्वतः घेतली होती. त्यामुळे टूलमधील प्रत्येक माप आणि प्रत्येक सूक्ष्म आकारामागील तांत्रिक कारण माझ्यासाठी महत्त्वाचे होते. प्रत्येक मशीनिंग ऑपरेशनमागे विशिष्ट उद्देश होता.

त्या काळात आजच्या सारख्या प्रगत अत्याधुनिक यंत्रसामग्री किंवा संगणकीय विश्लेषणाची साधने सहज उपलब्ध नव्हती. त्यामुळे टूल मेकरचे अनुभवाधारित ज्ञान, निरीक्षणशक्ती, मोजमापातील अचूकता आणि समस्यांवर स्वतः उपाय शोधण्याची क्षमता यांना विशेष महत्त्व होते. ड्रॉइंगमधील मापे पूर्ण करण्याबरोबरच तयार होणारा प्लॅस्टिक घटक अपेक्षित कार्य करतो की नाही, हेही तपासणे आवश्यक होते.

एमिटरच्या आतील सूक्ष्म रचनेमुळे पाण्याचा प्रवाह नियंत्रित होणार होता. त्यामुळे टूलची अचूकता आणि घटकाची कार्यक्षमता यांचा जवळचा संबंध होता. स्टीलवरील मशीनिंग, मोजमाप, फिटिंग, जुळवणी आणि फिनिशिंग या प्रत्येक टप्प्यावर काळजी घ्यावी लागत होती. साधा स्टीलचा तुकडा हळूहळू अचूक इंजेक्शन मोल्डमध्ये रूपांतरित होताना पाहणे हा अविस्मरणीय अनुभव होता. त्या टूलमधून भारतीय शेतकऱ्याच्या शेतापर्यंत पाण्याचा थेंब पोहोचवणाऱ्या तंत्रज्ञानाला आकार मिळत होता.

भारतात ठिबक सिंचनाच्या प्रसारात जैन इरिगेशनचे योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे. भवरलाल जैन अर्थात मोठे भाऊ यांनी भारतीय शेतीच्या परिस्थितीनुसार आधुनिक सिंचन तंत्रज्ञान विकसित करून ते शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. परदेशी तंत्रज्ञानाचा भारतात प्रभावी वापर करण्यासाठी स्थानिक उत्पादनक्षमता उभी करणे आवश्यक होते. प्लॅस्टिक पाइप, ड्रिप ट्यूब, एमिटर, फिटिंग्ज आणि स्प्रिंकलर यांच्या निर्मितीमागे अनेक अभियंते, संशोधक, टूल मेकर्स, तंत्रज्ञ आणि कामगारांचे योगदान असते.

या व्यापक औद्योगिक प्रवासात माझ्याही हातून एक महत्त्वाचे काम घडले. जैन इरिगेशनसाठी सुरुवातीच्या काळातील एमिटर टूलचे डिझाइन आणि प्रत्यक्ष बांधणी करण्याचा अनुभव माझ्या आयुष्यातील अभिमानाचा विषय आहे.

या घटनेचा उल्लेख मी केवळ स्वतःचे कौतुक करण्यासाठी करत नाही. कोणतेही मोठे तंत्रज्ञान एका व्यक्तीच्या प्रयत्नांतून पूर्ण होत नाही. त्यात संशोधक, उद्योजक, अभियंते, टूल मेकर्स आणि उत्पादन क्षेत्रातील असंख्य कामगारांचे योगदान असते. या सामूहिक प्रयत्नांत माझ्या हातून घडलेल्या कामाचेही स्वतंत्र स्थान होते, ही जाणीव मला आयुष्यभर प्रेरणा देत राहिली.

आज त्या काळाचा विचार केला की एक चित्र डोळ्यांसमोर उभे राहतेएका बाजूला कारखान्यात मशीनवर काम करणारा टूल मेकर आणि दुसऱ्या बाजूला उन्हात शेतात कष्ट करणारा भारतीय शेतकरी. दोघांची कामे वेगळी असली, तरी त्यांना जोडणारा दुवा होता आधुनिक सिंचन तंत्रज्ञान.

लोखंडाच्या टूलमधून तयार होणारा छोटासा प्लॅस्टिक एमिटर हा मोठ्या सिंचन प्रणालीतील महत्त्वाचा घटक होता. त्याच्या माध्यमातून पाण्याचा प्रवाह नियंत्रित होत होता. कारखान्यात स्टीलवर केलेल्या सूक्ष्म मशीनिंगचा संबंध शेतातील पाण्याच्या एका थेंबाशी, त्या थेंबाचा रोपाच्या वाढीशी, शेतकऱ्याच्या उत्पादनाशी आणि त्याच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाशी जोडला जातो. या जाणिवेमुळे माझ्या कामाला वेगळाच अर्थ प्राप्त झाला. मी केवळ एमिटरचे टूल बनवत नव्हतो; भारतीय शेतीच्या आधुनिकीकरणात माझ्या परीने हातभार लावत होतो.

आयुष्यात काही कामांतून पैसा, काहींतून अनुभव किंवा प्रतिष्ठा मिळते; पण काही कामे आयुष्यभराचे आत्मिक समाधान देतात. जैन इरिगेशनसाठी एमिटर टूलचे डिझाइन आणि बांधणी करणे माझ्यासाठी असेच काम होते. त्या वेळी अचूक टूल तयार करणे आणि आपल्या कौशल्याला न्याय देणे हेच माझे ध्येय होते. आज मागे वळून पाहताना जाणवते की, माझ्या कौशल्याचा उपयोग एका व्यापक सामाजिक आणि कृषी परिवर्तनाशी जोडला गेला.

मी भारतीय ठिबक सिंचन तंत्रज्ञानाचा शोधकर्ता नव्हतो किंवा जैन इरिगेशनचा संस्थापकही नव्हतो. मात्र या तंत्रज्ञानाला प्रत्यक्ष उत्पादनाचे स्वरूप देण्यासाठी आवश्यक असलेल्या प्लॅस्टिक इंजेक्शन मोल्डिंग टूलिंगच्या कामात माझे स्वतंत्र आणि प्रत्यक्ष योगदान होते.

माझ्यासाठी हाच खरा अभिमान आहे!



लेखक-
भिला सोनू पाटील
(जल अभ्यासक)
जल प्रहरी पुरस्कार विजेते, जल शक्ती मंत्रालय,भारत सरकार.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26)

द•ख•ल

ऊस्थळ दुमाला सोसायटीच्या अध्यक्षपदी त्रिंबक भदगले



नेवासा : शेतकरी संघटनेचे संस्थापक व दिवंगत शेतकरी नेते स्वर्गीय शरद जोशी यांच्या विचारसरणीने प्रेरित होऊन शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने संघर्ष करणारे युवा शेतकरी त्रिंबक रघुनाथ भदगले यांची उस्थळ दुमाला विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी निवड करण्यात आली आहे. शेतकऱ्यांसाठी रस्त्यावर उतरून आंदोलने करणाऱ्या, उपोषण, रास्ता रोको, हरताळ आणि न्यायालयीन लढ्यांतून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या कार्यकर्त्याला सहकार क्षेत्रात नेतृत्वाची संधी देण्याचा संचालक मंडळाचा निर्णय सध्या शेतकरी संघटनेच्या वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे. भदगले यांनी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून शेतमालाला न्याय्य भाव, कर्जमुक्ती, पीकविमा, शेतकरी अपघात विमा आणि नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासकीय मदत मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे. त्यांच्या निवडीबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

दुष्काळग्रस्त शेतकरी, शेतमजूर व लघुव्यावसायिकांची वीजबिले माफ करा : मागणी

आधी : संगमनेर तालुक्यातील दुष्काळग्रस्त शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण भागातील छोटे व्यावसायिक आणि गाळेधारक यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी घरगुती वीजबिले माफ करावीत, तसेच स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती थांबवावी, अशी मागणी भाऊ प्रतिष्ठानचे अध्यक्ष विकास भाऊसाहेब गायकवाड यांनी महावितरणच्या संगमनेर विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. दुष्काळसदृश परिस्थिती, शेतीमालाला मिळणारा कमी भाव, वाढता उत्पादन खर्च आणि रोजगाराचा अभाव यामुळे ग्रामीण भागातील नागरिक आर्थिक अडचणीत आहेत. त्यामुळे शेतकरी व शेतमजूर कुटुंबांची घरगुती वीजबिले पूर्णतः माफ करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवावा. तसेच लहान व्यावसायिक व गाळेधारकांसाठी विशेष सवलत योजना लागू करावी, अशी मागणी निवेदनात केली आहे. स्मार्ट मीटर बसविण्यापूर्वी ग्राहकांना पूर्वसूचना द्यावी, मीटरची अचूकता तपासून अहवाल उपलब्ध करून द्यावा आणि बिलिंगमध्ये पारदर्शकता ठेवावी. ग्राहकांच्या तक्रारींचे निराकरण होईपर्यंत स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती स्थगित करावी, असेही त्यांनी म्हटले आहे. वीजपुरवठा खंडित करण्यापूर्वी कायदेशीर नोटीस द्यावी आणि चुकीच्या वीजबिलांची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. या मागण्यांवर कार्यवाही न झाल्यास वरिष्ठ कार्यालयासह महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे दाद मागण्यात येईल, असा इशारा गायकवाड यांनी दिला आहे.

बेलापूर मेनरोड हनुमान मंदिरात शनिवारी अन्नकोट उत्सव



बेलापूर : येथील प्रसिद्ध मेनरोड हनुमान मंदिरात दरवर्षीप्रमाणे येत्या शनिवारी (दि. २१) सायंकाळी ७ वाजता अन्नकोट उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. बेलापूर येथे पूर्व (नवशा हनुमान), पश्चिम(मेनरोड), उत्तर(बाजारवेस) व दक्षिण (पाणदरवाजा) असे चारही दिशांना मुख असलेली हनुमानाची मंदिरे आहेत. यापैकी मेनरोडवरील हनुमान मंदिर पश्चिममुखी आहे. या मंदिरात दरवर्षी अन्नकोट उत्सव भक्तिभावाने साजरा केला जातो.

यंदाही हा उत्सव शनिवारी साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त सायंकाळी ७ वाजता हनुमान मंदिरात आरती होणार असून, त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. अन्नकोटसाठी भाविकांना नैवेद्य द्यावयाचा असल्यास त्यांनी चैतन्य दायमा (८६९९७००२८) व सुनील व्यास (९८६०११९०७६) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अन्नकोट उत्सवानिमित्त आयोजित आरतीस भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे तसेच महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन चैतन्य दायमा, रमेश कुटे, गणेश अग्रवाल, सुनील व्यास, गिरीश हरकूट, हेमंत मुंडलिक, निखिल झंवर, रोहित नागले आर्दीनी केले आहे.

गोमातेची कत्तल करून रक्त मिश्रित पाणी नदीत सोडल्याचा प्रकार

हिंदू समाजाकडून चौकशीची मागणी



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : गोमातेची बेकायदेशीर कत्तल करत त्यांचे रक्त मुळा नदीत सोडण्याचा निंदनीय प्रकार राहुरीत उघडकीस आला असून या प्रकाराची तात्काळ चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी सकल हिंदू समाजाने केली आहे.

याबाबत तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नदीपात्रात एका ठिकाणावरून लालसर रंगाचे रक्तमिश्रित संशयित पाणी नदीपात्रात सोडले जात असून यामुळे नदीतील पाणी प्रदूषित होत आहे त्याचप्रमाणे हे पाणी गोमातेचे कत्तल करून निघणारे रक्त व मांस व इतर घातक घटकांचे असून हे पाणी नदीतील पाण्यास प्रदूषित करत असल्याने यामुळे नदीतील जलचर प्राणी आणि नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे या दुषित पाण्याचे प्रदूषण मंडळाने नमुने घ्यावे या भागातील कत्तल खाण्यांना परवाना देण्यात आला आहे काय नदीपात्रात सोडण्यात आलेल्या पाण्याचे नमुने प्रयोगशाळेत तपासणी करण्यात यावेत तसेच या ठिकाणचा स्थळ पंचनामा करण्यात यावा, तसेच अनधिकृत कत्तलखाने बंद करावे

दोषी व्यक्ती किंवा संस्थांवर कारवाई करावी. अधिकारी या दोषी लोकांना पाठीशी घालत असतील तर त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली असून यामुळे अनधिकृत कत्तल खाने चालविणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. ही चौकशी करण्यासाठी घटनास्थळाचा व्हिडिओ, फोटो ग्राफ, आणि स्थळाचे वर्णन सोबत जोडण्यात आले आहे.

महावितरणचा गलथान कारभार ३० हजारांचे बिल ग्राहकाच्या माथी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : चुकीच्या वीज बिलाची चौकशी करून बिल कमी करण्याऐवजी महावितरण कडून घरगुती ग्राहकाची वीज खंडित करून आगाऊ रक्कम भरणा करून घेवून नंतर उर्वरित रक्कम परत करण्यास टाळाटाळ होत असल्याने महावितरण कंपनीने ज्याप्रमाणे ग्राहकाकडून बिल भरण्यास विलंबाचा आकार आकारला जातो त्याप्रमाणे आगाऊ रक्कमेवर व्याज देण्याची मागणी राहुरी येथील व्यापारी संतोष लोढा यांनी केली आहे. याबाबत दिलेल्या तक्रारीत त्यांनी म्हटले आहे की माझे राहुरी शहरात असलेल्या असलेल्या घरगुती मीटर मधून अनेक दिवसापासून मीटर रिडिंग घेतलेले नाही याबाबत कुठलाही महावितरण चा कर्मचारी मीटर रिडिंग साठी आलेला नाही. या संदर्भात मी वीज मंडळाकडे तक्रार केली आहे. त्यानंतरही ऑगस्ट २०२६ या महिन्यात परत चुकीचे वीज बिल आले त्यानंतर मी महावितरण कडे असलेले अधिकारी चारभे यांच्याकडे तक्रार केली दोन तीन वेळा प्रत्यक्ष भेट घेतली मात्र त्यांच्याकडून मला स्मार्ट मीटर बसून देण्यात आले त्यानंतर नोव्हेंबर महिन्यात दुसऱ्या आठवड्यात सर्व मिळून मला ३०,६०० रुपयांचे बिल आकारणी करून बिल देण्यात आले. आणि शनिवारी १४ नोव्हेंबर रोजी माझा वीज पुरवठा खंडित करण्यात आला त्यामुळे घरात वीज नसल्याने मी रविवारी १५ नोव्हेंबर २०२६ रोजी ३०५४३ रुपयाचे बिल भरणा केला. त्यानंतर मला वीज पुन्हा सुरू करण्यात आली. त्यानंतर दि.१६ नोव्हेंबर २०२६ रोजी मी मागील रिडिंग फोटो व सध्याचे रिडिंग फोटो घेऊन कार्यालयात गेलो असता बिल दुरुस्ती करून ४४६०रुपयांचे बिल मला देण्यात आले. परंतु मी भरणा केलेली रक्कम ३०५४३ असताना उर्वरित रक्कम २६०८३ रुपये मला मागे रिफंड करणे आवश्यक असताना ती रक्कम यापुढील बिलातून वजा करण्यात येईल असे सांगितले. वास्तविक मी ३०५४३ ही रक्कम उधार उसनवारी करून भरणा केली असताना महावितरण कडून मुदतीत बिल भरणा न केल्यास ग्राहकाकडून अतिरिक्त दंड करून रक्कम वसुली केली जाते त्याच प्रमाणे आता माझ्या आगाऊ रकमेसाठी मला रोख रिफंड मिळावा अन्यथा बँक व्याज दरा प्रमाणे रक्कम मिळावी अशी मागणी लोढा यांनी केली आहे. याबाबतचे निवेदन त्यांनी महावितरण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले आहे.

चिमुकल्या वेदच्या भजनाने जिंकली उपस्थितांची मने

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



संगमनेर : घुलेवाडी येथील राऊत-पवार कुटुंबीयांच्या नामकरण सोहळ्यात चिमुकल्या वेद राजेंद्र मुरादे याने सुरेल भजन सादर करून उपस्थितांची मने जिंकली. स्वतः हार्मोनियम वाजवत गोड आवाजात विठ्ठलनामाचा गजर केल्याने सोहळ्याचे वातावरण भक्तिमय झाले. नामकरण सोहळ्यात वेदने आत्मविश्वासाने भजन सादर केले. त्याच्या निरागस आणि सुरेल स्वरांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. त्याच्या सादरीकरणाला उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात उत्स्फूर्त दाद दिली.

नारायणगाव येथे वास्तव्यास असलेले राजेंद्र मुरादे यांच्या कुटुंबातील वेद याला लहान वयातच भजन, कीर्तन आणि वारकरी संप्रदायाची आवड निर्माण झाली आहे. संतांचे अभंग, विठ्ठलनाम आणि आध्यात्मिक परंपरेची गोडी त्याने जोपासली आहे.

महाराष्ट्राच्या समृद्ध संतपरंपरेचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे काम अशा बालकांच्या माध्यमातून होत आहे. वेदच्या कलागुणांचे उपस्थितांनी कौतुक करून त्याच्या पुढील संगीत प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. चिमुकल्या वेदच्या या सादरीकरणामुळे नामकरण सोहळ्याची रंगत अधिकच वाढली.

रायफल शूटिंगमध्ये प्रसाद तुजारेचे यश; राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



राहुरी : राहुरी येथील बिहाणी शिक्षण संस्था संचलित विद्यामंदिर कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता अकरावी (शास्त्र शाखा) चा विद्यार्थी प्रसाद प्रवीण तुजारे याने रायफल शूटिंग स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. जिल्हास्तरीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवत रोप्यपदक पटकावणाऱ्या प्रसादची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. राहाता पिस्तोल अँड रायफल शूटिंग स्पोर्ट्स असोसिएशनच्या डी. के. स्पोर्ट्स क्लब, लोणी (राहाता शाखा) यांच्या वतीने संस्थेच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त खुल्या जिल्हास्तरीय पिस्तोल व रायफल शूटिंग स्पर्धा २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत प्रसादने १७ वर्षांखालील मुलांच्या एअर रायफल गटात सहभाग घेत उत्कृष्ट कामगिरी केली. त्याने मिळवलेल्या गुणांच्या आधारे आगामी राज्यस्तरीय पिस्तोल व रायफल शूटिंग स्पर्धा २०२७ साठी त्याची निवड करण्यात आली आहे. तसेच शूटिंगमधील सुरक्षितता, शस्त्र हाताळणीचे नियम आणि तांत्रिक ज्ञान याबाबतच्या विशेष प्रशिक्षणासाठीही त्याची निवड झाली आहे. प्रसादला क्रीडा शिक्षक प्रा. मनोज जाधव, पंकज जगताप व मनोज सुपेकर यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा प्रभावतीताई बिहाणी, सचिव मनोज बिहाणी, सहसचिव अनुप बिहाणी, नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, प्रभारी मुख्याध्यापक राहुल जगताप, ज्येष्ठ शिक्षक बाबासाहेब गुंजाळ यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

पिंपळस येथे प्रवरेच्या कृषिदूतांचे आगमन



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

लोणी : राहाता तालुक्यातील पिंपळस येथे कृषी महाविद्यालय, लोणी येथील कृषिदूतांचे आगमन झाले आहे. यावेळी शेतकऱ्यांनी या कृषिदूतांचे स्वागत केले. लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे व महात्मा फुले कृषी विद्यापीठ संलग्नित कृषी महाविद्यालय, लोणी येथे हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रेरणेने व संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ सुस्मिता विखे पाटील, कृषी संचालक डॉ उत्तमराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कृषी महाविद्यालय लोणीचे प्राचार्य प्रा.अमोल खडके , कार्यक्रम समन्वयक डॉ. रमेश जाधव, कार्यक्रम अधिकारी डॉ. विक्रम अनाप आणि प्रा. अक्षया वाळुंज यांच्या सूचनेनुसार कृषिदूत सुजित काळे, सुमित कळसकर, शेखर कोठारे, मयूर रोटकर, कवितके मिरानंद हे पिंपळस येथील शेतकऱ्यांचे अनुभव जाणून घेत त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. या प्रसंगी तालुका विस्तार अधिकारी सुनील माळी, ग्रामपंचायत अधिकारी युवराज देशमुख, कृषी सहाय्यक अजय धिमते, ग्रामपंचायत कर्मचारी राहुल बनसोडे आणि इतर ग्रामस्थ यांनी स्वागत केले. कृषी शिक्षणाच्या माध्यमातून हे कृषिदूत येथील शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती, बीजप्रक्रिया , गांडूळखत उत्पादन, चारा पिके, दुग्ध व्यवसाय, बायोगॅस इ. संदर्भात माहिती देणार आहे.

निंभारीच्या प्रगत बिग बागायतदार सोसायटीच्या चेअरमनपदी भरत संपत जाधव



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नेवासा : तालुक्यातील निंभारी येथील प्रगत बिग बागायतदार विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी भरत संपत जाधव तर व्हाईस चेअरमनपदी नंदाबाई पवार यांची निवड करण्यात आली. या निवडीमुळे गावातील सहकार क्षेत्रात नव्या नेतृत्वाची सुरुवात झाली असून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांवर सभासदांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. सदर निवड प्रक्रिया सहाय्यक निबंधक तथा निवडणूक अधिकारी योगेश नर्सिंग पुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी संस्थेच्या संचालक मंडळाच्या उपस्थितीत निवडीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. यावेळी संचालक मंडळातील किसनाबाई आणा भाऊ जाधव, कल्याण आनंद जाधव, अँड.भागवत शिरसाठ, बाबासाहेब पवार, आप्पासाहेब जाधव, भरत जाधव, नंदाबाई पवार, भाऊसाहेब गर्दे, संतोष पाटील पवार, करणा साहेब जाधव, दादासाहेब जाधव, पांडुरंग जाधव आणि शांतीलाल जाधव आदी उपस्थित होते.संस्थेचे सचिव हरिभाऊ पवार, सहाय्यक सचिव श्री. लोणारे आणि शिपाई राजू जाधव यांनी निवड प्रक्रियेच्या कामकाजात सहभाग घेतला. यावेळी गावातील अण्णाभाऊ जाधव, चंद्रकांत पवार, संजय पवार, विजय जाधव, बाबासाहेब शिरसाठ, प्रकाश पवार, विशाल जाधव आणि जनार्दन गवळी यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. निवड प्रक्रिया यशस्वी पार पाडण्यासाठी पोलीस पाटील संतोष पवार यांनी मोलाचे सहकार्य केले. यावेळी बाबासाहेब पवार यांनी उपस्थितांचे आभार मानले, तर अँड. भागवत शिरसाठ यांनी समारोप केला.

सत्यमेव जयते सुप्रभात ग्रुपच्या अध्यक्षपदी देविदास देसाई

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

बेलापूर : येथील सामाजिक कार्यात सातत्याने अग्रेसर असणाऱ्या सत्यमेव जयते सुप्रभात ग्रुपच्या नूतन कार्यकारिणीची निवड एकमताने करण्यात आली. ग्रुपच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार देविदास देसाई, तर उपाध्यक्षपदी दिलीप अमोलिक व बाबुभाई पठाण यांची निवड करण्यात आली. ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष स्व. विष्णुपंत डावरे यांच्या निधनामुळे नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यावेळी सचिवपदी पुंजाहरी सुपेकर, सहसचिवपदी संजय भोंडगे आणि खजिनदारपदी राधेश्याम अंबिलवाडे यांची निवड झाली. बाजार समितीचे माजी उपसभापती अभिषेक खंडागळे यांनी पदाधिकाऱ्यांच्या नावांची सूचना मांडली, तर प्रा. निजाम शेख यांनी त्यास अनुमोदन दिले. निवडीनंतर विजय स्तंभ चौकात नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते हाजी इस्माईल शेख यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते व ग्रुपचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नेवासा नगरपंचायत, नेवासा, जि. अहिल्यानगर
जाहीर निविदा सूचना

अ.क्र.	कामाचे नाव	निविदा इसारा	कोरे निविदा फॉर्म
१.	स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना) २.० अंतर्गत नेवासा नगरपंचायतीस, IEC (Information, Education and Communication) द्वारे नेवासा शहरात स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०२६ बाबत जनजागृती करणेसाठी पथनाट्य, वाल पेंटिंग, शाळेत प्रचार व इतर अनुषंगिक कामे करणे.	रु.१०००/-	रु.५००/-

वरील कामाच्या अटी, शर्ती व निविदा फॉर्म नेवासा नगरपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत दि. १९/११/२०२६ ते दि.२७/११/२०२६ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत पहावयास व भरण्यास मिळतील.

जा.क्र. १६०१/२०२६
दिनांक :१८/११/२०२६

शिक्का

(निखिल फराटे)
मुख्याधिकारी
नेवासा नगरपंचायत, नेवासा

वांबोरी चारी टप्पा-२ मधून शिंगवे तुकाई गावाला पाणी द्या!

अन्यथा अर्ध नग्न आंदोलन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



नेवासा : तालुक्यातील शिंगवे तुकाई हे गाव कमी पर्जन्यमानाच्या क्षेत्रात येत असून, गावातील शेतकरी पाटपाण्यापासून वंचित आहेत. गावातील बंधारे वांबोरी चारीच्या पाण्याने भरून मिळावेत, तसेच वांबोरी चारी टप्पा-२ मध्ये शिंगवे तुकाई गावाचा समावेश करण्यात यावा, या मागणीसाठी ग्रामस्थांनी पुन्हा आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. वांबोरी चारी टप्पा-२ मधून शिंगवे तुकाई गावाला पाणी न दिल्यास शिंगवे तुकाई ग्रामस्थांनी अर्ध नग्न आंदोलनाचा इशारा जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

निवेदनात म्हटले आहे की मागील अनेक महिन्यांपासून लोकप्रतिनिधी व संबंधित विभागाकडून आश्वासने मिळत असली, तरी प्रत्यक्षात प्रश्न मार्गी लागत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.सन २०२५ मध्ये शिंगवे तुकाई येथील ग्रामस्थांनी तुकाई देवी मंदिर परिसरात उपोषण केले होते. त्यावेळी आमदार विठ्ठलराव लंघे पाटील आणि मुळा पाटबंधारे विभागाच्या अभियंता सायली पाटील यांनी आंदोलन स्थळी भेट देऊन लवकरच प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले होते.

तसेच जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासोबत बैठक घेऊन वांबोरी चारी टप्पा-२ मधून गावाला पाणी उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक कार्यवाही करण्याचे सांगण्यात आले होते. मात्र, या आश्वासनांची अद्याप पूर्तता झालेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.त्यानंतर १ सप्टेंबर २०२६ रोजी ग्रामस्थांनी मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यालयासमोर दोन दिवस उपोषण केले. मात्र, प्रशासनाकडून अपेक्षित दखल घेतली गेली नसल्याने संतप्त शेतकऱ्यांनी तिसऱ्या दिवशी मुख्यमंत्री यांच्या वर्षा निवासस्थानी अर्धनग्न मोर्चा काढला होता. यावेळी आ. लंघे यांनी शेतकऱ्यांसमोर येऊन १५ दिवसांच्या आत जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासोबत बैठक घेऊन वांबोरी चारी क्रमांक २ मध्ये शिंगवे तुकाई गावाचा समावेश करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले होते.

मात्र, दोन महिने उलटूनही या आश्वासनावर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने शेतकऱ्यांचा संयम सुटत चालला आहे. त्यामुळे आता दि. २ डिसेंबर रोजी मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यालयासमोर अर्धनग्न आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे. या निवेदनावर शेतकरी कारभारी पवार, संभाजी होंडे, ज्ञानदेव पवार, अरविंद सावंत, बाळासाहेब सावंत, बाळासाहेब होंडे, कडूभाऊ पुंड, विठ्ठल पवार, विजय गवळी, हरिभाऊ शिंदे, पांडुरंग होंडे व रायभान पवार यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदन सादर करताना संबंधित शेतकरी उपस्थित होते. आश्वासनांपलीकडे जाऊन आता प्रत्यक्ष पाणी कधी मिळणार, हा सवाल शिंगवे तुकाईच्या शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

संगमनेरच्या विकासासाठी शिवसेना कटिबद्ध : आ खताळ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



संगमनेर : तालुक्यात सत्तांतर झाल्यानंतर सर्वसामान्य जनतेच्या अपेक्षा वाढल्या आहेत. मात्र, आजही अनेक वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव असून, नागरिकांना छोट्या-छोट्या प्रश्नांसाठी संघर्ष करावा लागत आहे. तळागाळातील सर्व सामान्य जनतेच्या अडीअडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी शिवसेनेच्या शाखा प्रभावीपणे कार्यरत राहतील. विकास कामां बरोबरच प्रत्येक कुटुंबाला न्याय, गरजू व्यक्तींना आधार व महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत, अशी ग्वाही आमदार अमोल खताळ यांनी दिली.

शहरालगत कासारा दुमाला शिवारातील भराडवस्ती येथील टेंभी नाका येथे शिवसेना शाखेचे उद्घाटन आमदार खताळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख रमेश काळे, शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी, युवा सेनेचे उपजिल्हाप्रमुख सौरभ देशमुख,तालुकाप्रमुख सुशील शेवाळे शहरप्रमुख सार्थक शेवाळे, शाखा प्रमुख सचिन शिंदे, गोरख शिंदे, व संजय चव्हाण यांच्यासह शिवसैनिक, महिला आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> शासकीय जागांवरील २०११ पूर्वीच्या अतिक्रमणांच्या नियमितीकरणाबाबत शासनाने निर्णय घेतला आहे. यासंदर्भातील समितीचे अध्यक्षपद आपल्याकडे आहे. संबंधित नागरिकांकडे आवश्यक पुरावे आणि कागदपत्रे असल्यास त्यांची तपासणी करून नियमानुसार पात्र कुटुंबांच्या घरांच्या नोंदी आणि नियमितीकरणाबाबत दिलासा देण्यासाठी प्रयत्न केले जातील.
>
> **-अमोल खताळ, आमदार संगमनेर**

निवडणुका येतील आणि जातील; मात्र पुढील पिढीला उच्च शिक्षण, रोजगार आणि व्यवसायाच्या संधी मिळाल्या पाहिजेत. आजच्या मुलांनी उद्याचे उद्योजक बनून इतरांना रोजगार देणारी पिढी निर्माण करावी. संगमनेरमध्ये आरोग्यसेवेच्या प्रश्नांवरही लक्ष केंद्रित करण्यात येत आहे. महिलांसाठी घुलेवाडी येथे १०० खाटांचे रुग्णालय मंजूर झाले असून, लवकरच आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर संगमनेरला भेट देऊन येथील आरोग्यव्यवस्थेचा आढावा घेणार आहेत. औद्योगिक क्षेत्रातील कामगारांना ईएसआयसीच्या आरोग्यसेवेसाठी नगर किंवा नाशिक येथे जावे लागू नये, यासाठी संगमनेरमध्येच ही सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने पाठपुरावा करण्यात आला आहे. संबंधित सेवा लवकरात लवकर सुरू करण्याच्या सूचनाही देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

मोटार व केबल चोरीच्या सत्राने शेतकरी त्रस्त, आठवड्यात तपास न लागल्यास आंदोलन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : तालुक्यातील वळदगाव शिवारात गेल्या महिनाभरापासून शेतातील वीज मोटारी, सोलर मोटारी, सोलर पॅन तसेच केबल चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. मागील महिन्यात आठ मोटारी चोरीला गेल्यानंतर काल रात्री पुन्हा चार मोटारी चोरीस गेल्याची घटना घडली आहे. या वाढत्या चोऱ्यांमुळे शेतकरी वर्गात तीव्र संताप व्यक्त होत असून पोलिस प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली जात आहे. आधीच दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. उपलब्ध असलेल्या अत्यल्प पाण्यावर पिके जगविण्यासह गुरेढोरे सांभाळण्यासाठी शेतकऱ्यांची मोठी कसरत सुरू आहे. अशा परिस्थितीत शेतातील मोटारी व केबल चोरीला जात असल्याने शेतकऱ्यांसमोर नवे संकट उभे राहिले आहे. मोटारी चोरीला गेल्याने शेतीला पाणी देण्याची व्यवस्थाही विस्कळीत होत आहे. या चोरीच्या घटनांचा तातडीने तपास करून चोरट्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.तशा आशयाचे निवेदन देण्यात आले असून येत्या आठ दिवसांत चोरीच्या घटनांचा तपास लागला नाही तर श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन करण्यात येईल असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जितेंद्र भोसले यांनी दिला आहे. यासंदर्भातील निवेदन बेलापूर आऊट पोस्टचे हेड कॉन्स्टेबल भिंगारदे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जितेंद्र भोसले, तालुका काँग्रेसचे अध्यक्ष बाळासाहेब भोसले, अशोक कारखान्याचे माजी संचालक विराज भोसले, बाळासाहेब मुंगसे, पोलीस पाटील शिवाजी भोसले, शरद नवले, अशोक भोसले, बाबासाहेब शेटे, मधुकर भोसले, शिवाजी माळी, जयकुमार धुमाळ, किशोर कांडेकर, अण्णासाहेब गार्डे, प्रकाश भोसले आदींसह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पान १ वरुन

'मविआ'ची स्थापनाच हिंदुत्वविरोधी..!

मेहता यांनी केला. महाविकास आघाडीच्या स्थापनेवर बोट ठेवताना मेहता म्हणाले की, बाळासाहेब ठाकरे यांनी हिंदुत्वाच्या विचारांवर शिवसेनेची स्थापना केली होती. २०१९ ची निवडणूक भाजप आणि शिवसेनेने युती म्हणून लढवली होती. मात्र, निवडणुकीनंतर ही युती तोडून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत सरकार स्थापन करणे हा जनतेचा अपमान होता आणि पक्षाच्या मूळ विचारधारेच्या विरोधात होते. त्यातच राष्ट्रवादीचे दोन मंत्री तुरुंगात गेल्याने शिवसेनेचे अनेक आमदार आणि कार्यकर्ते नाराज होते. याच नाराजीतून शिंदे गटाच्या ३८ आमदारांनी एकत्र येत महाविकास आघाडीचा पाठिंबा काढून घेतला आणि २८ जून रोजी सरकार स्थापनेचा दावा केला. परिणामी, तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे सभागृहात बहुमत सिद्ध करू शकले नाहीत, असे मुद्दे मेहता यांनी न्यायालयासमोर मांडले.

दुष्काळातही फुलणार संसाराची स्वप्ने

दुष्काळ कितीही भीषण असला, तरी माणुसकी आणि प्रशासकीय इच्छाशक्तीच्या बळावर त्यावर मात करता येते, हेच या उपक्रम ातून सिद्ध होत आहे. तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि ग्रामपातळीवरील यंत्रणेने समन्वयाने ही मोहीम राबवावी, असे निर्दे श प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. या संवेदनशील निर्णयामुळे दुष्काळाच्या काळ्या ढगांमध्येही अनेक गरिबांच्या घरात आनंदाची नवी पहाट उजाडणार असून, लेकीच्या लग्नाचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

नियमात न बसणारे ३०० प्रकल्प मुख्यमंत्र्यांच्या मर्जीतील बिल्डरांना

केंद्राकडे केलेली आहे आणि केंद्राने अद्याप महाराष्ट्राला मदत केली नाही. या उलट मुंबईत एसआरए घोटाळा जो सध्या सुरू आहे, ३०० प्रकल्प जे आहेत, जे एसआरएमध्ये बसत नाहीत, तरीही मुख्यमंत्र्यांच्या मर्जीमधल्या बिल्डरांसाठी, जिथे झोपड्या नाहीत, अशा जमिनीसुद्धा एसआरए प्रकल्पामध्ये घेऊन मुंबईच्या आणि महाराष्ट्राच्या महसुलाचं जवळजवळ ४० हजार कोटींचं नुकसान केलंय. म्हणजे अर्थव्यवस्था जरी डळमळीत झाली असली, तरी पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांच्या म्हणजे फडणवीसांच्या मर्जीमधले बिल्डर आणि उद्योगपती प्रचंड पैसा महाराष्ट्र आणि देश लुटून कमावतात अशी टीका राऊत यांनी केली मुंबई महानगरपालिका ही देशातली सगळ्यात महत्त्वाची महानगरपालिका आहे. मुंबई हे देशाची जर तुम्ही आर्थिक राजधानी म्हणत असाल किंवा औद्योगिक राजधानी म्हणत असाल, त्या राजधानीतली, त्या कॅपिटल सिटीतली महापालिका म्हणजे मुंबई, त्या मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे, त्यांनी एक प्रदीर्घ पत्र लिहून मुख्यमंत्र्यांना कळवलंय की, कशाप्रकारे दोन-तीन बिल्डर मुख्यमंत्री कार्यालयाचा दबाव आणून जे प्रकल्प नियमात बसत नाहीत एसआरएच्या, ते बीएमसीची परवानगी न घेता एसआरएमध्ये घुसविले जाताहेत आणि महाराष्ट्राचा हजारो कोटीचा महसूल ते बुडवताहेत, असे ३०० प्रकल्प आहेत. आणि हे प्रकल्प जुहूच्या समुद्रकिनारी, वांद्रेच्या समुद्रकिनारी, वांद्रे पश्चिम, पार्ला या ठिकाणी जिथे अलिशान लोक राहतात,, , तिथे झोपडी पुनर्वसन प्रकल्प होत आहेत यात . ४० हजार कोटी आतापर्यंत सरकारचं नुकसान झालं,असा आरोप खा राऊत यांनी केला. तेव्हा मुख्यमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागेल

सर्व नियम डावलून दहशत आणि दबाव निर्माण करून एसआरएमधले अधिकारी अक्षरशः विकत घेऊन आणि सगळ्यांची बोलती बंद करून जर हे प्रकल्प लाटले जात असतील, तर मुंबईमध्ये मराठी माणसाचा वाट्याला इंचही जमीन राहू नये, हे त्याचं षडयंत्र आहे, मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाचा दबाव आहे, सीएमओचा दबाव आहे. एसआरएमध्ये जे प्रकल्प होत आहेत, ते गरिबांसाठी आणि झोपडपट्टी धारकांच्या असतात. हे जुहू, वांद्रे, मलबार हिल, पेडर रोड, नेपियन्स रोडसाठी हे प्रकल्प नाहीत. पण नियम पाळायचा नाही, कायदा पाळायचा नाही, गरिबांची काळजी घ्यायची नाही, झोपडपट्टी धारकांना वाऱ्यावर सोडायचं, त्यांचे प्रकल्प जे खरे आहेत, ते होऊ द्यायचे नाहीत. हे किती काळ चालेल, हा विषय संपलेला नाही मी वारंवार मुख्यमंत्र्यांना आठवण करून देतोय. जेव्हा मी पुढला बॉम्ब टाकेन, तेव्हा मुख्यमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागेल असे खा राऊत म्हणाले .



मुळा कारखान्याच्या व्हाईस चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल बाळासाहेब पाटील यांचा देवगड भक्त परिवाराच्या वतीने पत्रकार सुधीर चव्हाण यांच्या निवासस्थानी सन्मान करतांना सरपंच अजय साबळे पाटील,चांगदेव अण्णा साबळे पाटील, पत्रकार सुधीर चव्हाण दिसत आहे.

छाया-आदित्य चव्हाण नेवासा

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

नशिबाची परिक्षा
बुधवार दि. १८ नोव्हेंबर २०२६

मिलनम डे
उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

१३७ ३८० ३३५ — १-८ — १२५ ३६० ४४०

१२-७८-४६-९०-८३

कल्याण
उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

१२३ २४० ३३० — ६-४ — १३० १४९ ११२

६०-१४-२३-७९-४८

मुंबैम (मेन)
उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

१४० २३० ७८० — ५-३ — १२० ६९० ५८०

५६-९३-२१-८०-३४

माधुरी बाजार डे	माधुरी बाजार नाईट
१९०	१२५
०१	८२
२३६	२४६

dpbosssss.live
Mydpboss.com

शिवना नदीपात्रातील अवैध वाळू उपसावर कारवाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : तालुक्यातील शिवना नदीपात्रातून सुरू असलेल्या अवैध वाळू उपशावर महसूल प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. तहसीलदार सुनील सावंत यांनी मंगळवारी मध्यरात्री खबऱ्यांना चकवा देत लाखनी परिसरातील शिवना नदीपात्रात धडक दिली. यावेळी पिवळ्या रंगाचे हेड आणि राखाडी रंगाची बॉडी असलेला टिप्पर क्र (एमएच २० जीझेड ४२२७) आढळून आला. तपासणी केली असता त्यामध्ये दोन ब्रास रेती असल्याचे निष्पन्न झाले. पकडलेल्या टीप्परचा चालक आणि मालक एकच असून भगवान बेलेकर (रा. लाखनी) असे त्यांचे नाव आहे.वाळू वाहतुकीचा परवाना मागितला असता तो नसल्याचे त्यांनी सांगितले.त्यामुळे अवैध वाळू वाहतूक केल्याप्रकरणी कारवाई करण्यात आली. तहसीलदार सुनील सावंत, संजय ठमके, पोलीस पाटील कैलास कदम आणि मेजर रक्ताटे यांच्या पथकाने ही कारवाई केली.



गोंडेगाव येथे विजय वाघुले यांच्या वतीने दिवाळी फराळासह मेळाव्याचे आयोजन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : तालुक्यातील गोंडेगाव येथील पैलवान विजय आण्णासाहेब वाघुले यांच्या वतीने दिवाळी स्नेह व फराळासह मेळाव्याचे आयोजन शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ ते ९ या वेळेत वाघुले वस्ती, गोंडेगाव, ता. नेवासा येथे करण्यात आले आहे.

या दिवाळी फराळ मेळाव्याला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अहिल्यानगर जिल्हाप्रमुख रामदासजी गोल्हार,माजी आमदार पांडुरंग अभंग, श्रीरामपूरचे अशोक थोरे, युवा नेते उदयन गडाख, अहिल्यानगर जिल्हा बँकेचे संचालक कारभारी जावळे, त्रिमूर्ती प्रतिष्ठानच्या अध्यक्षा ॲड. सुमतीताई साहेबराव घाडगे,शिवसेना नेवासा तालुकाप्रमुख मच्छिंद्र पा. म्हस्के, पंचायत समितीचे माजी सभापती रावसाहेब कांगुणे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

वाकला-चांदेश्वर साठवण तलाव प्रकल्पाला गती द्या ; राष्ट्रवादी काँग्रेसची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : दुष्काळग्रस्त वैजापूर तालुक्यातील उत्तर डोंगराळ भागातील पिण्याच्या पाण्याचा आणि सिंचनाचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी वाकला-चांदेश्वर (हत्तीघोडा) साठवण तलाव प्रकल्प तातडीने मार्गी लावावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष विशाल शेळके यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. मुंबईतील देवगिरी बंगल्यावर त्यांची भेट घेऊन हे निवेदन देण्यात आले. ।निवेदनात म्हटले आहे की, माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या पुढाकारातून वैजापूर तालुक्यातील मान्यड प्रकल्प पूर्णत्वास गेला. त्याच धर्तीवर वाकला-चांदेश्वर प्रकल्पही मार्गी लागणे आवश्यक आहे. मात्र, पाणी उपलब्धता प्रमाणपत्राच्या प्रक्रियेमुळे हा प्रकल्प अद्याप रखडला आहे.



चांदेश्वर (चांदसर) नदीवर प्रस्तावित असलेल्या या प्रकल्पासाठी २.०१ दलघमी पाण्याची तरतूद सन २०२० व २०२२ च्या बृहद जल आराखड्यात करण्यात आली आहे. तसेच २०२४ च्या सुधारित राज्य जल आराखड्यातही या प्रकल्पाचा समावेश आहे. तापी पाटबंधारे विकास महामंडळाने ७ मे २०२४ रोजी पाणी उपलब्धतेस सहमती दर्शविली होती. त्यानंतर आवश्यक तांत्रिक पूर्तता करूनही प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झालेली नाही.

'जननाळ' लघुपटाची उपमुख्यमंत्री शिंदे फिल्म फेस्टीवलमध्ये अधिकृत निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिर्डी :जिजाऊ फिल्म क्रिएशन प्रस्तुत आणि अनुपमा पाटील यांच्या लेखन, दिग्दर्शन व निर्मितीखाली साकारलेल्या 'जननाळ' या लघुपटाची 'अखिल भारतीय चित्रपट संघटना, शिवप्रहार राष्ट्रीय लघुचित्रपट महोत्सव २०२६' अंतर्गत माजी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे फिल्म फेस्टीवलमध्ये अधिकृत निवड झाली आहे . २ ऑगस्ट रोजी आ. बच्चू कडू व कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश अबिटकर यांच्या उपस्थितीत या लघुपट स्पर्धेची घोषणा करण्यात आली होती. यामध्ये उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात राबविण्यात आलेली 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना', शेतकरी कर्जमाफी, दिव्यांग मंत्रालय, आरोग्य योजना, सत्ता परिवर्तन आणि एकनाथ शिंदे यांचा सामान्य माणसापासून ते मुख्यमंत्री पदापर्यंतचा प्रवास – या सहा प्रमुख विषयांवर लघुपट बनवण्याचे आव्हान ठेवण्यात आले होते.

या स्पर्धेसाठी देशभरातून १७० हून अधिक लघुपट प्राप्त झाले होते, त्यापैकी पात्र ठरलेल्या ९४ लघु चित्रपटांमध्ये 'जननाळ' या लघुपटाची निवड झाली आहे. या स्पर्धेचा अंतिम निकाल जानेवारी महिन्यात उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत मुंबई येथे जाहीर होणार आहे.बीड जिल्ह्यातील गेवराईसारख्या छोट्या तालुक्यात जन्म घेतलेल्या अनुपमा पाटील यांनी या लघुपटाचे लेखन, दिग्दर्शन, निर्मिती या तिन्ही आघाड्यांवर उत्कृष्ट कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे, त्यांनी स्वतः या लघुपटात मुख्य भूमिकाही साकारली आहे. एका महिलेने एवढ्या मोठ्या पातळीवर चित्रपट निर्मिती करावी आणि तोही थेट खऱ्याखुऱ्या लाभार्थ्यांना सोबत घेऊन, २०० किलोमीटर दूरवर जाऊन त्याचे चित्रीकरण करावे, ही बाब बीड जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे.या लघुपटात समाधान अंभोरे, विष्णू पोपळघट, श्याम चव्हाण, रवी शिराळे, मदन गायकवाड, शोभा सुरडकर, प्रशांत शिराळे, दीपक नेमाडे, अनिल शिराळे, शिवाजी वायाळ, दिलीप हिवाळे, उज्वला जाधव, स्वीटी शिराळे, वीर शिराळे, मतीन खान, शेख अखिल, बाबासाहेब शेंडगे यांच्यासह प्राचार्य राजेंद्र बरकसे , सुनील पोपळे, ॲड. सुभाष निकम, प्रशांत रुईकर, विष्णू खेत्रे आणि नानासाहेब मोटे आदी कलाकारांनी दमदारभूमिका साकारून काम केले आहे.

यशवंतराव गडाख यांच्या उपस्थितीत चांद्यात दिवाळी स्नेहमेळावा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

चांदा : नेवासा तालुक्यातील चांदा येथे शुक्रवार (दि. २० नोव्हेंबर) रोजी सकाळी साडेनऊ वाजता रुक्मिणी स्वयंवर मंगल कार्यालयात भव्य दिवाळी स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. ज्येष्ठ साहित्यिक व माजी खासदार यशवंतराव गडाख यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या मेळाव्यास माजी मंत्री शंकरराव गडाख प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती जिल्हा सहकारी बँकेचे नवनिर्वाचित संचालक कारभारी जावळे यांनी दिली. सोमेश्वर पतसंस्था आणि शंकरराव गडाख मित्र मंडळाच्या वतीने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. नुकत्याच झालेल्या अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत ज्येष्ठ नेते यशवंतराव गडाख यांनी जिल्ह्यातील विविध राजकीय व सहकार क्षेत्रातील नेत्यांना एकत्र आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या पुढाकारातून सत्ताधारी आणि विरोधी गटातील नेते एकत्र येत निवडणूक लढले आणि स्पष्ट बहुमत मिळवले. या पार्श्वभूमीवर दिवाळी फराळाच्या निमित्ताने स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्यास नेवासा तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी, जिल्हा परिषद, पंचायत समिती, सोसायट्यांचे प्रतिनिधी आणि चांदा ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमानंतर स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले असून, सर्वांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन कारभारी जावळे मित्र मंडळ व शंकरराव गडाख मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

निधनवार्ता

अनिल मुंदडा



श्रीरामपूर : शहरातील वॉर्ड नं. ७, अशोका पार्क, थत्ते मैदानाजवळ वास्तव्यास असलेले अनिल बद्रीनारायण मुंदडा यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात बंधु, पत्नी व २ मुले असा परिवार आहे. ते जुगलकिशोर, कमलकिशोर मुंदडा व ऍड. सुनील मुंदडा यांचे धाकटे बंधु तर हेमंत, कुंदन, नंदन व गोविंद मुंदडा यांचे चुलते व अर्णव व आर्यन मुंदडा यांचे ते वडील होत.

दत्तात्रय साळुंके



नेवासा : येथील वीट भट्टी व्यावसायिक दत्तात्रय विश्वनाथ साळुंके (वय ६८) यांचे हृदय विकाराने नुकतेच दु:खद निधन झाले. दत्तात्रय साळुंके यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,चार मुली,तीन बहिणी सूना,नातवंडे असा परिवार आहे.सामाजिक कार्यकर्ते महेश साळुंके व अजिंक्य साळुंके यांचे ते वडील तर उद्योजिका नंदिनीताई सोनवणे, आशाताई जगदाळे, लता गायकवाड यांचे ते बंधू होते.

आबासाहेब फुलारी



नेवासा : तालुक्यातील भेंडा बुद्रुक गावचे मुळ रहिवासी व सध्या खामगाव,ता.शेवगाव येथे स्थायिक असलेले आबासाहेब भीमराज फुलारी (वय ७३ वर्ष) यांचे रविवार दि.१५ नोव्हेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, भाऊ, एक मुलगा, दोन मुली, सुन, नातवंडे असा परिवार आहे. नवनाथ फुलारी यांचे ते वडील तर रामकिसन फुलारी यांचे ते बंधु होत.

इंदुमती भंडारी



आधी : आश्वी बुद्रुक येथील श्रीमती इंदुमती सूर्यकांत भंडारी (वय ७०) यांचे दु:खद निधन मंगळवार दिनांक १७ नोव्हेंबर रोजी झाले. त्यांचा पश्चात तीन मुले, सुना, नातवंड, दिर, पुतण्या असा मोठा परिवार आहे.सामाजिक कार्यकर्त राहुल भंडारी उद्योजक रोहित भंडारी, रविंद्र भंडारी यांच्या मातोश्री तर नेमीचंद भंडारी यांचा भावजयी अमित भंडारी यांची चुलती होत्या.

निमगावचे माजी सरपंच भाऊसाहेब कातोरे यांचा ग्रामस्थांच्या वतीने सन्मान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिर्डी :राहाता तालुक्यातील निमगाव को . येथील माजी सभापती तथा गावाचे माजी सरपंच भाऊसाहेब रंगनाथ कातोरे यांनी गावासाठी तसेच तालुक्यात केलेले उल्लेखनीय कार्याबददल ग्रामस्था च्या वतीने नुकताच त्यांचे निवासस्थानी सत्कार करण्यात आला. वयोमानानुसार व प्रकृती मुळे काही दिवस ते घरीच होते मात्र त्यांनी गावात असलेली नाळ कधी तूटू दिली नाही . त्यामुळे स्थानिक ग्रामस्थांनी उपस्थित राहून भाऊसाहेब रंगनाथ कातोरे यांना दीर्घायुष्य आणि उत्तम आरोग्यासाठी दिलखुलास शुभेच्छा दिल्या. यामध्ये प्रामुख्याने तंटामुक्ती अध्यक्ष सुखदेव बारहाते, मा. उपसरपंच अजय जगताप आणि धोंडीराम खरात यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला आणि त्यांना पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी या प्रसंगी गावातील ग्रामस्थ, चाहते आणि मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. भाऊसाहेब रंगनाथ कातोरे पाटील यांनी केलेल्या सामाजिक कार्याची आणि ग्रामविकासातील योगदानाची आठवण यावेळी उपस्थितांनी करून दिली. सर्व उपस्थितांच्या वतीने त्यांचा सत्कार करत त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीस सदिच्छा व्यक्त केल्या .

गणेशच्या सभासदांचे प्रश्न प्राधान्याने मार्गी लावणार : शिंदे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणतांबा : गणेश सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील सभासदांचे प्रश्न प्राधान्याने मार्गी लावण्यात येतील, अशी ग्वाही कारखान्याचे कार्यकारी संचालक गोरक्षनाथ शिंदे यांनी दिली.भाजपचे ज्येष्ठ नेते गंगाधर पाटील चौधरी व राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे अहिल्यानगर जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली परिसरातील शेतकऱ्यांनी गणेश कारखान्याच्या पदाधिकारी व अधिकाऱ्यांची भेट घेऊन लेखी निवेदन दिले. यावेळी सभासदांच्या विविध अडचणी मांडण्यात आल्या. दिवाळीच्या सणात अनेक सभासदांना साखर मिळाली नाही. तसेच कार्यक्षेत्रातील सभासदांच्या ऊसतोडणीबाबत अनेक तक्रारी असून, ऊस वेळेत तोडला जात नसल्याने सभासदांना नाइलाजाने अन्य कारखान्यांना ऊस द्यावा लागत असल्याचे बाळासाहेब चव्हाण यांनी निदर्शनास आणून दिले. यावर कारखान्याचे अध्यक्ष सुधीर लहारे व कार्यकारी संचालक गोरक्षनाथ शिंदे यांनी कारखान्यासमोरील अडचणी स्पष्ट केल्या. ऊसतोडणी टोळ्यांची संख्या वाढविण्यात येईल. पुढील वर्षी दिवाळीच्या साखर वाटपात सभासदांवर अन्याय होणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. मात्र, सभासदांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन आपला ऊस गणेश कारखान्यालाच द्यावा, असे आवाहन केले. गणेश कारखाना हा कार्यक्षेत्रातील सर्वांची कामधेनू असून तो सुरळीत चालण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले. चर्चे त गंगाधर पाटील चौधरी व भोसले यांनी सहभाग घेतला. दोन्ही बाजूंनी सकारात्मक चर्चा झाल्याने उपस्थितांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले.

कुणबी नोंदींच्या शोधासाठी वैजापुरात चार अभ्यासकांची मदत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : मराठा समाजाच्या कुणबी नोंदींचा शोध घेण्यासाठी वैजापूर तालुक्यात जुन्या शासकीय दप्तरांची तपासणी अधिक व्यापक स्वरूपात केली जाणार आहे. या कामासाठी वेगवेगळ्या जुन्या लिपींचे ज्ञान असलेल्या चार अभ्यासकांची मदत घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. ऐतिहासिक अभिलेखांचे वाचन, महसुली कागदपत्रांची छाननी आणि वंशावळींची जुळवणी अशा विविध टप्प्यांतून ही शोधमोहीम पुढे नेली जाणार आहे. या कामासाठी वेगवेगळ्या भागांतील अभ्यासकांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. कन्नड येथील रमेश सूर्यवंशी कुणबी नोंदींचा शोध घेतील. छत्रपती संभाजीनगरचे रहीम खान फारसी आणि उर्दू भाषेतील जुन्या दस्तऐवजांचे वाचन करतील. इंदापूरचे विक्रम नलवडे मोडी लिपीतील अभिलेख तपासतील, तर गंगापूरचे राहुल सुराशे उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे वंशावळ जुळविण्यास मदत करतील.

तालुक्यातील अनेक जुन्या नोंदी ब्रिटिशकालीन तसेच संस्थानकालीन दस्तऐवजांमध्ये उपलब्ध असण्याची शक्यता आहे. मात्र, तत्कालीन काळातील कागदपत्रे आजच्या प्रचलित लिपीत नसल्याने त्यांचा अर्थ लावणे आणि त्यातील नोंदी शोधणे जिकिरीचे ठरत आहे. त्यामुळे संबंधित लिप्यांचे जाणकार आणि वंशावळ अभ्यासकांची मदत घेण्याचा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. भूमिअभिलेख, तहसीलदार आणि दुय्यम निबंधक कार्यालयांमधील जुन्या दप्तरांची या प्रक्रियेत तपासणी केली जाणार आहे. जमिनीच्या नोंदी, महसुली रजिस्टर, खरेदी-विक्रीचे जुने दस्तऐवज तसेच अन्य ऐतिहासिक अभिलेखांमधून आवश्यक पुरावे शोधले जातील. सापडलेल्या नोंदींचा केवळ उल्लेख पुरेसा नसून त्यांची सत्यता तपासणे, संबंधित कुटुंबांची वंशावळ जुळविणे आणि अधिकृत अभिलेखांशी पडताळणी करणे ही प्रक्रिया निर्णायक ठरणार आहे. मराठा सेवक प्रशांत पाटील सदाफळ यांनी या विषयासाठी गेल्या वर्षभरापासून जिल्हाधिकारी आणि मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्याकडे पाठपुरावा केला आहे. त्यांच्या पाठपुराव्यानंतर आता अभ्यासकांच्या मदतीने शोधप्रक्रियेला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. या मोहिमेतून प्रत्यक्षात किती कुणबी नोंदी उपलब्ध होतात आणि त्यातून किती नागरिकांना लाभ मिळू शकतो, हे आगामी तपासणीनंतर स्पष्ट होणार आहे.

नावात बदल

मी, गुलाब मगबुल पठाण, रा. नेवासा, याडरे जाहीर करतो की, मी माझे नाव बदलून गुलाब मकबुल पठाण असे केले आहे. यापुढे सर्व शासकीय, कायदेशीर, बँकिंग, शैक्षणिक, पासपोर्ट आणि इतर कामांसाठी माझी ओळख गुलाब मकबुल पठाण याच नावाने असेल करिता प्रतिज्ञापत्र नं.४७९/२०२६.ता.१५/०९/२०२६

दखल

कृषी अन्नप्रक्रिया व मूल्यसाखळी विकासावर एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन

बारामती : कृषी क्षेत्रातील उत्पादनाला योग्य बाजारपेठ मिळवून देणे, कृषीमालावर प्रक्रिया करून त्याचे मूल्यवर्धन करणे तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने कृषी अन्नप्रक्रिया व मूल्यसाखळी विकास (Agri-Food Intervention and Value Chain Development) या विषयावर गुरुवार २० नोव्हेंबर २०२६ रोजी डॉ. शरदचंद्र पवार कृषी व संलग्न महाविद्यालय येथे एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

या चर्चासत्राचे आयोजन संस्थेचे सन्माननीय चेअरमन मा. श्री. राजेंद्र पवार व विश्वस्त मा. सौ. सुनंदा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे. संस्थेचे समन्वयक प्रा. आशिष रासकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. डी. गोंडे व प्रा. आरती भोईटे यांच्या मार्गदर्शनाखाली या चर्चासत्राचे नियोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्रामध्ये कृषी अन्नप्रक्रिया उद्योगातील संधी, कृषी उत्पादनांचे मूल्यवर्धन, प्रक्रिया उद्योगांची उभारणी, शेतमालाची साठवणूक व विपणन, शेतकरी उत्पादक कंपन्यांची भूमिका, बाजारपेठेशी जोडणी आणि आधुनिक मूल्यसाखळी व्यवस्थापन अशा विविध महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.या उपक्रमामुळे कृषी व कृषीपूरक व्यवसाय क्षेत्रातील नवीन संधींची माहिती विद्यार्थी, शेतकरी, संशोधक तसेच कृषी उद्योजकांना मिळणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता विकासाला चालना मिळण्यासोबतच शेतकऱ्यांना कृषीमालाच्या मूल्यवर्धनातून अधिक आर्थिक लाभ मिळविण्यासाठी उपयुक्त मार्गदर्शन उपलब्ध होणार आहे. तसेच संशोधकांना कृषी संशोधन आणि प्रत्यक्ष शेतकरी व उद्योग क्षेत्र यांच्यातील समन्वय वाढविण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.कृषी क्षेत्राला केवळ उत्पादनकेंद्रित न ठेवता प्रक्रिया, मूल्यवर्धन, उद्योग आणि बाजारपेठ यांची प्रभावी सांगड घालण्याच्या दृष्टीने हे चर्चासत्र महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समितीची त्रैमासिक सभा २५ नोव्हेंबर रोजी

पुणे : जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समितीची त्रैमासिक सभा बुधवार, २५ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथील पाचव्या मजल्यावरील सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. या सभेच्या अनुषंगाने भ्रष्टाचारासंदर्भातील तक्रारी अथवा अर्ज सादर करू इच्छिणाऱ्या नागरिकांनी सभेच्या दिवशी निश्चित वेळेत उपस्थित राहून आपले अर्ज दाखल करावेत, असे नामदेव टिळेकर, सदस्य सचिव जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन समिती तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे यांनी कळविले आहे.

श्री कमळजादेवी उत्सव उत्साहात साजरा



लोणी धामणी, आंबेगाव : वाळुंजनगर (ता.आंबेगाव) येथील श्री कमळजादेवी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. उत्सवानिमित्त देवीच्या काठीची व पालखीची मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीमध्ये डोक्यावर कलश घेऊन महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.मंदिरात सोमवारी (दि.१६) रोजी पहाटे चार ते सहा वाजता काकडा आरती झाली. त्यानंतर परिसरातील नागरिकांनी देवीच्या नवरसाचे चोळी पातळ, हारतूरे व मांडव डहाळे यांची मिरवणूक काढून देवीस अर्पण केले. दुपारी देवीची काठी आणि पालखीची मिरवणूक काढण्यात आली. सायंकाळी चार वाजता भागवताचार्य गणेश महाराज शिंदे यांचा कीर्तनाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. रात्री ९ ते ११ वाजता संजय महाराज वाळुंज स्वस्तरंग भजनी मंडळ (वाळुंजनगर) यांचा भजनाचा कार्यक्रम झाला. यावेळी भीम शंकर कारखान्याचे माजी अध्यक्ष देवदत्त निकम, पंचायत समिती सदस्या अंकिता वाळुंज, शरद बँकेचे, संचालक अशोक आदक पाटील, सरपंच तृप्ती महेंद्र वाळुंज, उपसरपंच बाळासाहेब वाळुंज,

निवृत्तीवेतनधारकांसाठी जीवनप्रमाण ॲपद्वारे हयातीचे दाखले सादर करण्यासाठी शिबिरे

पुणे : राज्य शासनाच्या निवृत्तीवेतनधारक आणि कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना डिजिटल लाइफ सर्टिफिकेट प्रणालीद्वारे ऑनलाइन हयातीचे दाखले सादर करता यावेत, यासाठी जिल्हा कोषागार कार्यालय, पुणे यांच्यामार्फत विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

पुणे येथे १९ नोव्हेंबर रोजी दुपारी ३.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत जिल्हा परिषद येथील शरदचंद्र पवार सभागृहात शिबिर होणार आहे. तसेच बारामती, इंदापूर, दौंड, शिरूर व परिसरातील निवृत्तीवेतनधारकांसाठी २० नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० ते दुपारी १.३० या वेळेत नवीन प्रशासकीय इमारत, तहसील कार्यालय, बारामती येथील बहुउद्देशीय सभागृहात शिबिर आयोजित केले आहे.

जुन्नर, आंबेगाव, खेड व परिसरातील निवृत्तीवेतनधारकांसाठी २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० ते दुपारी १.३० या वेळेत कृषी उत्पन्न बाजार समिती, मंचर येथील बहुउद्देशीय सभागृहात शिबिर होणार आहे. या शिबिरांमध्ये जीवनप्रमाण ॲपद्वारे ऑनलाइन हयात प्रमाणपत्र (डिजिटल लाइफ सर्टिफिकेट) तयार करण्याची प्रक्रिया पूर्ण करून त्याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. शिबिरासाठी येताना निवृत्तीवेतनधारकांनी आधार कार्ड, पीपीओ क्रमांक, बँक खातेपुस्तिका आणि मोबाईल सोबत आणावा.

महाराष्ट्रातील आदिवासी स्वातंत्र्यवीर आणि वीरांगणा; शौर्य, संघर्ष आणि बलिदानाची गौरवगाथा

जनजातीय गौरव सप्ताह निमित्त विशेष लेख

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास हा देशातील विविध समाजघटकांच्या त्याग, संघर्ष आणि बलिदानातून घडलेला आहे. या इतिहासात आदिवासी समाजाचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. ब्रिटिश सत्तेच्या अन्यायकारक धोरणांविरुद्ध सावकार आणि जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध तसेच जल, जंगल आणि जमीनीवरील पारंपरिक अधिकारांच्या रक्षणासाठी आदिवासी समाजाने अनेक उठाव केले, महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या डोंगररांगांपासून सातपुड्याच्या जंगलांपर्यंत आणि विदर्भातील गोंडवाना प्रदेशापर्यंत अनेक आदिवासी क्रांतिकारकांनी स्वातंत्र्याची ज्योत तेवत ठेवली.

महाराष्ट्रातील आदिवासी स्वातंत्र्यवीर; राघोजी भांगरे – सहयाद्रीचा क्रांतिसूर्य :

८ नोव्हेंबर १८०५ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील देवगाव येथे महादेव कोळी समाजात जन्मलेल्या राघोजी भांगरे यांनी ब्रिटिशांच्या अन्यायकारक राजवटीविरुद्ध संघर्ष केला, ब्रिटिश प्रशासन, सावकारांचे शोषण आणि शेतकरी-आदिवासीच्या जमिनी बळकावण्याच्या प्रकारांविरुद्ध त्यांनी संघटित लढा उभारला. १८२८ पासून त्यांनी ब्रिटिश आणि सावकारांविरुद्ध उठावाचे नेतृत्व केले. पुणे, ठाणे, नाशिक आणि अहिल्यानगर परिसरात त्यांच्या संघर्षाचा प्रभाव होता. अखेर २ मे १८४८ रोजी ठाणे येथे त्यांना फाशी देण्यात आली. त्यांचे बलिदान महाराष्ट्रातील आदिवासी स्वाभिमानाचे प्रतिक आहे.

भागोजी नाईक– भिल समाजाचे शूर क्रांतिकारक :

१८५७ च्या स्वातंत्र्यसमराच्या काळात भागोजी नाईक यांनी भील समाजाला संघटित करून ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्ष केला. अहिल्यानगर आणि खान्देश परिसरातील डोंगराळ भागात त्यांनी ब्रिटिश प्रशासनाला आव्हान दिले. आदिवासी समाजाचे पारंपरिक अधिकार आणि स्वाभिमान जपण्यासाठी त्यांनी केलेला संघर्ष इतिहासातील महत्वपूर्ण मानला जातो.

वीर बाबुराव शेडमाके गोंडवाना भूमीचे स्वातंत्र्यवीर:

१२ मार्च १८३३ रोजी गोंड समाजातील कुटुंबात जन्मलेल्या बाबुराव शेडमाके यांनी १८५७ च्या स्वातंत्र्यसमरात चांदा (सध्याचा चंद्रपूर) आणि गडचिरोली परिसरात ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र उठावाचे नेतृत्व केले. ते मोलमपल्लीचे जमीनदार होते. त्यांनी स्थानिक गोंड आदिवासींना संघटित करून ब्रिटिश सैन्याशी संघर्ष केला. ब्रिटिशांनी त्यांना पकडून २१ ऑक्टोबर १८५८ रोजी फाशी दिली. त्यांचे बलिदान गडचिरोली आणि विदर्भाच्या प्रेरणादायी अध्याय आहे.

भिमा नाईक – खान्देशातील आदिवासी संघर्षाचे नेतृत्व :

खानदेश आणि सातपुडा परिसरातील भील समाजाच्या ब्रिटिशविरोधी संघर्षात भिमा नाईक यांचे नाव महत्वाने घेतले जाते. १८५७ च्या उठावाच्या काळात त्यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध प्रतिकार केला. आदिवासींच्या पारंपारिक हक्कांचे संरक्षण आणि शोषणकारी व्यवस्थेविरुद्ध संघर्ष ही त्यांच्या आंदोलनाची प्रमुख वैशिष्ट्ये होती.

खाज्या नाईक – सातपुड्यातील ब्रिटिशविरोधी योद्धा :

भील समाजातील खाज्या नाईक यांनी खान्देश परिसरात ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्ष केला. ब्रिटिश प्रशासनाच्या दडपशाहीविरुद्ध आणि आदिवासी समाजाच्या अधिकारांसाठी त्यांनी प्रतिकाराची भूमिका घेतली.

नाग्या महादू कातकरी – चिरनेर जंगल सत्याग्रहातील हुतात्मा :

१९३० मधील रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील चिरनेर जंगल सत्याग्रहात नाग्या महादू कातकरी यांनी सहभाग घेतला. ब्रिटिशांच्या वनविषयक निर्बंधांविरुद्ध झालेल्या आंदोलनात पोलिसांनी केलेल्या गोळीबारात त्यांना वीरमरण आले. जंगलावरील पारंपरिक अधिकारांसाठी दिलेले त्यांचे बलिदान आदिवासी संघर्षाच्या इतिहासात महत्वाचे आहे.

जिजाबाई भांगरे आदिवासी महिला संघर्षाचे प्रेरणास्थान :

महाराष्ट्रातील आदिवासी महिला स्वातंत्र्यलढ्याच्या संदर्भात जिजाबाई भांगरे यांचे नाव काही संशोधनपर लेखन आणि ऐतिहासिक उल्लेखांमध्ये आढळते. आदिवासी महिलांनी ब्रिटिशविरोधी संघर्षात पुरुषांच्या बरोबरीने सहभाग घेतला. अशा महिलांच्या कार्याचा अधिक शोध घेऊन त्यांचे योगदान इतिहासाच्या मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक आहे.

वारली आदिवासी महिला संघटित संघर्षाची परंपरा :

१९४५ ते १९४८ या काळात ठाणे जिल्ह्यात झालेल्या वारली आदिवासी उठावात महिलांनी महत्त्वपूर्ण सहभाग घेतला. जमीनदारांचे शोषण, वेठबिगारी, अन्यायकारक मजुरी आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध वारली समाजाने संघटित आंदोलन केले. या संघर्षात महिलांनी मोर्चे, सभा, संघटन आणि प्रतिकारामध्ये सक्रिय भूमिका बजावली. वारली महिलांचा हा संघर्ष आदिवासी स्त्रीशक्तीचे महत्वपूर्ण उदाहरण आहे.

आदिवासी समाजाचे स्वातंत्र्यलढ्यातील व्यापक योगदान :

महाराष्ट्राबरोबरच देशातील आदिवासी समाजाने स्वातंत्र्यलढयात मोलाचे योगदान दिले. भगवान बिरसा मुंडा यांनी १८१९-१९०० मध्ये उलगुलान अर्थात महान उठाव उभारला, संथाल उठावात सिदधो, कान्हू, चांद आणि भैरव मुर्मू यांनी नेतृत्व केले. फूलो आणि झानो मुर्मू यांनी वीरांगणा म्हणून सहभाग नोंदवला, तिलका मांझी, टंट्या भिल्ल, राणी गेदिन्ल्यू, तिरोत सिंग आणि कोमाराम भीम यांनीही ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्ष केला.राणी दुर्गावती यांनी १५६४ मध्ये मुघल सैन्याविरुद्ध गोंडवाना राज्याच्या संरक्षणासाठी लढा देत बलिदान दिले. त्यांच्या संघर्ष ब्रिटिशकालीन नसला तरी गोंडवाना इतिहासातील आदिवासी शौर्य आणि स्वाभिमानाचे महत्वपूर्ण प्रतिक आहे.झलकारीबाई यांनी १८५७ च्या स्वातंत्र्यसमरात झाशीच्या राणी लक्ष्मीबाई यांच्यासोबत ब्रिटिशांविरुद्ध शौर्याने लढा दिला. त्या कोरी समाजातील वीरांगणा होत्या. त्यांचा उल्लेख भारतीय स्वातंत्र्यसमरातील वीरांगणा म्हणून करणे ऐतिहासिकदृष्ट्या योग्य आहे.

आदिवासी स्वातंत्र्यवीरांचा वारसा जपूया :

आदिवासी समाजाचा स्वातंत्र्यलढा हा केवळ ब्रिटिश सत्तेविरुद्धचा संघर्ष नव्हता, तर तो जल, जंगल, जमीन, संस्कृती, स्वाभिमान आणि पारंपरिक अधिकारांच्या संरक्षणासाठीचा लढा होता. या समाजाने देशाला एकता, सामूहिक संघर्ष, निसर्गसंवर्धन आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली.

आदिवासी स्वातंत्र्यवीरांची चरित्रे शालेय पाठ्यपुस्तकांमध्ये समाविष्ट करणे, त्यांच्या स्मारकांचे जतन करणे, संशोधनपर ग्रंथ प्रकाशित करणे आणि नव्या पिढीपर्यंत त्यांचा इतिहास पोहोचवणे ही काळाची गरज आहे.

आदिवासी वीरांचा इतिहास म्हणजे शौर्य, त्याग, स्वाभिमान आणि राष्ट्रभक्तीचा इतिहास ! या महान क्रांतिकारकांच्या बलिदानाला विनम्र अभिवादन आणि त्यांच्या विचारांना मानाचा मुजरा !

–श्रीमती विजया पंडुरे,
संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे

इंद्रधनुष्य युवक महोत्सवासाठी दहा विद्यार्थ्यांची निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

बारामती : डॉ. शरदचंद्र पवार कृषी व कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाच्या दहा विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय इंद्रधनुष्य युवक महोत्सव २०२६ साठी निवड झाली आहे. विविध कला प्रकारांमध्ये उत्कृष्ट सादरीकरण करत विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

राज्यस्तरीय इंद्रधनुष्य युवक महोत्सवाचे आयोजन १८ ते २३ नोव्हेंबरदरम्यान यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या अंतर्गत असलेल्या कृषी महाविद्यालयांसाठी ५ नोव्हेंबर रोजी राहुरी येथे निवड चाचणी घेण्यात आली. विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विलास आवारी यांच्या उपस्थितीत २८ कला प्रकारांमध्ये ही निवड प्रक्रिया पार पडली.

या निवड चाचणीत ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या डॉ. शरदचंद्र पवार कृषी व कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यापैकी दहा विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.रंगमंचीय कला, नाट्यकला व नृत्य विभागातून जिग्नेश पाटील, फाल्गुनी



राठोड, तुषार करे आणि अनुजा मदने, संगीत व वाद्यवृंद विभागातून सुदर्शन यादव, नरेंद्र जावळे आणि माधव पवार, तर ललित कला विभागातून ओम पाटे, प्रांजल आहेर, अंकिता मारकड आणि स्वराज कांबळे यांची निवड झाली आहे. हे विद्यार्थी महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

ललित कला विभागात अनुराग काणे आणि वेदांती पानसरे यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. तसेच आकांक्षा गवळी, धनश्री डोळे, अमरीन शेख, साक्षी लोणकर, साजिरी देवकाते, श्रेया भांगे, मृण्मयी हिंगणे आणि हुजेपा भोरी यांनीही उत्कृष्ट सादरीकरण केले.

विशेष म्हणजे, मागील वर्षी जळगाव येथे झालेल्या इंद्रधनुष्य महोत्सवात जिग्नेश राजेंद्र पाटील याने माईम कला प्रकारात राज्यस्तरावर द्वितीय क्रमांक मिळवला होता. त्या वेळीही महाविद्यालयातील सहा विद्यार्थ्यांची निवड झाली होती. या विद्यार्थ्यांना प्रा. आर. एम. बेलदार आणि प्रा. पी. जी. पाटील यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे प्रमुख राजेंद्र पवार, विश्वस्त सुनंदाताई पवार, संस्थेचे समन्वयक प्रा. ए. रासकर, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. गोंडे, उपप्राचार्य प्रा. एस. गायकवाड आणि कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य ए. डी. भोईटे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

मंदिर परिसरातील दुकानाला भीषण आग; अग्निशमन जवानाच्या धाडसामुळे मोठी दुर्घटना टळली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

आळंदी : श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिराच्या भराव रस्त्यावरील वट्टमवार बंधू यांच्या प्रसाद, पितळी वस्तू व माळा विक्रीच्या दुकानाला बुधवारी (ता. १८) पहाटे साडेतीनच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीत दुकानातील साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मात्र, आळंदी नगरपरिषदेच्या अग्निशमन विभागाने दाखविलेल्या तत्परतेमुळे आग शेजारील दुकानांमध्ये पसरण्यापासून रोखण्यात यश आले. त्यामुळे समाधी मंदिर परिसरातील संभाव्य मोठी दुर्घटना टळली.

पहाटे ३.४८ वाजता नगरसेवक सुनील घुंडरे व स्थानिक नागरिकांनी आगीची माहिती आळंदी नगरपरिषद अग्निशमन विभागाला दिली. माहिती मिळताच अग्निशमन वाहनासह जवान घटनास्थळी दाखल झाले. दुकानाला मोठ्या प्रमाणात आग लागल्याचे निदर्शनास आल्यानंतर सुरक्षेच्या दृष्टीने प्रथम विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला. त्यानंतर दुकानाचे दोन शटर तोडून अग्निशमन जवानांनी आत प्रवेश केला आणि पाण्याचा मारा सुरू केला.



या कार्यवाहीदरम्यान फायरमन अमित घुंडरे यांनी शटर तोडून दुकानात प्रवेश करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. ही कार्यवाही करताना त्यांना दुखापत झाली. मात्र, प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी कर्तव्याला प्राधान्य देत आग विझविण्याच्या कामात सहभाग घेतला. अग्निशमन जवानांनी सातत्याने पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणली. त्यानंतर दुकानाची तपासणी करून आगीचे उर्वरित स्रोतही विझविण्यात आले. समाधी मंदिराच्या अगदी जवळच ही घटना घडल्याने आग पसरल्यास मोठी दुर्घटना होण्याची शक्यता होती.

इंडियन सोसायटी ऑफ डिजिटल डेन्टिस्ट्रीतर्फे आंतरराष्ट्रीय परिषद

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते शुक्रवारी उद्घाटन; डॉ. रत्नदीप जाधव यांची पत्रकार परिषदेत माहिती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : इंडियन सोसायटी ऑफ डिजिटल डेन्टिस्ट्रीतर्फे (आयएसडीडी) येत्या १९ ते २२ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत 'अत्याधुनिक दंतचिकिसा व दंतरोपण' विषयावरील तिसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. या चार दिवसीय परिषदेत डिजिटल डेन्टिस्ट्रीचा प्रचार व प्रसार करण्याचा मुख्य उद्देश असून, अत्याधुनिक उपकरणे बनवणाऱ्या कंपन्या व दंतवैद्यांना एकत्र आणण्यासाठी ही परिषद महत्वपूर्ण ठरणार आहे, अशी माहिती 'आयएसडीडी'चे अध्यक्ष डॉ. रत्नदीप जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी सचिव, डॉ. विजय ताम्हाणे, संचालक व खजिनदार, डॉ. कौस्तुभ पाटील उपस्थित होते.

डॉ. रत्नदीप जाधव म्हणाले, या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये अत्याधुनिक मशिनरी, विविध प्रगत संगणक प्रणाली, थ्रीडी प्रिंटिंग, स्कॅनिंग, रोबोटिक सारख्या नव्या दंतोपचार व दंतरोपण उपचारांवर चर्चा होणार आहे. इतर क्षेत्रांप्रमाणेच दंतचिकित्सेमध्येही सातत्याने नवनवीन तंत्रज्ञान येत असते. त्याबाबत जास्तीत जास्त दंतवैद्यांना माहिती व्हावी यासाठी ही परिषद महत्त्वाची ठरणार आहे. शुक्रवार दिनांक २० नोव्हेंबर २०२६ रोजी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते या परिषदेचे उद्घाटन होणार आहे. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज आणि ॲग्रीकल्चरचे (एमसीसीआयए) महासंचालक प्रशांत गिरबाने कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. बालेवाडी येथील हॉटेल ऑर्किड येथे होणाऱ्या या परिषदेमध्ये देश-विदेशातील ६०० ते ७०० दंतवैद्यक सहभागी होतील.

डॉ. विजयकुमार ताम्हाणे म्हणाले, या परिषदेत चारही दिवस चर्चासत्रांसह प्रात्यक्षिक कार्यशाळा होणार आहेत. दंतरोपणाच्या विविध प्रकारातील सद्यस्थिती आणि मुलभूत तत्वे, तात्पुरते उपचार व कायमस्वरुपी आदर्श वैद्यकीय उपचार, विविध उपचारांसाठी लागणारी उपकरणे यांसारख्या विषयांवर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन व चर्चा होणार आहे. याशिवाय नियमित प्रॅक्टीस करणाऱ्या दंतवैद्यांना दैनंदिन क्लिनिकल प्रॅक्टिस करत असताना उद्भवणाऱ्या समस्यांवरही यावेळी चर्चा करण्यात येईल. दंतवैदयांबरोबरच रुग्णांना यांसारख्या परिषदांचा फायदा होतो. तंत्रज्ञानामुळे उपचार तर सोपे होतातच पण उपचारांदरम्यान होणाऱ्या मानवी चुकांना आळा बसण्यास मदत होते. तसेच कमी खर्चात उत्तम उपचार घेणे शक्य होते

जाहिर नोटीस

मालक श्री. गणेश लक्ष्मण गाडे रा. कळंब, ता. आंबगाव, जि. पुणे. ४१०५१५ याचे मालकीचे गाव मौजे नारायणगाव ता जुन्नर जि पुणे येथील गट नं ६५६/१+२/४ भळगट हॅरीटेज फेज २ वरील आर सी सी बांधकाम ३ - या मजल्यावरील निवास सदनिका १९ या सदर मिळकतीचे दिनांक. ०८/०२/२००५ रोजीचा मुळखरेदीखत दस्त नं.३७८/२००५, हा दस्ता गहाळ झालेले आहे. त्याबाबत श्री. गणेश लक्ष्मण गाडे यांनी १८/११/२०२६ रोजी Pune City, pune याच्याकडे तक्रारार केली आहे. यासी लास्ट रिपोर्ट नं.१६८०२२-२०२६ पडला आहे. सदरचा मुळ दस्त कोणास सापडल्यास Pune City, pune येथे जमा करावा अथवा माझा फोन नंबर. ९८८१८४०१०१ वर फोन संपर्क करावा.

पुणे
दिनांक:19/11/2026
ॲड. विकास.एस. राऊत
कार्यालय क्रमांक ४८ सदागुरु कॉम्प्लेक्स, श्रीक्रापूर रोड चाकण, ता.खेड, जि. पुणे मो.9881840101

सार्वजनिक सूचना

सूचित करण्यात येते की, **M/s. Marquee Realty LLP,** भागीदार श्री. समीर घोळवे व इतर यांच्यामार्फत CTS क्र. 929 व 926, सर्व्हे क्र. 120, प्लॉट क्र. 19 व 20, मॉडर्न कॉलनी, कोथरूड, पौड रोड, पुणे – 411038 येथे प्रस्तावित पुनर्विकास निवासी प्रकल्पास राज्यस्तरीय पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरण (SEIAA), महाराष्ट्र यांच्याकडून दिनांक **09/11/2026** रोजी पर्यावरणीय मंजुरी (Environmental Clearance) प्राप्त झाली आहे. सदर पर्यावरणीय मंजुरीचा ओळख क्रमांक **EC25C3801MH5882396N** असा आहे. सदर पर्यावरणीय मंजुरीची प्रत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) येथे उपलब्ध असून, ती परिवेश संकेतस्थळावर **(https://parivesh.nic.in)** देखील पाहता येईल.

पुणे
दिनांक: 19/11/2026
M/s. Marquee Realty LLP

मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाचे सुधारित वेळापत्रक जाहीर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : भारत निवडणूक आयोगाने मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण २०२६ कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्रासाठी सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार मतदार यादीतील दावे व हरकतींचा निपटारा १५ डिसेंबर २०२६ पर्यंत करण्यात येणार असून, अंतिम मतदार यादी २२ डिसेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे.

भारत निवडणूक आयोगाने १७ नोव्हेंबर रोजी जारी केलेल्या पत्रानुसार, महाराष्ट्रासह काही राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमधील विशेष

मतदार यादीतील दावे व हरकतींचा निपटारा १५ डिसेंबरपर्यंत; अंतिम मतदार यादी २२ डिसेंबरला प्रसिद्ध होणार

सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाच्या विविध टप्प्यांसाठी सुधारित कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

महाराष्ट्रात नोटीस टप्प्याची सुरुवात ३१ ऑगस्ट २०२६ पासून झाली असून, दावे व हरकतींचा निपटारा करण्याची अंतिम मुदत १५ डिसेंबर २०२६ आहे. त्यानंतर २२ डिसेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

याशिवाय, मतदारांच्या नोंदणीसाठी गणना अर्ज तयार करणे व छपाई १८ नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करणे, तर अर्जांचे वितरण व संकलन १८ ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत करण्यात येणार आहे. गणना अर्जांची विल्हेवाट १० डिसेंबरपर्यंत लावण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या सुधारित वेळापत्रकाची सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना माहिती देऊन, मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाबाबत सर्व माध्यमांतून व्यापक प्रसिद्धी करण्यात यावी, असे निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत. तसेच राजकीय पक्षांनाही सुधारित वेळापत्रकाची लेखी माहिती देण्यात येणार आहे.

मतदारांनी सुधारित कार्यक्रमाची नोंद घेऊन मतदार यादीतील नोंदणी व संबंधित प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

जाहिर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः गाव मौजे परिटवाडी, ता-इंदापुर, जि-पुणे येथील व परिसरातील लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टातील नमूद शेतजमीन मिळकतीचे विद्यमान मालक अंकुश रामदास झुंजार यांनी आमचे अशिलांना विक्री करण्याचे मान्य करुन तसा व्यवहार ठरवून विसारापोटी रक्कम स्विकारुन विसारपावती नोंदवून दिलेली आहे. सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी ही मिळकत निर्वेध, निजोखमी व त्यांचेशिवाय इतर कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध नसल्याची खात्री व भरवसा दिला आहे. परंतु या उपरही या मिळकतीचे मालकी हक्क, वाटप, ताबा, गहाण, दान, लिज, बक्षिस, नोकरनामा, खंडनामा, कुळ हक्क, विसारपावती, साठेखत, खरेदीखत, वहिवाट अगर इतर बाबींबाबत कोणाचीही कसलीही हरकत, व्यवहार अगर हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ (आठ) दिवसांचे आत खालील पत्त्यावर मुळ कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा आमचे अशिल कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध नसल्याचे ग्राह्य धरुन व असल्यास जाणिवपुर्वक सोडून दिल्याचे गृहीत धरुन व्यवहार पुर्ण करतील त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतींची दखल घेतली जाणार नाही. परिशिष्टः- तुकडी पुणे पोट तुकडी इंदापुर, मे. दुय्यम निबंधक सो., इंदापुर यांचे अधिकार कक्षेतील, गाव मौजे परिटवाडी येथील शेतजमीन मिळकत गट नंबर २३३ यांसी क्षेत्र ०२ हे.- २६.०० आर.चौ.मी. पो.ख. ०० हे. ३३.०० आर.चौ.मी. असे एकुण ०२ हे.-५९.०० आर.चौ.मी. यांसी चतुः सिमा मुळ सरकारी रेकॉर्डप्रमाणे असत यापैकी विद्यमान जमीन मालकाचे मालकी हक्क ताबे वहिवाटीचे ०१ हे.-०० आर + पो.ख. ०० हे.- १७ आर असे एकुण ०१ हे. १७ आर क्षेत्र पैकी अ) ०० हे.-८० आर + पो.ख. ०० हे. १७ आर असे एकुण ०० हे. ९७ आर क्षेत्र यांसी चतुः सिमाः पुर्वेस: गट नं. २३३ पैकी ओढा, दक्षिणेस गट नं. २५४, २५३, २५२ व गट नं. २३४, पश्चिमेस ओढा व त्यानंतर गट नं. २६२ व २६१, उत्तरेस :- गट नं. २३२, २५१ व ओढा, ब) तसेच ०० हे. २० आर क्षेत्राच्या चतुःसिमाः पुर्वेस :- गट नं. २३३ पैकी क्षेत्र, दक्षिणेस गट नं. २३४ पश्चिमेस :-रस्ता, उत्तरेस गट नं. २३३ पैकी शंकर झुंजार यांचे ०० हे.-२६ आर + पो.ख. १६ आर शेतजमीन मिळकत हा या जाहीर नोटीसीचा विषय असे.

बारामती
दिनांक: १८/११/२०२६
अशिलातर्फे ॲडव्होकेट ॲड. रेश्मा बाळासो लोणकर (आदलिंगे)
ऑफिस- नं. १३, संघवी हाईटस्, भिगवण रोड, बारामती, जि-पुणे.
मो.नं. ९४२०४८०३२२

ग्रामपंचायत – शिंद ता. भोर, जि. पुणे
बी –१ जाहीर निविदा सूचना–१ २०२६/२७

ग्रामपंचायत शिंद, ता. भोर, जि. पुणे मौजे शिंद येथिल खालील कामांसाठी बी -१ पद्धतीने नोंदणीकृत पुरवठादार /संस्था /ठेकेदार यांच्याकडून निविदा सीलबंद लिफा

दखल

कल्पनेतलं घर, संस्कारांचं विश्व! इराबत्तीन परिवाराने साकारल्या पाच भातुकल्या

अहिल्यानगर : बालपणीच्या आठवणींना उजाळा देणारा आणि संस्कृतीचे संस्कार रुजविणारा भातुकलीचा खेळ आजही आपले वेगळेपण जपत आहे. तेलुगू भाषेत भातुकलीला 'बोम्मरिल्लू' (घरबंट) असे म्हटले जाते. दिवाळीच्या निमित्ताने दातरंगे मळा, एकदंत कॉलनी येथील इराबत्तीन परिवाराने दरवर्षीची परंपरा जपत यंदाही पाच आकर्षक भातुकल्या मांडल्या आहेत. या भातुकल्या साकारण्यासाठी परिवारातील भाऊ, वडील आणि मुलगा यांनी विशेष पुढाकार घेतला. छोटी भांडी, चूल, सजावट आणि बाहुल्यांच्या माध्यमातून कल्पनेतील घराचे सुंदर विश्व उभे करण्यात आले. विशेष म्हणजे, भातुकली हा केवळ मुलींचाच खेळ नसून मुलांनीही त्यात सहभागी व्हावे, हा समानतेचा विचार या उपक्रमातून मांडण्यात आला. स्वयंपाक करणे, घराची स्वच्छता राखणे, सजावट करणे अथवा बागकाम करणे या गोष्टी केवळ महिलांची जबाबदारी नसून घरातील प्रत्येकाची जबाबदारी आहे. मुलगा असो वा मुलगी, दोघांनाही घरातील कामांची ओळख व्हावी, एकमेकांना मदत करण्याची वृत्ती निर्माण व्हावी आणि जबाबदारीची जाणीव व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. भातुकलीच्या खेळातून मुलांना नाती जपणे, सहकार्य, वाटून घेणे आणि जबाबदारी स्वीकारणे अशी जीवनमूल्ये सहज शिकायला मिळतात. बदलत्या काळातही दिवाळीतील पारंपरिक खेळ आणि संस्कृती जपण्याचा इराबत्तीन परिवाराचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरत आहे.



दारूसाठी पैसे मागितल्याच्या रागातून पतीकडून पत्नीला मारहाण; गुन्हा दाखल

अहिल्यानगर : तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सिद्धार्थनगर, सारडा कॉलेजमागे घडली कौटुंबिक वादातून मारहाणीची गंभीर घटना दारू पिऊन आलेल्या आरोपी पतीने पत्नीला घरखर्चासाठी पैसे मागितल्याच्या कारणावरून केली शिवीगाळ व मारहाण फिर्यादी महिलेने दारू पिण्यास मज्जाव केल्याने आरोपीने राग मनात धरून लाथाबुक्क्यांनी केली बेदम मारहाण आरोपीने स्वतःकडील लोखंडी फायटर तोंडावर मारून फिर्यादी महिलेला केले गंभीर जखमी भांडण सोडवण्यासाठी बीच बचाव करण्यासाठी आलेला फिर्यादीचा मुलगा शारोन यालाही आरोपीने दिली जीवे मारण्याची धमकी आरोपी अरुण मोहन गाडे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२) नुसार गुन्हा दाखल तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार रमेश थोरवे करत आहेत प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

आनंद कोठारीचे कार्य उल्लेखनीय : प.पू. प्रवीणऋषीजी महाराज



अहिल्यानगर : आनंद कोठारी यांचा आज समर्पण चातुर्मास समिती अहिल्यानगरचे अध्यक्ष आणि सर्व समितीचे सदस्य यांनी यथोचित सत्कार केला. यावेळी बोलताना प.पू.प्रवीणऋषीजी महाराज म्हणाले मी सुरुवातीला आहिल्यानगर येथे आलो असता मीटिंग चालू असताना मी समर्पणदूत असे बॅच बनवायचे आहेत. असा विषय घेतला त्याच वेळेस आनंद कोठारी यांनी संबंधित बॅच करतेस संपर्क साधून त्याच दिवशी लगेच दुपारी आनंद कोठारी यांनी मला सॅम्पलच दाखवले. आणि ५१०० बॅच लगेच तयार करून समर्पण चातुर्मास समितीचे अध्यक्ष यांच्याकडे दिले चार महिन्यांमध्ये सर्व पेपरच्या संपूर्ण पान जाहिरात त्यांनी स्वतःहून देऊन समर्पण चातुर्मास समितीचा भार कमी केला खरोखर अशा युवकांना धन्यवाद द्यावे तेवढेच थोडे आहेत मी तर त्यांना बोललो पण नव्हतो परंतु त्यांनी स्वतःहून हे कार्य केले आहे. तसे पाहता जामखेड येथील उद्योजक कांतीलालजी चंदुलाल कोठारी यांचा पुत्र आनंद कोठारी हे मूळ रहिवासी जामखेडचे असून काही वर्षांपूर्वी अहिल्यानगर येथे वास्तवयास आले आहेत समाजसेवेत सतत अग्रेसर असण्याचे काम ते करत आहेत. चातुर्मास संपत आला आहे त्यानिमित्ताने ज्यांनी ज्यांनी समर्पण चातुर्मास यशस्वी होण्यासाठी सहकार्य केलेल्या सर्वांचा सत्कार करण्यात आला यावेळी युवा उद्योजक आनंद कांतीलाल कोठारी यांचा यथोचित सत्कार करण्यात आला यावेळी समर्पण चातुर्मास समिती अध्यक्ष बाबुशेठ बोरा, अमृतलाल कोठारी, उद्योजक प्रकाश कांकरिया, संजय मनसुखलाल गुंदेचा, सचिन देसरडा आदी उपस्थित. यावेळी संजय कोठारी, मिठूलाल नवलाखा, वैभव कटारिया, गौरव अरोरा, युवा उद्योजक प्रफुल्ल सोळंकी,सुभाष भंडारी सुमित चानोदिया, राहुल राखेचा ,मनोज दुगड, निलेश दुधेडिया अनिल फिरोदिया, अमोल तातेड आदींनी अभिनंदन केले.

खोसपुरीत बिबट्या पिंजऱ्यात

दहशत मात्र कायम; आणखी दोन बिबट्यांचा वावर; स्थानिकांचा दावा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



नगर तालुका : नगर तालुक्यातील खोसपुरी शिवारात मागील अनेक महिन्यांपासून बिबट्याच्या वावरामुळे दहशतीत असलेल्या शेतकरी व नागरिकांना अखेर दिलासा मिळाला आहे. डॉ. मोईन शेख यांच्या शेतात वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात बुधवारी (दि. १८) बिबट्या जेरबंद झाला. मात्र परिसरात आणखी दोन बिबट्यांचा वावर असल्याचा दावा स्थानिक नागरिकांनी केल्याने वनविभागासमोर आव्हान कायम आहे.

खोसपुरी शिवारातील डॉ. मोईन शेख यांच्या गट क्रमांक ८४/३ मधील शेतात मागील आठवड्यात वनविभागाच्या वतीने पिंजरा लावण्यात आला होता. बुधवारी सकाळी या पिंजऱ्यात बिबट्या अडकल्याचे स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास आले. घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे कर्मचारी संजय सरोदे यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर जेरबंद बिबट्याला सुरक्षितपणे वनविभागाच्या कार्यालयात हलविण्यात आले.

खोसपुरी, मजले चिंचोली, आव्हाडवाडी आणि उदरमल परिसरात गेल्या अनेक महिन्यांपासून बिबट्याचा सातत्याने वावर होता. रात्रीच्या वेळी शेतात काम करताना तसेच पशुधनाची देखभाल करताना शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. बिबट्याकडून पाळीव प्राण्यांवर हल्ले होण्याच्या घटनाही वारंवार घडत होत्या. मागील आठवड्यात मजले चिंचोली येथील शेतकऱ्याच्या दहा शेळ्यांवर बिबट्याने हल्ला करून त्यांची शिकार केली होती.

अधिकारी गायबच!

खोसपुरी येथे पिंजऱ्यामध्ये बिबट्या अडकल्यानंतर वनविभागाच्या एकाही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली नाही. वन कर्मचारी संजय सरोदे यांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने बिबट्याला वनविभागाच्या कार्यालयात हलवले. बिबट्या पिंजऱ्यात अडकल्यानंतर देखील वनविभागाचे अधिकारी घटनास्थळी आले नाही. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.

नगर तालुक्यात बिबट्यांचा धुमाकूळ आ. कर्डिलेंचा वनविभागाला अल्टिमेटम !



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

नगर तालुका : बिबट्यांचा तातडीने बंदोबस्त करण्याच्या आमदार अक्षय कर्डिलेंकडुन वनाधिकाऱ्यांना सुचना नगर तालुका: नगर तालुक्यात बिबट्यांचा वावर दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वारूळवाडी, बुरानगर, कापूरवाडी, शेंडी, पोखर्डी आणि नगर गजराजनगर परिसरात गेल्या आठ दिवसांत चार ते पाच बिबट्यांचा वावर आढळून आला आहे. रस्त्याने प्रवास करणारे नागरिक, घराकडे परतणारे ग्रामस्थ आणि शेतात जाणाऱ्या शेतकऱ्यांना थेट बिबट्याचे दर्शन होत असल्याने आता नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.या गंभीर परिस्थितीची दखल घेत आमदार अक्षय कर्डिले यांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेत बिबट्यांचा तातडीने बंदोबस्त करण्याच्या सूचना दिल्या. केवळ पिंजरे लावून प्रश्न सुटणार नाही. कोणत्याही परिस्थितीत या परिसरातून बिबट्यांना पकडून सुरक्षितपणे हलविण्याची कार्यवाही करा अशा स्पष्ट सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. बिबट्यांचा वाढता उपद्रव हा आता केवळ एका गावाचा प्रश्न राहिलेला नाही. नागरिकांच्या मनात घराबाहेर पडण्याचीही भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे आगामी अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वनमंत्र्यांची भेट घेऊन या प्रश्नावर ठोस निर्णय घेण्याची मागणी करणार असल्याचे कर्डिले यांनी सांगितले.

नगर जिल्ह्यातील मुलांसाठी मोफत पोलिस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प राजूर, ता.अकोले , जि. अहिल्यानगर या कार्यालयांतर्गत कार्यरत असलेल्या पोलिस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र मवेशी, ता. अकोले जि. अहिल्यानगर येथे फक्त अहिल्यानगर जिल्हयातील अनुसूचित जमातीच्या (ड.ढ.) मुलांसाठी ४ महिने कालावधीचे पोलिस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षणाचे निवासी व भोजन व्यवस्थेसह मोफत प्रशिक्षण आयोजित करण्यात येत आहे.

दिनांक ०१ डिसेंबर २०२६ ते दिनांक ३१ मार्च २०२७ या कालावधीत आयोजित प्रशिक्षणात सहभागी होण्यासाठी फक्त अहिल्यानगर जिल्हयातील अनुसूचित जमातीच्या मुलांसाठी प्रशिक्षणास आवश्यक पात्रता पुढीलप्रमाणे आहेत.

१) आवश्यक कागदपत्रे: इ.१२ वी उत्तीर्ण गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला, जातीचा दाखला, आधार कार्ड, रहिवाशी दाखला किंवा रेशन कार्ड, डोमीसाईल दाखला. ४ (चार) पासपोर्ट साईज फोटो २) शारीरिक पात्रता: वजन किमान ५० कि.ग्रॅ. असावे तसेच वय १८ ते २६ वर्षे व उंची कमीत कमी १६५ से.मी. असावी ३) निवड पध्दत : शारीरिक क्षमता चाचणी १६०० मिटर रनींग (मार्क-५०), लेखी परीक्षा (मार्क-५०) एकूण १०० गुणांची परीक्षा घेण्यात येईल. उमेदवारांची निवड मेरीटनुसार करण्यात येईल ४) दिनांक २६ नोव्हेबर २०२६ पर्यंतच उमेदवारांचे ऑफलाईन अर्ज स्विकारले जातील.

६५ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा केंद्राचे उद्घाटन

नाट्यगृहाचा प्रलंबित प्रश्न लवकरच मार्गी लावण्याचे महापौर गाडे यांचे आश्वासन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



अहिल्यानगर : सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने आयोजित ६५ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा २०२६-२७ च्या प्राथमिक फेरीतील अहिल्यानगर केंद्राचा उद्घाटन समारंभ उत्साहात संपन्न झाला. या समारंभास अहिल्यानगर महानगरपालिकेच्या महापौर सौ. ज्योती गाडे, मराठी चित्रपट निर्माते श्री. बलभीम पठारे, ज्येष्ठ रंगकर्मी सौ. मीरा महाजनी, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नियामक मंडळाचे सदस्य श्री. क्षितिज झावरे, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या उपनगर शाखेचे अध्यक्ष श्री. प्रसाद बेडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी स्पर्धेचे सन्माननीय परीक्षक श्री. राजेश जाधव, श्री. अरुण शेलार आणि सौ. प्रिया नेर्लेकर उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी महापौर सौ. ज्योती गाडे यांनी स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व नाट्यसंस्था आणि कलाकारांना शुभेच्छा दिल्या. तसेच अहिल्यानगर शहरातील प्रलंबित नाट्यगृहाचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करून हा प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले. शहरातील नाट्यकलावंतांना हक्काचे नाट्यगृह उपलब्ध होण्याच्या दृष्टीने महापौरांनी दिलेल्या आश्वासनाचे उपस्थितांनी स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केंद्र समन्वयक सागर मेहेत्रे यांनी केले, तर सहसमन्वयक जालिंदर शिंदे यांनी आभार प्रदर्शन केले.

या स्पर्धेमुळे अहिल्यानगरच्या नाट्यचळवळीला नवी ऊर्जा मिळणार असून, विविध नाट्यसंस्थांच्या दर्जेदार नाट्यप्रयोगांची मेजवानी रसिकांना अनुभवता येणार आहे.

सुनीता सोबले यांच्या पाठपुराव्याने विधाते वस्तीचा रस्ता मार्गी



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

पारनेर : गेल्या तीन ते साडेतीन वर्षांपासून रखडलेल्या पारनेर शहरातील बीएसएनएल ऑफिस ते विधाते वस्ती या रस्त्याच्या कामाला अखेर गती मिळाली आहे. रस्त्याचे डांबरीकरणाचे बहुतांश काम पूर्ण झाले असून, स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार सुनीताताई सोबले यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे.

या रस्त्याचे यापूर्वी खडीकरण करण्यात आले होते. मात्र, डांबरीकरण आणि साईडपट्ट्यांची कामे अपूर्ण राहिल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. याबाबत संबंधित ठेकेदार आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडे वारंवार निवेदने देऊन काम पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली होती. काम मार्गी न लागल्यास आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला होता.

डांबर उपलब्ध नसणे यासह विविध कारणांमुळे काम रखडले होते. दरम्यान, आमदार काशिनाथ दाते यांनीही संबंधित ठेकेदारांकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. त्यामुळे कामाला गती मिळाली असून, सध्या बहुतांश डांबरीकरण पूर्ण झाले आहे. मात्र, साईडपट्ट्या आणि डांबरीकरणाचा अंतिम थर टाकणे बाकी आहे. ही कामेही लवकर पूर्ण करावीत, अशी अपेक्षा सुनीताताई सोबले यांनी व्यक्त केली. तसेच विधाते वस्तीवरील प्रलंबित वीजप्रश्न सोडविण्यासाठीही संबंधित विभागाकडे पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. विधाते वस्तीवरील नागरिक, विशेषतः माता-भगिनींनी रस्त्याबरोबरच वीजपुरवठ्याचा प्रश्नही मांडला आहे. या परिसरात अद्याप सिंगल फेज वीजजोडणी पोहोचलेली नसून, सागरदास भजनी मंडळापर्यंतच वीजपुरवठ्याची सुविधा उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी सुमारे १५ ते २० नवीन वीजखांब उभारण्याची आवश्यकता असून, येत्या काळात हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे सुनीताताई सोबले यांनी स्पष्ट केले.

दीर्घकालीन विचारातून पाण्याचे नियोजन करा : स्वाती सिरसुल

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



अहिल्यानगर : यंदा अत्यल्प पाऊस झाल्यामुळे राज्यातील अनेक भागांत भीषण दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. ऑक्टोबर महिन्यातच अनेक नद्या, ओढे, तलाव आणि धरणांनी तळ गाठल्याने आगामी सहा ते सात महिन्यांत पाणीटंचाईचे गंभीर संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. ही परिस्थिती लक्षात घेता शासनाने तातडीच्या उपाययोजनांसोबतच दीर्घकालीन जलनियोजनावर भर द्यावा. भूजल पातळी वाढविण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात रेन वॉटर हार्वेस्टिंग योजना प्रभावीपणे राबवावी, अशी मागणी पद्मशाली समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. स्वाती सिरसुल यांनी शासनाकडे केली आहे.

यंदा कमी पावसामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये भूजल पातळी खोल गेली असून, त्याचा परिणाम विहिरी, बोअरवेल, ओढे आणि नद्यांच्या पाणीपातळीवर झाला आहे. विशेषतः मराठवाड्यातील काही भागांत भूजल पातळी ४० ते ७० फुटांपर्यंत खाली गेल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी दोन ते तीन किलोमीटर पायपीट करावी लागत आहे. काही ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असला, तरी भविष्यात टँकरसाठी पाण्याचे स्रोतच आटल्यास पाणीपुरवठा कसा करणार, हा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली.

शहरी भागातील पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात रस्ते आणि नाल्यांमधून वाहून जाते. सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यांमुळे पाणी जमिनीत मुरण्याचे प्रमाणही कमी झाले आहे. त्यामुळे सार्वजनिक, शासकीय तसेच खासगी इमारतींवर रेन वॉटर हार्वेस्टिंग यंत्रणा बसविण्याची मोहीम शासनाने हाती घ्यावी. १०० चौरस मीटरपेक्षा अधिक क्षेत्रफळ असलेल्या इमारतींवर पर्जन्यजल संकलन प्रणाली बसविण्याच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करावी. विशेष म्हणजे अनेक शासकीय इमारतींमध्येही या यंत्रणेचा अभाव असल्याचे दिसून येते. शासनाने स्वतःच्या कार्यालयांपासून या उपक्रमाची अंमलबजावणी करावी, असेही त्यांनी सुचविले.

पाणी अडवा, पाणी जिरवा ही संकल्पना केवळ घोषणांपुरती मर्यादित न ठेवता तिची कायमस्वरूपी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. पावसाचे पाणी साठवणे, जमिनीत मुरवणे आणि त्याचा पुनर्वापर करणे ही प्रक्रिया प्रत्येक शहरात आणि गावात नियमितपणे राबविली पाहिजे. यामुळे भूजल पातळी वाढण्यास मदत होऊन विहिरी व बोअरवेलमधील पाणीसाठा टिकून राहू शकतो. तसेच अतिवृष्टीच्या काळात रस्त्यांवर साचणाऱ्या पाण्याची समस्याही कमी होऊ शकते.

नगरमधील १० टक्के पाणी कपातीचा निर्णय स्थगित!

अनधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करण्यासाठी अभय योजना

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



अहिल्यानगर : दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने लागू केलेल्या १० टक्के पाणी कपातीच्या निर्णयाला अहिल्यानगर महापालिकेने स्थगिती दिली आहे. शहरातील पाणीप्रश्नावर महापौर ज्योतीताई गाडे यांनी नगरसेवकांची बैठक आयोजित केली होती.

या बैठकीत शहराच्या हक्काचे पाणी नागरिकांना मिळावे, अनधिकृत नळ कनेक्शन शोधून अधिकृत करावेत, पाणी वितरणातील असमतोल दूर करावा, गळती रोखावी तसेच पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करावे, अशा विविध मागण्या नगरसेवकांनी केल्या. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगरसेवकांचे एक महिन्याचे मानधन दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठ्याच्या उपाययोजनांसाठी देण्यात येणार असल्याची घोषणा नगरसेवक संपत बारस्कर यांनी केली.

तर पुढील ३० वर्षांचा विचार करून महापालिकेच्या पाणीपुरवठा योजनेचा ५०० कोटी रुपयांचा डीपीआर शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी गणेश गाडळकर यांनी दिली.

महापौर ज्योतीताई गाडे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीस आयुक्त यशवंत डांगे, सभापती दीपलीताई बारस्कर, जलसंपदा विभागाचे अभियंता पारखे यांच्यासह नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाणीप्रश्नावर बैठक आयोजित केल्याबद्दल नगरसेवकांनी महापौरांचे कौतुक केले. तसेच यापुढे महापालिकेच्या सर्व विभागांच्या बैठका आयोजित करून विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात यावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

नगरसेवक निखिल वारे यांनी शहराच्या हक्काच्या पाण्याचा मुद्दा उपस्थित करत ग्रामपंचायती आणि इतर शासकीय कार्यालयांना महापालिकेच्या पाइपलाइनमधून देण्यात आलेल्या पाण्याबाबत निर्णय घेण्याची मागणी केली. शहरात सुमारे दीड लाख मालमत्ता असून नळ कनेक्शनची संख्या सुमारे ७० हजार असल्याची माहिती देत या तफावतीकडे लक्ष वेधले.

शहरातील अनधिकृत नळ कनेक्शन शोधून काढावेत. एकविरा चौकातील एका अपार्टमेंटमध्ये २० फ्लॅट असून तेथे पाणी कुठून येते, याची चौकशी करावी. अनधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करून घेण्यासाठी नागरिकांना संधी द्यावी; मात्र त्यानंतरही कनेक्शन अधिकृत न केल्यास संबंधितांवर दंडात्मक व फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

समान काम, समान वेतन' मागणीसाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन

आंदोलनाचा आज दुसरा दिवस; न्यायालयीन कामकाज ठप्प पक्षकारांची गैरसोय

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



शेवगाव : 'समान काम, समान वेतन' या तत्त्वानुसार उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी राज्यातील सुमारे ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर गेले आहेत. या राज्यव्यापी आंदोलनाला पाठिंबा देत शेवगाव तालुक्यातील दिवाणी व फौजदारी न्यायालयातील सर्व कर्मचाऱ्यांनीही कामबंद आंदोलन पुकारत उपोषणाचे हत्यार उपसले आहे. आंदोलनाचा आज दुसरा दिवस आहे .

महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या नेतृत्वाखाली १७ नोव्हेंबरपासून राज्यभरात हे बेमुदत कामबंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या समितीने जानेवारी २०२५ मध्ये वेतनवाढीचा व सुधारित वेतनश्रेणीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला होता. मात्र, तब्बल २२ महिने उलटूनही राज्य सरकारने या प्रस्तावावर कोणताही निर्णय घेतलेला नाही. यापूर्वी कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून कामकाज करणे आणि ५ नोव्हेंबर रोजी एकदिवसीय सामूहिक रजा आंदोलन करून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला होता. परंतु, सरकारकडून कोणताही ठोस प्रतिसाद न मिळाल्याने कर्मचाऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे.

संपाच्या पार्श्वभूमीवर शेवगाव येथील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी एकत्र येत उपोषण सुरू केले आहे. कर्मचाऱ्यांच्या या आंदोलनामुळे शेवगाव न्यायालयातील दैनंदिन कामकाज पूर्णपणे ठप्प झाले आहे. संपाचा फटका सुनावणीसाठी आलेल्या पक्षकारांना आणि वकिलांना बसला असून अनेक महत्त्वाच्या दाव्यांची सुनावणी पुढे ढकलण्याची वेळ आली आहे.

उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच दुय्यम न्यायालयातील कर्मचारीही तितक्याच जबाबदारीने काम करतात. गेल्या अनेक महिन्यांपासून आमच्या हक्काचा वेतनवाढीचा प्रस्ताव प्रलंबित आहे. जोपर्यंत शासन या संदर्भात अधिकृत शासन निर्णय काढत नाही, तोपर्यंत हे आंदोलन आणि उपोषण मागे घेतले जाणार नाही, असा ठाम निर्धार आंदोलक कर्मचाऱ्यांनी येथे व्यक्त केला आहे.

दुष्काळी परिस्थीतीवर मात करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करणार : कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पारनेर : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी किसान सभेच्या प्रदेश पदाधिकारी व जिल्हाध्यक्षांची राज्यातील दुष्काळी परिस्थितीबाबत राज्याचे कृषिमंत्री ना.दत्तामामा भरणे यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांच्या मुंबई येथील सिद्धगड या निवासस्थानी मंगळवारी आढावा बैठक संपन्न झाली.या बैठकीला माजी आमदार लहू कानडे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते अविनाश आदिक, अनिल जिपाठी, किसान सभेचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मनकर , प्रदेश उपाध्यक्ष अनिल देठे पाटील, सरचिटणीस डॉ.गणेश डोंगरे, डॉ.मंगेश देशमुख, डॉ.अभिजित घोरपडे आदींनी उपस्थित राहुन राज्यातील भिषण दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतला.

या वेळी बोलताना राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, राज्यात यावर्षी पडलेला दुष्काळ हा अत्यंत भिषण असुन, राज्यातील जनतेला या संकटातून बाहेर काढण्यासाठी राज्य शासन दिर्घकालीन उपाययोजना करणार आहे.त्या अनुषंगाने राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत काही महत्त्वाचे निर्णय देखील घेण्यात आले असून , उपसमितीच्या बैठका देखील सुरू आहेत.

नागरिकांना अन्नधान्य, पाणी व पशुधनाला लागणारा चारा पुरविण्यासाठी शासनस्तरावर जोरदारपणे प्रयत्न सुरू असुन , शेतकऱ्यांनी देखील या संकटाचा सामना करण्यासाठी सरकारला सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले.

तसेच या दरम्यान राज्यातील विविध भागांमधुन आलेल्या किसान सभेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या भागातील दुष्काळाची दाहकता कृषीमंत्री महोदयांना सांगितली माजी आमदार लहू कानडे यांनी देखील प्रशासकीय सेवेत असताना तत्कालीन काळामध्ये दुष्काळी परिस्थितीत केलेल्या कामाचा अनुभव स्पष्ट करत ग्रामीण भागातील सध्याच्या वास्तविकतेवर प्रकाश टाकला. किसान सभेचे प्रदेश उपाध्यक्ष अनिल देठे पाटील यांनी देखील अहिल्या नगर जिल्हा व पारनेर तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा देताना सांगितले की, शेतकऱ्यांचे पशुधन वाचविण्यासाठी राज्य सरकारने पशुपालक शेतकऱ्यांच्या थेट खात्यावर चारा घेण्यासाठी अनुदान द्यावे तसेच शेतकऱ्यांचे खरिप व रब्बी असे दोन्हीही हंगाम वाया गेलेले असल्याने शेतकऱ्यांना भरिव आर्थिक मदत करून या संकटातून बाहेर काढावे तसेच पशुखाद्याचे दर मोठ्या प्रमाणावर वाढत असुन ते देखील नियंत्रित ठेवण्यासाठी उपाययोजना कराव्यात असे आवाहन केले.

या वेळी विजया भोसले , सुदाम भोर , बबनराव तिडके



, दिलीप खोडदे , प्रा.कैलास निमसे , रामदास देठे , संग्राम खोडदे , विनोद खोडदे तसेच राज्यातील विविध जिल्ह्यांचे जिल्हाध्यक्ष व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

द•ख•ल



बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिना निमित्त पाथर्डीत अभिवादन

पाथर्डी : जाती-पातीचे विचार न करता सर्व सामान्य कार्यकर्त्याला आमदार खासदार मंत्री बनविणारे, मराठी तरुणाच्या मनामनात स्वाभिमाची ज्योत पेटविणारे शिवसेना प्रमुख अद्वितीय नेतृत्व होते असे नेतृत्व पुन्हा होणे नाही असे प्रतिपादन पंचायत समितीचे माजी सदस्य विष्णुपंत पवार यांनी केले. दिवंगत शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिना निमित्त पाथर्डी तालुक्यातील शिवसैनिकाच्या वतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्या प्रसंगी पवार बोलत होते. अध्यक्षस्थानी शिक्षक सेनेचे तालुका प्रमुख नंदकुमार डाळिंबकर होते.यावेळी जेष्ठ शिवसेना नेते आदर्श सरपंच नवनाथ चव्हाण, शहर संघटक संतोष मेघूडे, मल्हारी खेडकर , मारुती राठोड, योगिनी क्षीरसागर, निकिता उंडे,सुनील जरे, दत्तात्रय दुधाळ, प्रकाश चांदणकर, जावेद शेख आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना श्री पवार म्हणाले की, परप्रांतीयांनी स्थानिक मराठी तरुणांच्या नोकऱ्यावर कब्जा केला आणि त्याकाळचे राजकारणी त्याकडे दुर्लक्ष करीत होते त्याविरोधात मराठी तरुणांना रस्त्यावरची लढाई साठी प्रवृत्त केले.कधी काळी प्रस्तापित राजकारण्याच्या विरोधात सर्व सामान्य कुटूंबातील कार्यकर्त्यांना राजकारणात आणून त्यांना सत्ता मिळवून दिल्याचे सांगितले. सूत्रसंचालन बाळासाहेब धावडे प्रस्ताविक प्रदीप भोसले तर आभार संदीप खोजे यांनी मानले.

कर्जत तालुका सकल मराठा समाजाच्या समन्वयकपदी शिवश्री निलेश यादव



राशीन : कर्जत तालुका सकल मराठा समाजाच्या संघटनात्मक वाटचालीत नवा अध्याय सुरू झाला असून, शिवश्री निलेश (बंटी) यादव यांची तालुका प्रमुख समन्वयकपदी सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. समाजाच्या संघटनात्मक कार्याला अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी आयोजित बैठकीत त्यांच्या नावावर एकमताने शिक्कामोर्तब करण्यात आले. या निवडीमुळे कर्जत तालुक्यातील सकल मराठा समाजाच्या संघटनात्मक कार्याला नवी दिशा आणि गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. या बैठकीला विजय (काका) तोरडमल, रावसाहेब धांडे, सुनील पवार, राहुल नवले, मनोज गायकवाड, श्रीहरी जगताप, विलास निकत, गणेश तोरडमल, राहुल गांगर्डे, प्रसाद कानगुडे, स्वप्नील तोरडमल यांच्यासह तालुक्यातील अनेक मराठा सेवक उपस्थित होते. निवड जाहीर होताच उपस्थित समाजबांधवांच्या वतीने नूतन समन्वयक निलेश (बंटी) यादव यांचा फेटा बांधून सन्मान करण्यात आला. उपस्थितांनी अभिनंदनाचा वर्षाव करीत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मागील समन्वयक शिवश्री रावसाहेब धांडे यांनी आपल्या कार्यकाळात समाजासाठी दिलेले योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. त्यांचे अनुभव, मार्गदर्शन आणि सहकार्य यापुढील काळातही संघटनात्मक कार्यासाठी मोलाचे ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. समाजातील तरुणांना संघटित करणे, सामाजिक उपक्रमांना गती देणे, समाजबांधवांमध्ये समन्वय वाढवणे आणि सर्वांना सोबत घेऊन संघटन अधिक मजबूत करणे, यावर विशेष भर देणार असल्याचे निलेश यादव यांनी सांगितले. आगामी शिवजयंती उत्सवही सर्व समाजबांधवांना विश्वासात घेऊन एकजुटीने आणि उत्साहात साजरा करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

मुंबईत अहिल्यानगर व बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा राजगड किल्ला



निघोज : नवी मुंबई उपनगरी करंजाळे या शहरात पारनेर तालुक्यातील पाडळी दर्या येथील रुद्र वालझडे व बीड जिल्ह्यातील स्वयंम येवले व उमराज मोरे या विद्यार्थ्यांनी दिवाळी सुट्टीत राजगड किल्ला तयार करून मुंबईकरांचे लक्ष वेधून घेतले आहे. मुंबई ही मराठी स्वाभिमानी जनतेची आहे. मात्र त्या ठिकाणी परप्रांतीयांचे वर्चस्व आहे. हे म्हणणे साफ खोटे ठरवून मुंबई ही सर्वांचीच आहे. आणी आजही छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास किल्ला माध्यमातून सर्वत्र दिसत आहे. हेच या विद्यार्थ्यांनी दाखवून दिले आहे. नवी मुंबई परिसरातील करंजाळे या शहरातील बिल्डींग परिसरातील मोकळ्या जागेत या बाल विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा ऐतिहासिक राजगड किल्ला मातीच्या सहाय्याने हुबेहूब तयार केला असून परिसरातून येणाऱ्या जाणाऱ्या लोकांनी या बाल विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे. लवकरच या विद्यार्थ्यांचा गावी आल्यानंतर पारनेर तालुका पत्रकार संघाच्या वतीने सत्कार करण्यात येणार आहे.

काळभैरव जयंती निमित्त चासकरवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

निघोज : लोणीमावळा परिसरातील चासकरवाडी येथे दि.२६ नोव्हेंबर ते दि.२ डिसेंबर पर्यंत काळभैरवनाथ जयंती निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ज्येष्ठ ग्रामस्थ राजेंद्र वाळुंज व ग्रामस्थांनी दिली आहे. पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ८ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण, ११ ते १ गाथा भजन, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, ६ ते ७ प्रवचन, रात्री ७ ते ९ किर्तन, त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन, रात्री ११ नंतर हरिजागर, मावळे गुरुजी, विठ्ठलराव निचीत यांचे प्रवचन होणार आहे. प्रशांत महाराज कोटकर, श्रीहरी महाराज पवार, तुषार महाराज गुंड, तुषार महाराज पाबळे, नवनाथ महाराज माशेरे, भास्कर महाराज भाईक यांची किर्तने होणार आहेत. बुधवार दि.२ डिसेंबर रोजी सकाळी १० ते १२ यावेळेत अशोक महाराज शिंदे यांच्या काल्याच्या किर्तनाने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे. सिद्धेश्वर भजनी मंडळ शिरापुर, गुरुनाथ भजणी मंडळ वडनेर खुर्द, भैरवनाथ भजनी मंडळ पठारवाडी, संत सावता भजनी मंडळ मोरवाडी, विठोबा रखुमाई भजनी मंडळ वडझिरे, अक्कलवाडी भजनी मंडळ यांचे जागर होणार आहे.किसन महाराज सुकाळे, किसन महाराज कवडे, रामदास बाबा बेलापूर, भंडारी महाराज, सावळेराम चासकर, श्रीधर कापसे, गणेश चासकर, अर्जुन चासकर, हरिभाऊ नरसाळे, बबन चासकर, पांडुरंग पडवळ, वाजे महाराज, भोसले महाराज, तुषार महाराज लाळगे आदिंचा या अखंड हरिनाम सप्ताहात महत्वपूर्ण सहभाग राहणार आहे. दररोज महाप्रसाद व्यवस्था लोकसहभागातून करण्यात आली .

एफएमजीई परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात डॉ. नेहा काळे यांचे दैदीप्यमान यश

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



राशीन : ग्रामीण भागातील जिद्द, मेहनत आणि स्वप्नांना कष्टांची जोड मिळाली, तर यशाला कोणतीही भौगोलिक सीमा रोखू शकत नाही, याचा प्रत्यय राशीन येथील डॉ. नेहा अनिता बिभीषण काळे यांच्या उल्लेखनीय यशातून आला आहे. सातासमुद्रापार जॉर्जियापर्यंत मजल मारत वैद्यकीय शिक्षण पूर्ण करणाऱ्या नेहा यांनी भारतातील एफएमजीई परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात तब्बल १८९ गुण मिळवत यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाने राशीनच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

सन २०२० मध्ये वैद्यकीय शिक्षणाच्या स्वप्नपूर्तीसाठी नेहा यांनी जॉर्जियाची राजधानी तिबिलिसी येथील जॉर्जियन अमेरिकन विद्यापीठात प्रवेश घेतला. परदेशातील वातावरण, नवीन संस्कृती, भाषेची आव्हाने आणि वैद्यकीय शिक्षणाचा कठीण अभ्यासक्रम अशा अनेक आव्हानांवर मात करत त्यांनी सहा वर्षांचा वैद्यकीय अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केला. जिद्द, चिकाटी आणि अभ्यासातील सातत्याच्या बळावर त्यांनी आपल्या स्वप्नांच्या दिशेने यशस्वी वाटचाल केली. परदेशातून वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर भारतात वैद्यकीय क्षेत्रात पुढील वाटचाल करण्यासाठी एफएमजीई परीक्षा महत्त्वाची मानली जाते. ऑक्टोबर २०२६ मध्ये झालेल्या या परीक्षेत नेहा यांनी पहिल्याच प्रयत्नात १८९ गुण मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली. परदेशात शिक्षण घेऊन मायभूमीत वैद्यकीय क्षेत्रात सेवा करण्याच्या त्यांच्या स्वप्नाला आता नवी दिशा मिळाली आहे. एका ग्रामीण भागातील सामान्य कुटुंबातील कन्येने परदेशात जाऊन वैद्यकीय शिक्षण पूर्ण करणे आणि त्यानंतर भारतातील महत्त्वाची परीक्षा पहिल्याच प्रयत्नात यशस्वी होणे, ही बाब निश्चितच प्रेरणादायी आहे. त्यांच्या या यशामुळे काळे कुटुंबीयांचा आनंद द्विगुणित झाला असून राशीनसह संपूर्ण परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राशीनच्या मातीतून जॉर्जियापर्यंत आणि पुन्हा भारतात यशाची मोहोर उमटविण्यापर्यंतचा डॉ. नेहा काळे यांचा प्रवास अनेक विद्यार्थिनींसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. त्यांच्या पुढील वैद्यकीय वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त होत.

दहीगाव - ने येथे अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय सांगता



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

दहीगाव-ने : येथील दक्षिणमुखी हनुमान महाराजांच्या कृपाशीर्वादाने दीपावली - पाडव्याच्या पवित्र मुहूर्तावर आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची भक्तिमय वातावरणात सांगता झाली. लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांच्या प्रेरणेने, ह.भ.प. वैकुंठवासी शांताराम महाराज शास्त्री जोशी व ह.भ.प. वैकुंठवासी कृष्णदेव महाराज काळे यांच्या कृपाशीर्वादाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण सप्ताहाचे नियोजन ह.भ.प. सुदाम देव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

सप्ताहाच्या सांगतेनिमित्त आयोजित काल्याच्या कीर्तनाची सेवा ह.भ.प. महंत उद्धवजी महाराज मंडलिक यांनी आपल्या सुश्राव्य व अमृततुल्य वाणीतून सादर केली. त्यांच्या कीर्तनातून भाविकांना भक्ती, अध्यात्म आणि संतविचारांचा अनमोल संदेश मिळाला.

याप्रसंगी शेवगाव पंचायत समितीचे सभापती मा. डॉ. क्षितीज घुले पाटील यांनी उपस्थित राहून कीर्तनश्रवणाचा लाभ घेतला.

तसेच या भक्तिमय सोहळ्यात सहभागी होत संतविचारांचे श्रवण केले.

यावेळी परिसरातील असंख्य भाविक, विविध संस्थांचे पदाधिकारी, अधिकारी, मान्यवर, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. हरिनामाचा गजर, ज्ञानेश्वरीचे पठण आणि संतविचारांचा जागर अशा मंगलमय वातावरणात दहीगाव ने येथील अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिभावाने सांगता झाली.

जेष्ठ शिक्षकांनी आधुनिक शैक्षणिक तंत्रज्ञान आत्मसात करावे : संध्या गायकवाड

नगरमध्ये २७६ शिक्षकांना वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रशिक्षण

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



नगर तालुका : शिक्षकांनी सेवांतर्गत पदोन्नती आणि वेतनश्रेणीच्या लाभासाठी वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रशिक्षण पुर्ण करणे अनिवार्य आहे. मात्र यासोबतच जेष्ठ शिक्षकांनीही आता आधुनिक शैक्षनिक तंत्रज्ञान आत्मसात करून कार्यकुशल विद्यार्थ्यांची पिढी घडवावी अशी अपेक्षा माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांनी केले.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्या वतीने नगर शहर व नगर तालुक्यातील जेष्ठ शिक्षकांसाठी रेसिडेन्शियल हायस्कूल येथे वरिष्ठ व निवड श्रेणीचे दहा प्रशिक्षण आयोजीत करण्यात आले आहे. या प्रशिक्षणाचे उदघाटन शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांच्या उपस्थितीत नुकतेच करण्यात आले. या प्रशिक्षण शिबीरात नगर शहर व तालुक्यातील २७६ शिक्षकांनी सहभाग घेतला आहे.

यावेळी शिक्षणाधिकारी गायकवाड म्हणाल्या की, सेवेचे बारा व चोवीस वर्ष पुर्ण केलेल्या शिक्षकांना हे प्रशिक्षण घेणे बंधनकारक आहे. हे प्रशिक्षण पूर्ण केल्याशिवाय शिक्षकांना वरिष्ठ किंवा निवड वेतनश्रेणीचा लाभ मिळत नाही. तसेच आधुनिक शैक्षणिक तंत्रज्ञान, अध्यापन पद्धती, आणि राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी करणे शिक्षकांना सोपे जावे यासाठी हे प्रशिक्षण उपयोगी आहे. प्रशिक्षण कालावधीत आणि प्रशिक्षणानंतर विविध स्वाध्याय, लेखी परीक्षा तसेच प्रकल्प अहवालाद्वारे शिक्षकांचे १०० गुणांचे मूल्यांकन केले जाते, ज्यामध्ये उत्तीर्ण होणे आवश्यक असते असे त्यांनी सांगितले.

स्वागत याप्रशिक्षणाच्या समन्वयक व गटशिक्षणाधिकारी तृप्ती कोलते यांनी केले.सहसमन्वयक विस्तार अधिकारी प्रविण बेलदार यांनी प्रास्तावीक केले.

या प्रशिक्षणासाठी केंद्रप्रमुख प्रकाश मुरकुटे, विषयतज्ञ साके , दहिफळे, तांत्रिक सहाय्यक शरद शेरकर,श्रीकांत दळवी प्रशिक्षण सुलभक मच्छिंद्र देसाई व तुळशीराम लबडे, सुमित्रा छ्जलानी, पोपट पवार हे शिक्षकांना मार्गदर्शन करीत आहेत. प्रशिक्षण पार पाडण्यासाठी मनपा शिक्षण मंडळाचे समन्वयक अरुण पालवे यांचे सहकार्य मिळत आहे.

स्वास्तिक चौकात चहाच्या दरावरून राडा : पाच जणांवर गुन्हा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : शहरातील स्वास्तिक चौकातील 'अरुणोदय टी कॉर्नर' या चहाच्या टपरीवर चहाच्या ११ रुपयांच्या भावावरून मोठा वाद झाल्याची घटना समोर आली आहे. फिर्यादी सोनु नवनाथ पोते हे टपरीवर काम करत असताना दुपारी चार वाजण्याच्या सुमारास पाच जण त्या ठिकाणी आले होते. विजय फुलसौंदर, हर्षवर्धन भोसले, आप्पा भोसले, सुरज भोसले आणि शौर्य मदने अशी सर्व आरोपींची नावे असून ते भोसले आखाडा येथील आहेत. चहा १५ रुपयाला का आहे, असे विचारत आरोपींनी फिर्यादीला अरेरावी करत तुला लई माज आला आहे काय, असे म्हटले. वादादरम्यान आरोपी हर्षवर्धन भोसले याने राग अनावर होऊन काउंटरवरील पेटीएमचा स्कॅनर बॉक्स खाली आपटून फोडून टाकला. त्यानंतर आरोपी विजय फुलसौंदर याने टपरीच्या गल्ल्यातून १५०० रुपये रोख रक्कम जबरदस्तीने काढून घेतली. तु कोणाचेही फोटो लावले तरी आम्हाला फरक पडत नाही, असे म्हणत आरोपींनी दमदाटी केली. मालक आनंद बडे यांना फोन करून माहिती दिल्यानंतर फिर्यादीने थेट कोतवाली पोलीस ठाणे गाठले. आरोपींनी शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात पाचही जणांविरोधात विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्थानिक पोलिसांनी घटनेची गंभीर दखल घेत या प्रकरणाचा अधिक तपास सुरू केला आहे. शहरात लहान व्यावसायिक व टपरी चालकांना टार्गेट करण्याचे प्रकार वाढल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.

सरकारकडून चारा छावण्यांची तातडीने गरज

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



निघोज : राज्यात सुपर अल निनो प्रभावाने पाऊसाळा गायब झाला आहे. पाण्याची टंचाई लक्षात घेता दुभती व ईतर जनावरे यांना दुष्काळाचा सर्वाधिक फटका बसणार आहे. जनावरांना पिण्यासाठी पाणी व चारा पिके यांची अत्यंत आवश्यकता आहे. यासाठी महसूल विभाग व जलसंपदा विभागाने एकत्रित प्रयत्न करुण बागायत भागातील वनजमिनी, वादग्रस्त पडीक असलेल्या जमीनी व अल्पभूधारक जमीनी याचा लेखाजोखा तयार करून या जमीनीवर चारा पिके घेण्यासाठी कृषी विभागामार्फत प्रयत्न करावेत जेणेकरून जास्तीत जास्त चारा पिके घेऊन सर्वाधिक जनावरांना हा चारा अत्यल्प दरात उपलब्ध करून देता येईल व जनावरांचे भुकबळी जाणार नाही तसेच चारा छावण्यांची तातडीने गरज असल्याची मागणी यासाठी प्रयत्न करण्याची गरज असल्याची मागणी संदीप पाटील वराळ जनसेवा फाऊंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ यांनी केली आहे. याबाबत त्यांनी निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूल मंत्री, जलसंपदामंत्री, कृषी मंत्री तसेच राज्याचे जलसंपदामंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच जिल्हाधिकारी यांना पाठवले आहे. या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की उदाहरणच घ्यायचे झाल्यास निघोज आणी परिसरातील पंचक्रोशीतील गाव व परिसरात वनजमीनी, वादग्रस्त जमीनी तसेच अल्पभूधारक जमीनी मोठ्या प्रमाणात पिके न घेता पडून आहेत. बागायत भागात पाणी बऱ्यापैकी उपलब्ध करून देऊन या जमीनीवर जास्तीत जास्त चारा पिके घेतली तर या जमीनींचा दुष्काळी परिस्थितीत सरकारला फायदा होईल जेणेकरून सर्वाधिक अडचण जनावरांना होणार आहे. पिण्यासाठी पाणी व खाण्यासाठी चारा मिळाल्यास लाखोंच्या संख्येने गोधन वाचेल. आजच्या परिस्थितीत जनावरांना चारा नाही म्हणून लाखमोलाचे गोधन आज बाजारात कवडीमोल किमतीने विकण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. फक्त चारा व पिण्याच्या पाण्याची टंचाई ही परिस्थीती उदभवल्यानेच शेतकऱ्यांवर ही वेळ आली आहे. म्हणून सरकारने महसूल, कृषी व जलसंपदा विभाग यांचा समन्वय साधून बागायत भागातील वनजमिनी, पडीक जमीनी व वादग्रस्त जमीनी यावर संबंधित लोकांना फक्त चाऱ्याची पिके घेण्यासाठी सहकार्य करावे तसेच लवकरात लवकर चारा छावण्या सुरू कराव्यात अशी मागणी वराळ यांनी निवेदनाद्वारे केली आहे.आजची शेतकऱ्यांची परिस्थीती फारच बिकट झाली आहे. बागायत भागात सुद्धा जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण होणार आहे. जनावरांच्या छावण्या जास्तीत जास्त गावात कशा उभ्या करता येतील तसेच गोधन वाचवण्यासाठी चारा पिके घेऊन ते जास्तीत जास्त जनवरांना कसा दिला जाईल यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. बहुतांश गावातील शेतकऱ्यांनी लाखमोलाचे गोधन कवडीमोल भावाने विकण्यास सुरुवात केली आहे. हे गोधन कसायाच्या दारात जाणार नाही याची काळजी सरकारने घेण्याची गरज आहे. यासाठी गावोगावी गोधन बचाव समीती मार्फत नियंत्रण कक्ष निर्माण करण्याची गरज आहे. यासाठी जास्तीत जास्त चारा व जनावरांच्या छावण्या हाच पर्याय आहे. अशी प्रतिक्रिया जनतेतून व्यक्त होत आहे.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री

गुरुवार, दि.१९ नोव्हेंबर २०२६ । पान ८

अभिनेत्री रीमा मुखर्जी साईचरणी नतमस्तक पायरसीच्या मुद्द्यावर व्यक्त केली तीव्र चिंता



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिर्डी : 'गदर २' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलेली आणि प्रसिद्धीच्या झोतात आलेली अभिनेत्री रिमा मुखर्जी यांनी आज शिर्डीत येऊन साईबाबांच्या समाधीचे मनोभावे दर्शन घेतले. साईदर्शनानंतर साईबाबा संस्थानच्या वतीने प्रशासकीय अधिकारी अतुल वाघ यांच्या हस्ते त्यांना शाल आणि साईबाबांची मूर्ती भेट देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी रिमा मुखर्जी यांनी आपल्या प्रवासाबद्दल आणि चित्रपटसृष्टीतील सद्यस्थितीबद्दल मनमोकळे विचार मांडले. चित्रपटसृष्टीत खरी ओळख 'गदर २' मधून निर्माण झाली असली, तरी आपण बालपणापासूनच थिएटरमध्ये कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक कलाकाराला अपेक्षित असलेली प्रसिद्धी 'गदर २' मधील 'सोनी' या भूमिकेमुळे मिळाली आणि प्रेक्षकांनी या पात्राला भरभरून प्रेम दिले. मूळच्या बंगाली असलेल्या आणि मुंबईत जन्मलेल्या रिमा मुखर्जी यांनी साईबाबांची कृपा आणि प्रेक्षकांचे प्रेम यामुळेच आपल्याला हे यश मिळाल्याची भावना व्यक्त केली. अभिनयातील बारकावे सांगताना त्या म्हणाल्या की, थिएटर हे कोणत्याही कलाकारासाठी अभिनयाचा खरा पाया असते. रंगभूमी हे लाइव्ह माध्यम असल्याने तिथे रीटेक किंवा एडिटिंगला वाव नसतो; त्यामुळे कलाकाराची पायाभरणी मजबूत होण्यासाठी थिएटरचे ज्ञान असणे अत्यंत गरजेचे आहे. आजकाल ओटीटी प्लॅटफॉर्ममुळे प्रेक्षकांना घरबसल्या आणि हवे तेव्हा मनोरंजनाची सुविधा उपलब्ध झाली असली, तरी चित्रपटगृहात जाऊन मोठ्या पडद्यावर चित्रपट पाहण्याची मजा आणि त्याचे आकर्षण आजही कायम असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, कोणताही मोठा चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर अवघ्या काही तासांतच तो पायरसीच्या माध्यमातून सोशल मीडियावर लीक होतो. यामुळे प्रचंड मेहनत घेणाऱ्या कलाकारांसह निर्मात्यांचेही मोठे आर्थिक नुकसान होत असून, या गंभीर समस्येला आळा घालण्यासाठी कठोर पावले उचलली पाहिजेत, अशी ठाम मागणीही त्यांनी यावेळी केली.

नगरमध्ये कारमधून गोमांसाची वाहतूक तिघांना पकडून जमावाने बदडले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : जामखेड रोडवर टाकळी काजी येथे गोवंशीय जनावरांची कत्तल करून त्याचे मांस गोण्यामध्ये भरून मारुती कंपनीच्या स्विफ्ट कार मधून बेकायदेशीर वाहतूक केली जात असल्याचा प्रकार १७ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आला आहे. काही गोरक्षकांनी ही कार अडवून तिघा जणांना पकडून पोलिसांचा ताब्यात दिले आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी २ लाख २२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, पो. हे. कॉ. नितीन शिवाजी शिंदे (नगर तालुका पोलीस स्टेशन) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, १७ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास आरोपींनी त्यांच्या ताब्यातील कारमधून (क्रमांक एम. एच. १२ इ. एक्स. ७३ ६८) गोवंशय जनावरांची कत्तल करून त्याचे गोमांस सुमारे १५० किलो वजनाचे गोणी मध्ये भरून बेकायदेशीरपणे वाहतूक करत होते. ही बाब गोरक्षकांच्या निदर्शनास येताच त्यांनी टाकळी काजी गावाजवळ कार अडवली. त्यानंतर पोलिसांना माहिती दिली. ही माहिती मिळताच नगर तालुका पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. या कारवाईत २ लाख २२ हजार ५०० रुपये किमतीचे १५० किलो गोमांस व वाहतुकीसाठी वापरलेली स्विफ्ट कार असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी रेहान गयास कुरेशी, आशिया शब्बीर शेख (दोघे रा. नालबंद खुंट अहिल्यानगर) आणि मुजाहिद मुस्ताक शेख (रा. बाबा बंगाली, अहिल्यानगर) यांच्याविरुद्ध नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास नगर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार किशोर लाड हे करत आहेत.

आरोपींना जमावाकडून बेदम मारहाण

दरम्यान गोरक्षकांनी कार अडविल्यानंतर त्यामध्ये गोमांस आढळून आले. ही माहिती समजतात त्या ठिकाणी मोठा जमाव जमा झाला होता. या जमावाने तिन्ही आरोपींना बेदम मारहाण केली. तसेच कारची तोडफोड केली. पोलीस घटनास्थळी गेले तेव्हा त्यांना तीन आरोपी जखमी अवस्थेत आढळून आले होते. त्यामुळे पोलिसांनी त्यांना तातडीने उपचारासाठी नगरमधील रुग्णालयात दाखल केले आहे. अद्याप जखमींनी जबाब दिलेला नसून त्यांना कोणी मारहाण केली याबाबत जखमींनी जबाब दिल्यानंतर मारहाण करणाऱ्या आणि कारचे तोडफोड करणाऱ्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

गोदावरीच्या पाणीवाटपाचा घोळ आता मंत्रालयात; चौकशीचे निर्देश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिरसगाव : गोदावरी नदीच्या पाणीवाटपातील कथित दुजाभाव आणि श्रीरामपूर तालुक्यातील महांकाळवाडगाव, नागमठाणसह पंचक्रोशीतील काही बंधारे पाण्यापासून वंचित राहिल्याचा प्रश्न आता थेट मंत्रालयापर्यंत पोहोचला आहे. शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी मिळावे आणि पाणीवाटपातील विसंगती दूर व्हावी, यासाठी महांकाळवाडगाव फार्म गोल्ड शेतकरी गटाचे अध्यक्ष अजित नारायण पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ई-मेलद्वारे सविस्तर तक्रार केली आहे. या तक्रारीची दखल घेत मुख्यमंत्री कार्यालयाने संबंधित प्रकरणाची माहिती व चौकशीसाठी जलसंपदा विभागाकडे पाठविल्याची माहिती पवार यांनी दिली.



गोदावरी नदीवरील काही बंधारे पाण्याने भरलेले असताना महांकाळवाडगाव, नागमठाण, खानापूर परिसरातील बंधारे मात्र कोरडे राहिल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. नदीच्या पाणीवाटपात काही गावांना प्राधान्य मिळत असताना इतर गावांवर अन्याय होत असल्याचा शेतकऱ्यांचा आरोप आहे. प्रशासनाच्या पाणी व्यवस्थापनातील त्रुटी, पिण्याच्या पाण्याची टंचाई, शेतीसाठी पाण्याचा अभाव आणि पशुधनाच्या पाण्याचा प्रश्न या सर्व बाबींचा सविस्तर उल्लेख मुख्यमंत्री कार्यालयाला पाठविलेल्या निवेदनात करण्यात आला आहे.

दरम्यान, महांकाळवाडगाव-नागमठाण पुलावर ११ नोव्हेंबरपासून शेतकरी आणि सर्वपक्षीय कार्यकर्त्यांचे आंदोलन सुरू आहे. यापूर्वी झालेल्या आंदोलनावेळी प्रशासनाने काही दिवसांत पाणी सोडण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, प्रत्यक्षात पाणी न मिळाल्याने शेतकऱ्यांना पुन्हा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागला. आंदोलनातील काही शेतकऱ्यांची प्रकृती खालावल्याने परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे. पाण्यापासून वंचित गावांतील शेतकऱ्यांनी आता तीव्र आंदोलनासह रस्ता रोको करण्याचा इशाराही दिला आहे.

याबाबत अजित पवार म्हणाले, गोदावरीच्या पाण्याचा प्रश्न हा केवळ एका गावापुरता मर्यादित नसून संपूर्ण पंचक्रोशीतील शेतकरी, नागरिक आणि पशुधनाच्या जीवनाशी संबंधित आहे. वारंवार आंदोलने करूनही प्रश्न सुटत नसल्याने मुख्यमंत्र्यांपर्यंत ई-मेलद्वारे तक्रार पोहोचवली. मुख्यमंत्री कार्यालयाने त्याची दखल घेऊन जलसंपदा विभागाकडे प्रकरण पाठवले, ही सकारात्मक बाब आहे. मात्र, चौकशीपुरती कार्यवाही न राहता प्रत्यक्षात वंचित बंधाऱ्यांमध्ये पाणी पोहोचणे आवश्यक आहे. सर्व गावांना न्याय मिळेपर्यंत आमचा पाठपुरावा सुरूच राहील.

मुख्यमंत्री कार्यालयाकडून तक्रारीची दखल घेतल्याने शेतकऱ्यांच्या आशा उंचावल्या आहेत. आता जलसंपदा विभागाकडून नेमकी काय कार्यवाही होते, पाणीवाटपातील कथित दुजाभावाची चौकशी होऊन वंचित बंधाऱ्यांमध्ये पाणी सोडले जाते का आणि सुरू असलेल्या आंदोलनावर काय तोडगा निघतो, याकडे संपूर्ण पंचक्रोशीतील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

दुष्काळाच्या झळा अन् चोरांचा फटका !

जेऊर पंचक्रोशीत चोरीच्या घटनांनी खळबळ; पोलिसांची गस्त वाढविण्याची मागणी



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नगर तालुका : नगर तालुक्यातील जेऊर पंचक्रोशीत चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून विविध ठिकाणी चोरीच्या घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. इमामपूर येथे दोन दिवसांपूर्वी दोन ठिकाणी चोरीच्या घटना घडल्या. तर जेऊर गावठाणातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा परिसरात तीन ठिकाणी चोरी झाल्याची माहिती समोर आली आहे. डोंगरगण रस्त्यावर शेतकऱ्याच्या शेळ्या चोरीला गेल्या असून, छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील जेऊर मुख्य चौकातील बीएसएनएलचा बॉक्सही चोरट्यांनी लंपास केल्याची माहिती मिळत आहे.

जेऊर पंचक्रोशीत वेगवेगळ्या ठिकाणी चोरीच्या घटना घडत असल्याने चोरट्यांचे धाडस वाढल्याचे चित्र आहे. रात्रीच्या वेळी घराबाहेर पडणे, शेतातील जनावरांची राखण करणे तसेच दुकाने बंद करून घरी जाणे, याबाबत नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. पाणी आणि चाऱ्याची टंचाई, पिकांचे नुकसान अन् पशुधन सांभाळण्याची कसरत सुरू असताना शेळ्यांची चोरी झाल्याने शेतकऱ्यांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे. पशुधन हे शेतकऱ्यांच्या उपजीविकेचे साधन असल्याने चोरीच्या घटनांमुळे आर्थिक नुकसानाबरोबरच मानसिक त्रासही सहन करावा लागत आहे. मागील महिन्यात चापेवाडी शिवारात जनावरे चारणाऱ्या महिलेवर भरदिवसा हल्ला करून सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना घडली होती.

जेऊरच्या बाजारपेठेतील व्यापाऱ्यांमध्येही चोरीच्या घटनांमुळे अस्वस्थता पसरली आहे. दुकाने, घरे, शाळा परिसर आणि शेतातील पशुधन सुरक्षित नसल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. पंचक्रोशीत रात्रीच्या वेळी पोलिसांची नियमित गस्त वाढवावी, संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवावे तसेच चोरीच्या घटनांचा तपास करून चोरट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी व्यापारी आणि नागरिकांमधून होत आहे.

पोलीस दुरुक्षेत्र सुरू करण्याची मागणी

एमआयडीसी पोलीस स्टेशन अंतर्गत जेऊर येथे पोलीस दुरक्षेत्र असून अनेक दिवसांपासून जागे अभावी दूरक्षेत्र बंद आहे. तरी जेऊर परिसरात तात्पुरत्या स्वरूपात जागा उपलब्ध करून पोलीस दुरुक्षेत्र सुरू करण्याची मागणी पंचक्रोशीतील ग्रामस्थांमधून होत आहे. पोलीस दूरक्षेत्र बाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी देखील ग्रामस्थांमधून होत आहे.

सावेडी परिसरात बिबट्याची दहशत कायम

तीन पिंजरे लावूनही वन विभागाला चकवा !

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : शहराच्या सावेडी उपनगरात बिबट्याचा मुक्त संचार सुरू असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड घबराट पसरले आहे. गंगा उद्यान, सिविल हडको, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर आणि लष्करी भागात बिबट्याचे दर्शन झाल्याने सावेडीकरांची झोप उडाली आहे. वनविभागाने या परिसरात तीन पिंजरे लावले असले तरी बिबट्या अद्याप पिंजऱ्यात अडकला नसल्याने प्रशासनाची डोकेदुखी वाढले आहे. सी क्यू ए व्ही परिसरातील हालचाली ड्रोन कॅमेरा कैद झाल्यानंतर बिबट्याच्या अस्तित्वावर शिक्कामोर्तब झाले आहे. सिविल हडको आणि गंगा उद्यान परिसरातही पहाटेच्या सुमारास बिबट्याने फेरफटका मारल्याचे निदर्शनास आले आहे. भरवस्तीत बिबट्या शिरल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेचे गांभीर्य ओळखून वनविभाग आणि पोलिसांनी परिसरात गस्त वाढवली आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी अविनाश तेलोरे यांच्या मार्गदर्शनाखाली बिबट्याला जेरबंद करण्यासाठी संभाव्य ठिकाणी तीन पिंजरे लावण्यात आले आहेत. मात्र अतिशय चपळ असलेल्या बिबट्याने अद्याप वनविभागाला हुलकावणी दिली आहे. आता बिबट्याची शोध मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे. दरम्यान या पार्श्वभूमीवर आ. संग्राम जगताप यांनी नागरिकांना सतर्कतेचे आवाहन केले आहे.



पुस्तक फाडून प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न केविलवाणा : बाळासाहेब थोरात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

संगमनेर : काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांच्या 'बिलॉन्गिंग : अ जर्नी ऑफ लव्ह' या आत्मचरित्रात्मक पुस्तकाच्या प्रती फाडण्याच्या प्रकाराचा काँग्रेसचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य तथा माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी तीव्र निषेध केला आहे. लोकशाहीमध्ये वैचारिक मतभेद असणे स्वाभाविक आहे. मात्र, मतभेद व्यक्त करताना सुसंस्कृतपणा आणि राजकीय शिष्टाचार जपले पाहिजेत. पुस्तक फाडून प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न करणे हा केविलवाणा प्रकार असल्याची टीका त्यांनी केली.



या प्रकरणावर भूमिका मांडताना थोरात म्हणाले की, कोणत्याही पुस्तकातील विचारांशी मतभेद असू शकतात. त्या विचारांवर टीका करण्याचा आणि असहमती व्यक्त करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. मात्र, त्यासाठी संबंधित पुस्तक वाचणे, त्यातील विचार समजून घेणे आणि त्यावर वैचारिक चर्चा करणे अपेक्षित आहे. केवळ प्रसिद्धीसाठी पुस्तकाच्या प्रती फाडणे ही अत्यंत दुर्दैवी आणि निंदनीय कृती आहे. या प्रकारात आघाडीवर असलेल्या नेत्यांच्या राजकीय भूमिकेवरही थोरात यांनी टीका केली. सत्तेच्या जवळ राहण्यासाठी आणि स्वार्थासाठी अनेक पक्ष बदलणाऱ्या या लोकांना स्वतःचा ठोस राजकीय इतिहास नाही. अशा लोकांनी सोनिया गांधी यांच्या त्यागावर आणि जीवनप्रवासावर भाष्य करणे हास्यास्पद असल्याचे ते म्हणाले.

सोनिया गांधी यांचा त्याग, खडतर संघर्ष आणि देशाप्रती असलेले समर्पण आम्ही जवळून पाहिले आहे. प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी केलेला संघर्ष आणि सार्वजनिक जीवनातील योगदान प्रेरणादायी आहे. आपल्या जीवनप्रवासातील अनुभव त्यांनी पुस्तकातून मांडले आहेत. त्यामुळे पुस्तकाबाबत आक्षेप असतील तर ते वाचून त्यातील मुद्द्यांवर चर्चा करावी, असे आवाहन थोरात यांनी केले. दरम्यान, पुस्तकाच्या प्रती फाडल्यामुळे त्याबाबतची उत्सुकता कमी होण्याऐवजी वाढणार आहे. सोनिया गांधी यांनी पुस्तकात नेमके काय लिहिले आहे, त्यांचे अनुभव काय आहेत, हे जाणून घेण्यासाठी अधिकाधिक वाचक पुस्तकाकडे वळतील. या प्रकारामुळे पुस्तकाची चर्चा अधिक व्यापक होईल, असा विश्वासही थोरात यांनी व्यक्त केला. लोकशाहीत विचारांना विचारांनी उत्तर देण्याची परंपरा जपली पाहिजे. राजकीय मतभेद असले तरी असंस्कृत वर्तनाला थारा न देता राजकीय शिष्टाचार टिकवणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महापालिकेच्या कारभारावर नगरसेवकांचा संताप

अनेक विषयांवर प्रशासनाला धारेवर धरले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : शहरातील विविध नागरी प्रश्नांवरून स्थायी समितीच्या सभेत नगरसेवकांनी प्रशासनाला धारेवर धरले. पुतळ्याचे बिल थकल्याने तो अन्यत्र विकला जाण्याची शक्यता, मोकाट कुत्र्यांचा वाढता उपद्रव, ओपन जिमच्या साहित्याची देखभाल आणि कचरा संकलनासाठी बसविलेल्या क्यूआर कोड प्रणालीच्या उपयोगितेवर सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले.



पुतळा उभारणीसाठी संबंधित एजन्सीला अद्याप बिल अदा करण्यात आलेले नाही. वेळेत पैसे न मिळाल्यास संबंधित एजन्सी हा पुतळा अन्यत्र विकू शकते. महापालिकेच्या निष्क्रिय कारभारामुळे ही परिस्थिती ओढवल्याची खंत नगरसेवक निखिल वारे यांनी व्यक्त केली. शहरातील मोकाट कुत्र्यांचा प्रश्न गंभीर बनला असून नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी सदस्यांनी केली. मात्र, मोकाट कुत्र्यांसाठी निवारागृह उभारण्याचा प्रस्ताव स्थायी समितीने स्थगित ठेवला. या विषयावर सविस्तर चर्चा करून पुढील निर्णय घेतला जाणार आहे.

महिलांसाठी शहरात ओपन जिम उभारण्याच्या प्रस्तावाचे स्वागत करतानाच त्यातील साहित्याच्या देखभालीचा मुद्दा सदस्यांनी उपस्थित केला. ओपन जिमचे साहित्य बसविल्यानंतर दोन ते तीन महिन्यांतच ते खराब होते किंवा उखडून पडते. त्यामुळे साहित्याच्या देखभालीची जबाबदारी संबंधित ठेकेदारावर निश्चित करावी, अशी मागणी नगरसेवक निखिल वारे, माजी महापौर बाबासाहेब वाकळे आणि सुरेश बनसोडे यांनी केली.

घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत शहरातील प्रत्येक घराला देण्यात आलेल्या क्यूआर कोड प्रणालीच्या वापराबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले. घंटागाडीचे ठिकाण समजणे आणि कचरा संकलनासंदर्भातील तक्रारी नोंदविणे, यासाठी ही प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. मात्र, नागरिकांकडून या क्यूआर कोडचे स्कॅनिंग होत नसल्याचे निखिल वारे यांनी निदर्शनास आणून दिले. या प्रणालीवर दरमहा सुमारे दीड लाख रुपये खर्च होत असताना तिचा प्रत्यक्ष उपयोग किती होतो, असा सवाल त्यांनी केला. या प्रक्रियेत मोठा घोटाळा झाल्याची शंकाही त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे संपूर्ण यंत्रणेची चौकशी करून खर्च आणि प्रत्यक्ष वापराचा तपशील तपासण्याची मागणी करण्यात आली.

दरम्यान, प्रोफेसर कॉलेज चौक परिसरात महापालिकेच्या वतीने उभारण्यात येत असलेल्या नाट्यसंकुलाचे सुमारे ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे. केवळ अंतर्गत सजावटीचे काम बाकी असून सर्व नगरसेवक नाट्यसंकुलाची पाहणी करणार असल्याची माहिती सभापती पै. सुभाष लोंढे यांनी दिली. सभेत खासगी टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी प्राप्त दरांच्या निविदांना मंजुरी देण्याचा तसेच मोकाट कुत्र्यांच्या निवारागृहाचा विषय स्थगित ठेवण्यात आला. या दोन्ही विषयांवर सविस्तर चर्चा करून पुढील निर्णय घेतला जाणार आहे. उर्वरित विषयांना स्थायी समितीने मंजुरी दिली.

हॉटेलच्या तिसऱ्या मजल्यावरून पडून कामगाराचा मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : शहरातील शनी चौक परिसरात असलेल्या हॉटेल आनंदमधील एका परप्रांतीय कामगाराचा तिसऱ्या मजल्यावरून पडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना आज (बुधवारी) सकाळी घडली. रामकिशोर शिवप्रसाद गुप्ता (रा. उत्तर प्रदेश, हल्ली मुक्काम शनी चौक, श्रीगोंदा) असे मृत कामगाराचे नाव आहे. बुधवारी सकाळी हात-पाय धुतल्यानंतर ते हॉटेलच्या तिसऱ्या मजल्यावरील गॅलरीत उभे होते. यावेळी अचानक पाय घसरल्याने ते खाली पडले.

या दुर्घटनेत त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच श्रीगोंदा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल संग्राम जाधव करीत आहेत.हॉटेल परिसरात घडलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

रुग्णालयात उपचारादरम्यान अनोळखी व्यक्तीचा मृत्यू

ओळख पटविण्याचे पोलिसांपुढे आवाहन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : श्रीरामपूर शहरातील साखर कामगार रुग्णालयात उपचारादरम्यान एका अनोळखी व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नसल्याने श्रीरामपूर शहर पोलिसांनी नागरिकांना ओळख पटविण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन केले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १८ नोव्हेंबर २०२६ रोजी या प्रकरणी आकस्मिक मृत्यू रजिस्टर क्रमांक १२९/२०२६ अन्वये भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १९४ प्रमाणे नोंद करण्यात आली आहे. संबंधित व्यक्तीला उपचारासाठी साखर कामगार रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर रुग्णालय प्रशासनाने याबाबत पोलिसांना माहिती दिली.

दरम्यान, मृत व्यक्तीजवळ तीन चाकी सायकल असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. त्यामुळे या सायकलीच्या आधारे मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र, अद्याप या व्यक्तीबाबत कोणतीही ठोस माहिती मिळालेली नाही.

मृत व्यक्तीला ओळखणाऱ्या नातेवाईकांनी, मित्रपरिवाराने अथवा नागरिकांनी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा. तसेच संबंधित व्यक्ती किंवा तिच्यासोबत असलेल्या तीन चाकी सायकलबाबत कोणाकडे माहिती असल्यास ती तातडीने पोलिसांना द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार भडकवाड करीत आहेत. मृत व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.